## रेमल चक्रीवादळ धडकणार

**बंगाल :** बंगालच्या उपसागरात रेमल चक्रीवादळाचा प्रभाव दिसू लागला आहे. रविवारी रात्री उशिरा हे वादळ किनारपट्टीवर धडकू शकते. बंगालच्या समुद्रकिनाऱ्यांवर चक्रीवादळ रेमलमुळे ताशी १३५ किलोमीटर वेगाने वारे वाहू शकतात आणि समुद्रात १.५ मीटर उंच लाटा उसळण्याची शक्यता आहे. हवामान खात्याने मच्छीमारांना समुद्रात न जाण्याचा इशारा दिला आहे.

रायगड, सोमवार, दि. २७ मे २०२४

# कृषीवल

किंमत ४₹

## एव्हरेस्टवर कोंडी... २०० गिर्यारोहक पोहोचले

**काठमांडू :** जगातील सर्वात उंच शिखर माउंट एव्हरेस्टवर ट्राफिक जाम झाला होता. एकाचवेळी २०० गिर्यारोहक ८,७९० मीटर उंच साऊथ समिट आणि हिलेरी स्टेपवर पोहोचले. ८,८४८ मीटर उंचीच्या या शिखरापासून माउंट एव्हरेस्ट २०० फूट दूर आहे. ये-जा वाढल्याने बर्फ खचला आणि दोन गिर्यारोहक हजारो फूट खाली पडून बर्फात गाडले गेले. एव्हरेस्टवर चढाईसाठी सकाळी ८ ते दुपारी १२ पर्यंतच परवानगी होती. सर्वच गिर्यारोहक शिखरावर जाण्यासाठी धडपडत होते. प्रत्येक गिर्यारोहकाला शिखराव फक्त २ मिनिटे थांबण्याची परवानगी देण्यात आली होती.




एकीकडे उष्णतेच्या झळांनी हैराण केले असताना दुसरीकडे आग आणि पाणी यांच्या माध्यमातून झालेल्या भीषण अपघातांमध्ये मे महिन्याचा तिसरा आठवडा मृत्यूचे तांडव करणारा ठरला. बुधवारी ( दि.२२) उजनी, भावली धरणात ११ जण तर प्रवरा, इगतपुरी येथे पाच अशा १६ जणांचा बुडून मृत्यू झाला होता. गुरूवारी (दि.२३)डोंबिवली येथील एमआयडीसी आग प्रकरणात १७ जणांचा होरपळून मृत्यू झाला. या घटना ताजा असतानाच रविवारी नवी दिल्ली येथे न्यू बॉन बेबी केअर सेंटर आणि राजकोट येथील गेम झोन आगीच्या भक्ष्यस्थानी आले. या आगीच्या घटनांमध्येबॉन बेबी केअर सेंटरमधील सहा नवजात बालके दगावली असून पाच जण जखमी झाले तर राजकोट गेम झोनमध्ये लागलेल्या आगीमध्ये २८ जणांचा होरपळून मृत्यू झाला आहे.

## राजकोट गेम झोन आगीच्या भक्ष्यस्थानी

### २८ जणांचा झाला मृत्यू ; वेल्डिंगच्या ठिणगीने आग

**। राजकोट । वृत्तसंस्था ।**


गुजरातमधील राजकोट शहरातील कलावद रोडवर असलेल्या टीआरपी गेम झोनमध्ये शनिवारी संध्याकाळी ४.३० वाजता भीषण आग लागली. या अपघातात १२ मुलांसह २८ जणांचा मृत्यू झाला असल्याचे एसपी क्राइम यांनी सांगितले आहे. २५ हून अधिक लोकांना सुरक्षित बाहेर काढण्यात आले.आग लागली तेव्हा गेम झोनमध्ये किती लोक उपस्थित होते याची माहिती नसल्याने मृतांचा आकडा अजून वाढू शकतो. मृतदेह इतके जळाले होते की त्यांची ओळख पटू शकली नाही. ओळख पटवण्यासाठी डीएनए चाचणी केली जाईल. ३ तासात

पान २ वर

## बेबी केअर सेंटरला आग

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

दिल्लीतील विवेक विहार येथील न्यू बॉर्न बेबी केअर सेंटरमध्ये शनिवारी (२५ मे) रात्री उशिरा आग लागली. या दुर्घटनेत सहा नवजात बालकांचा मृत्यू झाला, तर ५ जणांना वाचवण्यात आले आहे. त्यांना



### ६ नवजात बालकांचा मृत्यू

दुसऱ्या रुग्णालयात हलवण्यात आले आहे. रात्री साडेअकरा वाजता आग

पान २ वर

## खून करुन फ्रिजमध्ये ठेवले, नंतर पोत्यात भरले

- पेण येथील खुनाचा गुन्हा उघड
- स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाची कामगिरी

**। रायगड । खास प्रतिनिधी ।**

पेण येथील खुनाच्या गुन्ह्यातील सहा आरोपींना स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाने तीन दिवसात जेरबंद केले. आरोपी हे पनवेल येथील एका हॉटेलमधील कर्मचारी आहेत. आपल्या महिला सहकाऱ्याला त्रास देणाऱ्यांचा सर्वांनी मिळून काटा काढल्याचे पोलिस तपासात समोर आले आहे.

अनुज भालचंद्र मोरे, मनोज विष्णु गांगुर्डे, गणेश नारायण देशमुख, कानिफनाथ सुरेश म्हात्रे, सुमीत केशव चैरे आणि अन्य एक महिला आरोपी अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत.२२ मे २०२४ पेण पोलीस ठाणे हद्दीतील खड्डयात एका इसमाचा पोत्यात बांधलेला व दुर्गंधी सुटलेला अनोळखी मृतदेह आढळून आला होता. याबाबत पेण पोलीस ठाण्यात गुन्ह्याची नोंद करण्यात आली होती. सदर घटनेची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक बाळासाहेब खाडे स्थानिक गुन्हे शाखा यांनी सपोनि भास्कर जाधव, सपोनि संदीप पोमण, पोलीस उपनिरीक्षक धनाजी साठे,पोलीस उप निरीक्षक विकास चव्हाण व अंमलदार यांनी सदर घटनास्थळी भेट दिली व सदर गुन्हयाचा स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा, रायगड-अलिबाग यांनी समांतर तपास सुरू केला. प्रथम गुन्ह्यातील मयत झालेल्याची ओळख पटविणे व आरोपीचा शोध घेणे हे महत्वाचे आव्हान पोलिसांसमोर होते. सदर गुन्ह्याचा तपास करण्याकरिता स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक बाळासाहेब खाडे यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे सपोनि भास्कर जाधव,सपोनि संदीप पोमण,पोउनि धनाजी साठे,पो.उप निरीक्षक विकास चव्हाण व १६ अंमलदार यांची चार

पान २ वर

**आजचा अग्रलेख**

**अब्रू राहिली की गेली?**

### वेधक

#### ब्रिटनचे पंतप्रधान ऋषी सुनक यांना धक्का

**ब्रिटन :** ब्रिटनमधील सार्वत्रिक निवडणुकीची(लोकसभा निवडणूक) तारीख जाहीर झाली आहे. पंतप्रधान ऋषी सुनक यांनी स्वतः तारखेच्या घोषणेसह संसद लवकरच विसर्जित केली जाईल, असे सांगितले. बुधवारी झालेल्या मंत्रिमंडळाच्या महत्त्वपूर्ण बैठकीनंतर पीएम सुनक यांनी ही घोषणा केली. दरम्यान, निवडणुकीच्या घोषणेनंतर सुनक यांचा कंझर्व्हेटिव्ह पक्ष अडचणीत आला आहे. पक्षातील अनेक नेत्यांनी सुनक यांची साथ सोडली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, आतापर्यंत एकूण ७८ सदस्यांनी सार्वत्रिक निवडणुकीत भाग घेण्यास नकार दिला आहे.

पान २ वर

#### तरूणाचा रेल्वेच्या धडकेने मृत्यू


**नागोठणे :** नागोठण्याजवळील उनाटावाडी येथील जयेश रामजी शिद या तरूणाला मांडवी एक्स्प्रेस या रेल्वेची धडक लागल्याने त्याच्या डोक्याला व शरीराला गंभीर जखमा होऊन त्याचा या अपघातात जागीच मृत्यू झाला. ही घटना शनिवारी (दि.२५) सायंकाळी ७.२६ वाजण्याच्या सुमारास आमडोशी गावाच्या हद्दितील रेल्वे ट्रॅकजवळ घडली.

यात्प्रकरणी रेल्वे पोलिस दलातील अजयकुमार बलविर सिंग यांनी दिलेल्या माहितीनुसार या अपघाताची नोंद नागोठणे पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्यू अशी करण्यात आली आहे. यात्प्रकरणी नागोठणे पोलीस अधिक तपास करीत आहेत.

## पर्यटकांची माथेरान घाटात ‘कोंडी’

**। नेरळ । वार्ताहर ।**

माथेरान वाहन तळ येथील पार्किंगचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला. दरम्यान वाहन पार्किंग फुल झाल्याने आज विकेंडला माथेरान घाटात पार्किंग पासून अडीच किलोमीटर रांगा वाहनांच्या लागल्या होत्या.यामुळे काही काळ येथील वाहतूक व्यवस्था खोळंबून पर्यटकांना चांगलाच मनस्ताप भोगावा लागला आहे.दरम्यान पोलिसांनी अथक प्रयत्नानंतर काही तासात ही वाहतूक कोंडी सोडवून पर्यटकांना दिलासा दिला.



थंड हवेचे ठिकाण म्हणून माथेरानची ओळख आहे. दरम्यान शनिवार रविवार विकेंडला माथेरान ला येणाऱ्या पर्यटकांची संख्या फार मोठ्या प्रमाणात आहे.छोटे हिल स्टेशन म्हणून आणि मुंबई पुणे या शहराच्या हाकेच्या अंतरावर असलेले हे ठिकाण म्हणून सर्वाधिक पसंती पर्यटक माथेरानला देतात परंतु माथेरान फिरण्यासाठी येणाऱ्या पर्यटकांना गेली कित्येक वर्षे वाहन पार्कींगच्या समस्याला तोंड द्यावे लागत आहे येथील अपुरी वाहन पार्किंग व्यवस्था येणाऱ्या पर्यटकांसाठी डोकेदुखी ठरत आहे. रविवारी विकेंड असल्याने पर्यटकांचा लोंढा माथेरान दिशेने वळला होता. बारावीचे निकाल जाहीर झाले असून दहावीच्या निकाल उद्या सोमवार २७ मे रोजी हाती होणार असल्याने देखील ही गर्दी वाढली असल्याचे बोलले जात होते. माथेरान दस्तुरी नाका येथील वाहन पार्किंग सेवा नियोजन अभावी लवकरच फुल झाल्याने येणाऱ्या पर्यटकांची वाहने नेहमी प्रमाणे दस्तुरी वाहन तळ येथून ते गारबट जाणाऱ्या रस्त्यावर म्हणजेच साधारण अडीच किलोमीटर रांगा वाहनांच्या घाटात दिसत होत्या.घाटात झालेली वाहनांची ही गर्दी दोन्ही दिशेने जाणाऱ्या वाहनांना अडचण ठरत होती.त्यामुळे तासनतास पर्यटकांना आपल्या वाहनात अडकून पडावे लागले.काही पर्यटकांनी वाहनातून उतरून

पान २ वर

## मुंबई-गोवा महामार्ग ‘जाम’



● कोकणात सुट्ट्यानिमित्त पर्यटकांची संख्या वाढली आहे, विकेंड असल्याने मुंबई-गोवा महामार्गावर वाहनांच्या अशा लांबच लांब रांगा लागल्या होत्या.

## नाशकात सराफाच्या घरात नोटांच्या भिंती

**। नाशिक । वृत्तसंस्था ।**

नाशिकच्या कॅनडा कॉर्नर परिसरातील सुराणा ज्वेलर्स या दुकानात आयकर विभागाच्या पथकाने धाडसत्र सुरू केले.या धाडसत्रामध्ये सुराणा ज्वेलर्समध्ये आणि कार्यालयात तपासणी केली. दुसऱ्या दिवशी सुराणा ज्वेलर्स यांच्या निवासस्थानी देखील आयकर विभागाच्या अधिकाऱ्यांनी झाडाझडती घेतली.

सुराणा यांच्या बांधकाम व्यवसायिकांशी संबंध असल्याचे देखील माहिती आयकरच्या अधिकाऱ्यांना मिळाल्यानंतर केलेला झाडाझडतीत तब्बल २६ कोटी रुपये कॅश, तर ९० कोटींच्या बेहिशोबी मालमत्तांचे दस्तऐवज पथकाच्या हाती लागले.

नाशिक शहरातील कारवाई सुरू झाल्यानंतर सुराणा यांच्या कार्यालयात देखील आयकर विभागाचे अधिकारी दाखल झाले आणि त्या ठिकाणी कागदपत्रांची देखील तपासणी केली. एकाच ठिकाणी आयकर विभागाच्या वेगवेगळ्या पथकाने धाडसत्र सुरू केले.

जवळपास ३० तास ही तपासणी सुरू होती आणि या तपासणी दरम्यान फर्निचरच्या प्लाऊडमध्ये अधिकाऱ्यांना नोटांची भिंत आढळून आली. २६ कोटी रुपयांची रोकड असल्याची माहिती मिळाली. तर, दुकान आणि कार्यालयात

पान २ वर

## कोकणातील समुद्री पर्यटन बंद

**। अलिबाग । वार्ताहर ।**

कोकणातील समुद्र किनारे नेहमीच पर्यटकांना आकर्षित करतात. त्यासाठी देशभरातून आणि राज्यभरातून अनेक पर्यटकांची पसंती कोकण असते. पण आजपासून ३१ ऑगस्टपर्यंत पर्यटन बंद असे तीन महिने कोकणातील पर्यटन बंद करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. तसेच मुरूड जंजिरा किल्लाही आजपासून पर्यटकांसाठी बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. कोकणात मान्सूनचे आगमन हे १० जूनपर्यंत होणार असून या ठिकाणी मासेमारीसाठीही बंदी घालण्यात आली आहे. पर्यटन बंद झाल्यामुळे पर्यटकांचा मात्र हिरमोड झाला आहे.

### प्रशांत नाईक, चित्रलेखा पाटील यांच्या पुढाकाराने उभे राहतेय पर्यटन क्षेत्र

## उमटे धरण पाहण्याला पर्यटकांची पसंती

**। रायगड । खास प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील उमटे धरणातील गाळ काढण्याचे काम युध्द पातळीवर सुरु आहे. गाळ काढण्यासाठी समाजातून मदतीचा हात पुढे आला आहे. उमटे धरणासाठी एक सामाजिक चळवळ सुरु झाल्याने त्याची दखल आता समाजातीलच नागरिक घेताना दिसत आहेत. वॉटरपार्क अथवा अन्य ठिकाणी पर्यटन करण्याऐवजी उमटे धरणाला ते भेट देत असल्याचे चित्र दिसत आहे.

गेल्या काही दिवसांपासून उमेट धरणातील गाळ काढण्याचा प्रश्न चांगलाच ऐरणीवर आला होता. चिंचोटी येथील ॲड. राकेश पाटील या तरुणाने या प्रश्नाला वाचा फोडली होती. उमटे धरण गाळाने प्रचंड प्रमाणात भरले आहे. त्यामुळे येथील नागरिकांना अशुध्द पाण्याचा पुरवठा होत आहे. सरकार,



सेंटर फॉर ट्रान्सफॉर्मिंग इंडिया या सामाजिक संस्थेने गाळ काढण्याच्या कामाला सुरुवात केली आहे. आतापर्यंत मोठ्या प्रमाणात गाळ निघाल्याने तब्बल ५० लाख लिटर अतिरीक्त पाण्याचा साठा होणार आहे. असचे काम सुरु राहिल्यास कोट्यवधी लिटर अतिरीक्त पाण्याचा साठा होण्यास मदत मिळणार आहे.

प्रशासन, जिल्हा परिषद प्रशासन यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा करुन देखील कोणीच लक्ष देत नसल्याने परिसरातील ४८ गावे आणि ३३ आदिवासीवाड्यांतील नागरिकांना अशुध्द पाणी प्यावे लागत आहे. हा प्रश्न ॲड. राकेश पाटील या तरुणाने समाजमाध्यमांवर चांगलाच पेटवला. त्यांनी समाजातून मदतीचा हात मागितल होता. त्याला शेकापचे नेते प्रशांत नाईक, शेकापच्या जिल्हा महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई, नृपाल पाटील यांनी तत्काळ मदतीचा हात दिला.

दरम्यान, शेकापच्या जिल्हा महिला आघाडी प्रमुख

पान २ वर



### रायगड जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी साधला संवाद

# स्वप्नातील गाव 'निवी'ची केली पाहणी

**। रायगड । प्रतिनिधी**

**रायगड जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी नुकतीच माणगाव तालुक्यामधील निवी या स्वप्नातील गावाला भेट दिली व स्वदेस फाउंडेशन तर्फे गावांमध्ये सुरू असणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती घेतली.**



रॉनी स्क्रूवाला व झरीना स्क्रूवाला यांच्या स्वदेस फाउंडेशन च्या वतीने रायगड जिल्ह्यामधील माणगाव, तळा, म्हसळा, श्रीवर्धन, महाड, पोलादपूर व सुधागड तालुक्यामध्ये ग्रामीण सक्षमीकरणाचे काम गाव विकास समिती सहकार्यातून सुरु आहे.रायगड जिल्ह्यामध्ये सध्या ७०० गावांमध्ये स्वच्छ, सुंदर, स्वस्थ, सक्षम, आत्मनिर्भर या विषयावर आधारित स्वप्नातील गावे स्वदेस फाउंडेशनच्या व शासनाच्या सहकार्यातून बनत आहेत. आतापर्यंत शंभर गावे स्वप्नातील गावे म्हणून घोषित केलेली आहेत.गावभेटीच्या सुरुवातीला जिल्हाधिकारी किशन जावळे व प्रांताधिकारी डॉ.संदीपान सानप,नायब तहसीलदार अरविंद घेबुड, गटविकास अधिकारी संदीप जठार व उपसंचालक तुषार इनामदार, प्रसाद पाटील, यांचे स्वागत गाव विकास समिती, महिला वर्ग तर शाळकरी मुला मुलींनी लेझीमच्या तालावर स्वागत केले. यावेळी गावातील अंगणवाडी सौर उर्जा प्रकल्प, बकरी पालन शेतकरी, दुग्धव्यवसाय शेतकरी, मोतीबिंदू उपचार केलेल्या लोकांशी तसेच आरोग्य मित्र, ज्ञान मित्र, पशुमित्र, शेतकरी कंपनी संचालक, बँक सखी यांच्याशी जिल्हाधिकारी यांनी चर्चा केली तसेच गावातील वाचनालयाला भेट दिली व शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांशी संवाद साधला. पूर्वी निवी गावामध्ये २ शेतकरी शेळीपालन करीत होते, आत्ता १४ शेतकरी शेळीपालन करीत आहेत. पूर्वी ३ शेतकरी दुग्धवयवसाय करीत होते आत्ता त्यांची संख्या ७ शेतकरी आहेत, व दुबार पीक २ शेतकरी घेत होते, आत्ता ३४ शेतकरी दुबार पीक घेत आहेत हे पाहून जिल्हाधिकाऱ्यांना आनंद झाला व त्यांनी शेतकऱ्यांचे कौतुक केले.जिल्हाधिकाऱ्यांनी गावभेटी दरम्यान गाव विकास समितीने तयार केलेला गाव विकास आराखडा, गावचा सामाजिक व भौगोलिक नकाशा याची पाहणी केली तसेच स्वप्नातील गाव प्रक्रियेमध्ये करण्यात आलेली कामे, विकासासाठी केलेलं प्रयत्न त्यात आलेल्या अडचणी स्वदेस फाउंडेशन दिलेली साथ शासकीय कामांचा पाठपुरावा समजून घेतला. स्वदेस फाउंडेशनचे उपसंचालक तुषार इनामदार यांनी स्वदेस च्या कार्यपद्धती व स्वप्नातील गाव यांच्याबद्दल जिल्हाधिकाऱ्यांना माहिती दिली.

जिल्हाधिकाऱ्यांनी मार्गदर्शन करताना आपल्या भाषणामध्ये गावकऱ्यांचे व गाव विकास समितीचे कौतुक केले व स्वदेस फाउंडेशन ने रायगड जिल्ह्यामध्ये आरोग्य, शिक्षण, पाणी व स्वच्छता, आर्थिक विकास या विषयांवर केलेल्या कामाची प्रशंसा केली व रायगड जिल्ह्यामधील ७०० गावे स्वप्नातील करण्यासाठी सर्व प्रकारचे सहकार्य करण्याचे आश्वासन दिले तसेच निवी गावच्या विकासात शासन स्तरावरून जे जे सहकार्य अपेक्षित आहे ते सर्व सहकार्य करण्यात येईल अशीही खात्री जिल्हाधिकारी यांनी दिली व पुढील काळात पुन्हा आपण निवी गावात शेतकरी, महिला, मुले, यांना भेटण्यासाठी येण्याचे आश्वासन दिले .

कार्यक्रमाला गाव विकास समितीचे अध्यक्ष सदानंद बडेकर, सचिव महेश बबरे, सरपंच वनिता जाधव, उपसरपंच सुरेश नाडकर, शेतकरी कंपनी संचालक सचिन नाडकर, आरोग्य मित्र समृद्धी नाडकर व स्वदेस फाउंडेशनचे वरिष्ठ व्यवस्थापक मेघना फडके, वरिष्ठ व्यवस्थापक नजीर शिकलगार, उप महाव्यवस्थपक वैभव पवार व विकास खरमांळे, व्यवस्थापक शीतल सुर्यवंशी, वरिष्ठ समन्वयक राकेश पाखुर्डे उपस्थित होते.

# पहिल्या डिझाइन थिंकिंग वर्कशॉपचे आयोजन

**। रायगड । प्रतिनिधी ।**

देशातील निवडक शाळांमध्ये पहिलेच डिझाइन थिंकिंग व प्रशिक्षण वर्कशॉपचे आयोजन करण्यात आले आहे. सॅमसंग सॉल्व्ह फॉर टूमारो प्रोग्रामचा भाग असलेला हा अद्वितीय उपक्रम ह्युमन-सेंटर्ड डिझाइन थिंकिंग फ्रेमवर्कच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये समस्या-निवारण, महत्त्वपूर्ण विचारसरणी, तपासणी आणि सर्जनशीलता अशी महत्त्वपूर्ण कौशल्ये बिंबवण्यावर लक्ष केंद्रित करणारा आहे.

हे वर्कशॉप्स २,००० हून अधिक शालेय विद्यार्थ्यांना स्पर्धे करिता नोंदणी करण्यासाठी देखील मदत करतील. स्कूल ट्रॅकची विजेती टीम कम्युनिटी चॅम्पियनला प्रोटोटाइप सुधारणेसाठी २५ लाख रूपयांचे अनुदान मिळणार आहे. डिझाइन थिंकिंग वर्कशॉपचा १४ वर्षांवरील विद्यार्थ्यांना नाविन्यपूर्ण सोल्यूशन्सच्या माध्यमातून सामाजिक आव्हानांचे निराकरण करण्यास प्रेरित करण्याचा मनसुबा आहे.

भावी पिढी नावीन्यतेचे ध्वजवाहक आहेत आणि तरूणांपासूनच मार्गदर्शनाची गरज आहे. डिझाइन थिंकिंग वर्कशॉप्स यंदा १० शाळांमध्ये पायलट म्हणून सादर करण्यात आले आहेत, ज्याद्वारे तरूण विद्यार्थ्यांना प्रकल्पांची अमलबजावणी करण्यास प्रेरित करण्यात येणार आहे.

ज्यामध्ये समस्या-निवारण, सहयोग व सर्जनशील विचारसरणी यांचा समावेश आहे. या ऑफलाईन सत्रांच्या माध्यमातून शालेय विद्यार्थ्यांना मुलभूत बाबींबाबत शंका विचारण्याची, वास्तविक विश्वातील समस्यांना ओळखण्याची आणि तंत्रज्ञान-आधारित सोल्यूशन्सचा प्रस्ताव मांडण्याची अद्वितीय संधी मिळणार आहे, असे एसपी चुन म्हणाले.

# अलिबागमधील नालेसफाई अंतिम टप्प्यात

## भरतीकाळात पाणी तुंबू नये यासाठी नियोजन

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अलिबाग पालिका क्षेत्रातील नालेसफाईची कामे अंतिम टप्प्यात आली आहेत. पुढील काही दिवसात ती पूर्ण होतील, असा विश्वास मुख्याधिकारी अंगाई साळुंखे यांनी व्यक्त केला आहे.

समुद्र सपाटीलगत असल्याने अलिबाग शहरात नालेसफाईकडे बारकाईने लक्ष द्यावे लागते. अन्यथा पाणथळ जागेत पाणी तुंबण्याची शक्यता आहे. मुसळधार पाऊस आणि त्याचवेळी समुद्राला भरती असेल तर अलिबाग एसटी आगार परिसरात मोठ्या प्रमाणात पाणी साचते. त्याचबरोबर रामनाथ परिसर, तळकरनगर, पीएनपी नगर, कोळीवाडा या परिसराला सर्वाधिक फटका बसतो. ही परिस्थिती उद्भवू नये म्हणून परिसरातील नालेसफाई चांगल्या प्रकारे करण्याचा प्रयत्न नगरपालिकेकडून होत आहे. अलिबाग एसटी बस आगाराच्या बाजूने जाणाऱ्या नाल्यात मोठ्या प्रमाणात प्लास्टिक कचरा साचल्याच्या तक्रारी नागरिकांनी केल्या होत्या. यामुळे पीएनपी नगर येथील पाण्याचा निचरा होण्यास अढथळा निर्माण होतो. हा नाला पुढे डम्पिंग ग्राऊंड येथील खाडीला जाऊन मिळतो. अलिबाग कोळीवाडा, मेटपाडा, श्रीबाग परिसरात पाणी तुंबून राहू नये यासाठी नगरपालिकेने नियोजन केले आहे.

> **अलिबाग शहर हे समुद्र सपाटीलगत असल्याने पावसाच्या पाण्याचा निचरा होण्यास अडथळा निर्माण होतो. त्यामुळे नगरपालिकेला नालेसफाईची कामे वेळेत पूर्ण करावी लागतात. या वर्षी नालेसफाईच्या कामांचे योग्य पद्धतीने नियोजन करण्यात आले असून आतापर्यंत ६० टक्के कामे पूर्ण झाली आहेत.**
> **– अंगाई साळुंखे, मुख्याधिकारी, अलिबाग नगरपालिका**

# कामगारांना भरघोस वेतनवाढ करार

**। रसायनी । वार्ताहर ।**

राष्ट्रीय मूलनिवासी बहुजन कर्मचारी संघाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष कामगार नेते संतोष घरत व रायगड जिल्हा अध्यक्ष गणेश यशवंत पाटील यांच्या नेतृत्वाखाली आणि कामगार संघटनेचे राष्ट्रीय महासचिव एन. बी. कुरणे यांच्या मार्गदर्शनाखाली वेतनवाढ करार संपन्न झाला.

सदर करार करण्याकरीता युनिट अध्यक्ष विशाल पाटील, कोषाध्यक्ष प्रणय पाटील सह पदाधिकारी अखिलेश पाटील, रोहन पाटील, चेतन पाटील व इतर सर्व कामगारांची एकजूट लाभली.

व्यवस्थापन मेसर्स जनरल मेन्टेनन्स अ‍ॅण्ड कॉन्ट्रॅटींग कंपनीचे मालक इरफान पटेल व जे. एम. बक्षीचे मॅनेजर आशिष जोशी, संतोष डुमरे हे करार करण्यासाठी उपस्थित होते. सदर करारामध्ये ५४०० रूपयांची वाढ, बेसीकमध्ये ५० टक्के रक्कम व इतर भत्त्यांमध्ये ५० टक्के आणि कालावधी ३ वर्षाकरीता करण्यात आला. विशेष म्हणजे कामगार बदली भरती सुविधा देण्यात आली. बोनस, मेडिकल, इंशुरन्स, ट्युज कोटा पूर्ण झाल्यावर एक्ट्रा ट्युजवर ओटी, रेनकोटकरीता १००० रूपये तसेच सरकारी नियमानुसार सर्व फायदे व ईतर सुविधा देण्यात आले.

# वासांबे मोहोपाडा हद्दीत गटारांची साफसफाई

**। रसायनी । वार्ताहर ।**

वासांबे मोहोपाडा ग्रामपंचायत हद्दीत पावसाळी पाण्याचा निचरा होण्यासाठी गटारे आणि माऱ्यांची कामे अत्यंत नियोजन पध्दतीने करण्यात येत आहेत.जिल्ह्यात सर्वाधिक लोकसंख्या असलेली वासांबे मोहोपाडा ग्रुप ग्रामपंचायत परिसरात ग्रामपंचायतीने पावसाळ्यापुर्वी नाले साफसफाईला जोरदार सुरुवात केल्याने नागरिकांतून ग्रामपंचायत समितीचे कौतुक होत आहे.



वासांबे ग्रुप ग्रामपंचायत हद्दीतील मुख्य बाजारपेठ असणाऱ्या मोहोपाडा, आळी आंबिवली, खाने आंबिवली, नवीन पोसरी, नवीन रिस वसाहत, रिस आदी परिसरात नालेसफाईच्या कामाला वेग आला आहे. सरपंच उमा मुंढे, ग्रामविकास अधिकारी विनोद चांदोरकर व स्थानिक सदस्यांकडून नाले साफसफाईचे काम सुरु आहे.पाताळगंगा नदीजवळ असल्यामुळे नाले व इतर ठिकाणाचे पाणी हे नदीला जाते. जास्त पाऊस आल्यामुळे गावामध्ये पूर परिस्थिती निर्माण होते. ठिकठिकाणी पाणी साठले जाते यामुळे वासांबे ग्रामपंचायतीचे कर्मचारी ठिकठिकाणी नाल्यातील कचरा व गाळ काढताना दिसून येत आहेत.

पावसाळ्यापूर्वी मोहोपाडा व मोहोपाडा हद्दीतील गावामध्ये नाले व गटारे यातील गाळ व कचरा काढण्याचे काम सुरु असल्याचे पहावयास मिळत आहे.

पान १ वरुन

## खून करुन फ्रिजमध्ये ठवले, नंतर पोत्यात भरले

तपास पथक तयार करण्यात आले व गुन्हयाचा तपास सुरू केला. सदर पथकांनी गेले तीन दिवस विश्रांती न घेता अहोरात्र तपास केला. गुप्त बातमीदार तसेच तांत्रिक साधनांचा वापर करून गुन्ह्यातील आरोपींचा शोध घेतला. तांत्रिक तपासामध्ये अनुज भालचंद्र मोरे रा.आजादनगर मांटुगा वेस्ट मुंबई हा निष्पन्न झाला. त्यानंतर आरोपीला ताब्यात घेण्यात आले. सदर पथकाने आरोपीकडे सखोल चौकशी केली असता त्याने सदरचा गुन्हा कबुल केला. तसेच त्याने सदर गुन्ह्यातील त्याचे साथीदारांची नावे सांगितली. त्यानुसार दुसऱ्या पथकाने मनोज, गणेश, कानिफनाथ, सुमीत यांना पनवेल परिसरातून तात्काळ ताब्यात घेतले. त्यानंतर सदर गुन्हयात एक महिला आरोपी असल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार एका पथकाने महिला अंमलदारासह जावून रसायनी परिसरातून महिला आरोपीला ताब्यात घेतले. एकूण ०६ आरोपींना ताब्यात घेण्यात आले. त्यांच्याकडे चौकशी केली असता त्यांनी सदरचा गुन्हा कबुल केला. अभिषेक पुर्ण नाव व पत्ता माहित नाही. हा हॉटेल पंजाबी पॅलेस पनवेल या ठिकाणी काही दिवस कामाला होता. सदर ठिकाणी सदर गुन्ह्यातील महिला आरोपी ही देखील सफाईचे काम करीत होती. अभिषेक हा महिला आरोपीला त्रास देत होता. तसेच तिचे मोबाईलमध्ये व्हिडीओ बनवत होता. त्यानंतर तो काम सोडून निघून गेला होता. तो १७ मे २०२४ रोजी केलेल्या कामाचा पगार घेण्यासाठी हॉटेलवर आला होता. त्यावेळी त्याने महिला आरोपीताचा मोबाईल चोरी करून घेवून गेला होता. सदर गन्ह्यातील ताब्यात घेतलेला आरोपी सदर हॉटेलमध्ये काम करणारे मॅनेजर, वेटर आणि स्वयंपाकी आहेत. अभिषेकने महिला आरोपी बरोबर केलेले वर्तन व चोरलेल्या मोबाईल बाबत माहिती दिली त्यावरून मॅनेजर मनोज गांगुर्डे याने अभिषेकशी संपर्क साधून १९ मे रोजी १०.४५ वा. बोलावून घेतले. अभिषेक त्या ठिकाणी आला असता त्यांनी त्यास हॉटेलमध्ये बसवून सदर महिलेस का त्रास दिला व तिचा मोबाईल का चोरी केला याबाबत विचारणा केली. अभिषेकला सर्व आरोपींनी संगनमताने लाथाबुक्यांनी त्याला खाली पाडून छातीवर, पोटावर मारले. त्यानंतर तो जागीच मृत झाला. त्यानंतर आरोपींनी अभिषेकला हॉटेलच्या फ्रीजमध्ये कोंबून बसविले. एक भाडयाचा टेम्पो बोलावून त्याला बसविलेला फ्रीज टेम्पोमध्ये घालून ग्रीन पार्क धाब्यावर आणून ठेवला. त्यानंतर रात्र झालेनंतर मयतास गोणी बांधणेसाठी पनवेल येथून आरोपी अनुज चंद्रशेखर मोरे व पाहिजे आरोपी राज पुर्ण नाव माहित नाही. यांनी बीग साडी बाजार पनवेल या ठिकाणावरून गोणी खरेदी केली. त्यानंतर फ्रीजमधून त्याला बाहेर काढून. त्याला गोणीत भरून आरोपी अनुज चंद्रशेखर मोरे व राज पुर्ण नाव माहित नाही यांनी गोणीत बांधलेला मृतदेह स्कुटीवरून नेवून पेण हद्दीत फेकून दिला.

## पर्यटकांची माथेरान घाटात कोंडी

माथेरान गाठले तर काही तासानंतर वाहतूक कोंडी सुटल्यानंतर माथेरान दस्तुरी नाका येथे पोहचले होते.यावेळी नेरळ पोलीस व माथेरान पोलीस यांनी आपली कामगिरी चोख बजावली.आज बाहेरील पोलीस अधिकारी कदम हे देखील माथेरान फिरण्यासाठी म्हणून आल्याने त्यांना देखील या समस्येचा सामना करावा लागला. नेरळ माथेरान नेरळ सेवा देणारे चालक यांना देखील ह्या वाहम गर्दीचा सामना करावा लागला होता.त्यामुळे माथेरान दस्तुरी नाका येथील वाहन तळाची जागा वाढवण्याचे प्रशासनाने नियोजन केले गेले पाहिजे म्हणून पुन्हा एकदा मागणी पुढे आली आहे.अपुऱ्या जागे अभावी वाहन पार्किंग सेवा फुल होते.आणि याचा फटका येणाऱ्या पर्यटकांवर होत आहे.बहुतेक पर्यटक हे खाजगी वाहनाने माथेरान फिरण्यासाठी पसंत करतात.एक दिवसाची सुट्टी माथेरान येथे घालवून पुन्हा घरी जाण्यासाठी म्हणून पर्यटक माथेरान हे थंड हवेचे जवळचे ठिकाण म्हणून पसंती देत असून पर्यटकांना जर अशा अडचणी होत असतील तर माथेरान ला पर्यटकांची होणारी गर्दी यामुळे कमी होईल असेही येथील वाहन चालक व पर्यटक सांगत आहेत.आज वाहन कोंडी सोडवण्यासाठी सकाळ पासून ते सायंकाळी पाच वाजेपर्यंत पोलिसांना माथेरान घाटात अडकून पडावे लागले होते. एकूणच आज माथेरान घाट तर नेरळ परीसरात देखील पर्यटकांच्या वाहनांची गर्दी पाहायला मिळाली. विकेंड असताना देखील कर्जत कल्याण राज्यमार्गावर आज नेरळ या ठिकाणी रस्त्याचे डांबरीकरण होत होते त्यामुळे एकेरी वाहतूक झाल्याने वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. प्रशासनाचे नियोजन शून्य कारभारामुळे देखील आज माथेरान पर्यटन स्थळी जाणाऱ्या पर्यटकांना यामुळे ट्रॅफिक समस्येचा सामना करावा लागला.नेरळ माथेरान हुतात्मा प्रवेश द्वार येथेच तिन्ही मार्गावर वाहनांची गर्दी होती.कर्जत बाजूकडे दीड किलोमीटर तर नेरळ शहर बाजूकडे दोन किलोमीटर वाहनांच्या रांगा लागल्या होत्या.

## नाशकात सराफाच्या घरात नोटांच्या भिंती

एकूण ९० कोटींचे बेहीशेबी मालमत्तेचे दस्तऐवज देखील आयकर विभागाच्या अधिकाऱ्यांच्या हाती लागले. आयकर विभागाने सुराणा यांच्या दुकानात आणि कार्यालयात एकाच वेळी छापा सत्र सुरू केले.तपास सुरू केला असता यावेळी रियल इस्टेट व्यवसायाच्या कार्यालयातही एक पथक दाखल झाले होते. त्यानंतर नाशिक शहरातील राका कॉलनी या ठिकाणी असलेल्या सुराणा यांच्या आलिशान बंगल्यात देखील स्वतंत्र पथकाने तपासणी सुरू केली. शहरातील वेगवेगळ्या ठिकाणी त्यांच्या कार्यालयात आणि खाजगी लॉकर्स, बँकांमधील लॉकर्समध्ये देखील तपासणी आयकर विभागाचे अधिकाऱ्यांनी केली. मनमाड आणि नांदगाव येथील त्यांच्या कुटुंबातील सदस्यांच्या घरी ही देखील तपासणी करत रोख रक्कम, मालमत्तांचे दस्तऐवज पथकाने जप्त केले आहे. या कारवाईमध्ये मालमत्तांचे दस्तऐवज असलेले हार्ड डिस्क आणि पेन ड्राईव्ह देखील या पथकाच्या शोधकार्यात मिळून आले आहेत. कारवाईनंतर नाशिक शहरात एकच खळबळ उडाली आहे.

## उमटे धरण पाहण्याला पर्यटकांची पसंती

चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांनी रायगड जिल्हा परिषदेचे मुख्यकार्यकारी अधिकारी भरत बास्टेवाड यांची भेट घेतली. गाळ काढा अथवा गाळ काढण्याची आम्हाला परवानगी द्या, अशी मागणी त्यांनी केली त्याला बास्टेवाड यांनी लागलीच प्रतिसाद देत परवानगी दिली. निवासी उप जिल्हाधिकारी संदेश शिर्के, अलिबाग तहसिलदार विक्रम पाटील यांनी देखील आवश्यक असणारी प्रशासकीय मदत केली. उमटे धरणाचा विषय गेल्या काही दिवसांपासून समाजमाध्यमांवर मोठ्या प्रमाणात चर्चीला जात आहे. त्यामुळे उमटे धरण कोठे आहे, कसे आहे. हे पाहण्यासाठी आता अलिबाग तालुक्यातील गावातील नागरिक येत आहेत.रविवारी आतिश पाटील, लावण्या पाटील, प्रगती मानकर, चैतन्य, सुहास कारुळकर यांच्यासह अन्य पर्यटनासाठी आले होते. निसर्गाच्या सानिध्यात आल्याचा आनंद त्यांना झाला. वॉटर पार्क अशा ठिकाणी पैसे खर्च करुन जाण्यापेक्षा अशा ठिकाणी भेट दिल्याने मन प्रसन्न झाल्याचे लावण्या पाटील हिने सांगितले.उमटे धरणातील पाणी कुंठ्यांची गोठी या गावापर्यंत आधी पाणी यायचे आता ते येत नाही, परंतु गाळ काढण्याच्या चांगल्या उपक्रमामुळे या वर्षी उमटे धरणाचे पाणी आमच्या गावात नक्कीच येईल, असे प्रगती मानकर यांनी सांगितले. गाळ काढण्यासाठी सामाजिक चळवळ उभी राहीली आहे. या बद्दल सर्वांचेच मनापासून कौतुक करतो. येथे काम करणाऱ्यांसाठी काही अल्पपोहर देता आला यात मला समाधान आहे. प्रशासनाने देखील यात लक्ष घालून काम मार्गी लावावे, असे आतिष पाटील यांनी सांगितले. प्रशांत नाईक, चित्रलेखा पाटील यांच्या सहकार्यामुळे उमटे धरणातील गाळ काढला जात आहे. ग्रामस्थांच्यावतीने मी सर्वांचे आभार मानतो. धरणावर भेट देण्यासाठी, पर्यटनासाठी नागरिक येत आहेत. भविष्यात उमटे धरण परिसर पर्यटन क्षेत्र म्हणून विकसीत झाल्यास नवल वाटायला नको, असे ॲड. राकेश पाटील यांनी सांगितले.

## ब्रिटनचे पंतप्रधान ऋषी सुनक यांना धक्का

ब्रिटनमध्ये ४ जुलै रोजी सार्वत्रिक निवडणूक होणार आहे. या निवडणुकीनंतर देशात नवीन सरकार स्थापन होईल. पण, या निवडणुकीपूर्वी पंतप्रधान ऋषी सुनक यांच्यासमोर अनेक अडचणी आल्या आहेत. निवडणुकीत पराभव होईल, या भीतीने त्यांच्या पक्षाच्या खासदारांमध्ये घबराट निर्माण झाली आहे. यामुळे कंझर्व्हेटिव्ह पक्षाच्या अनेक ज्येष्ठ खासदारांनी पक्ष सोडण्यास सुरुवात केली आहे. बडे-बडे नेते निवडणुकीच्या मैदानातून पळून गेले.आतापर्यंत सुनक यांच्या पक्षाच्या ७८ खासदारांनी पक्ष सोडला असून त्यांनी पुन्हा निवडणूक न लढवण्याचा निर्णय घेतला आहे. निवडणुकीत दारुण पराभवाची भीती या खासदारांना वाटत असल्यानेच ते निवडणुकीपासून दूर राहिल्याचे मानले जात आहे. माजी पंतप्रधान थेरेसा मे आणि माजी संरक्षण मंत्री बेन वॉलेस यांच्यासारख्या दिग्गजांनीही निवडणुकीच्या रिंगणातून पळ काढला आहे. त्यामुळे आता ऋषी सुनक यांचा पक्ष पुन्हा सत्तेत येण्याची शक्यता आता बऱ्यापैकी कमी झाली आहे. ब्रिटनमधील दोन प्रमुख राजकीय पक्षांपैकी एक म्हणजे ऋषी सुनक यांचा कंझर्व्हेटिव्ह पक्ष आणि दुसरा कीर स्टाररचा मजूर पक्ष. कंझर्व्हेटिव्ह पक्ष सलग १४ वर्षे सत्तेत असून, गेल्या २ वर्षांपासून पक्षाला अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. पक्षाविरोधात देशभरात प्रचंड नाराजी पाहायला मिळत आहे. कंझर्व्हेटिव्ह पक्षाने देशाच्या अर्थव्यवस्थेचे नुकसान केल्याचा आरोप विरोधकांकडून सातत्याने होत आहे. त्यामुळे सुनक यांच्यासाठी ही निवडणूक खुप कठीण असल्याचे मानले जात आहे.

## राजकोट गेम झोन आगीच्या भक्ष्यस्थानी

आग आटोक्यात आणण्यात आली.पायऱ्यांवर वेल्डिंग करत असताना स्फोट झाला आणि काही मिनिटांत आग तिसऱ्या मजल्यावर पसरली. मात्र, प्रशासनाने आगीचे कारण दिलेले नाही. गेम झोनमधील रबर-रेक्सिन फ्लोअर, सुमारे २५०० लिटर डिझेलचा साठा, गाडीच्या ट्रॅकच्या बाजूला ठेवलेले टायर आणि शेडमध्ये बसवलेले थर्माकोलचे पत्रे यामुळे संपूर्ण गेम झोन एका भट्टीत रूपांतरित झाला. काही मिनिटे आणि काही तासांत सर्व बेचिराख झाले.तीन मजली इमारतीत खालून वर जाण्यासाठी एकच जिना होता. आग खालपासून वरपर्यंत पसरली. दुसऱ्या आणि तिसऱ्या मजल्यावरील लोकांना पळून जाण्याची संधीही मिळाली नाही. घटनास्थळी उपस्थित असलेले यश पटोलिया म्हणाले, आम्ही रेस्टॉरंटमध्ये बसलो होतो. त्यानंतर तेथे आग लागली. आग ३० सेकंदात संपूर्ण परिसरात पसरली. गेम झोनमध्ये अनेक ठिकाणी दुरुस्ती आणि नूतनीकरणाचे कामही सुरू असल्याचे आणखी एका व्यक्तीने सांगितले. मोठ्या प्रमाणात प्लाय आणि लाकडाचे तुकडे इकडे तिकडे पसरले होते. तेही आगीत आले आणि आग पसरत राहिली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, टीआरपी गेम झोनकडे फायर एनओसीही नव्हती. राजकोटचे पोलिस आयुक्त राजू भार्गव यांनी सांगितले की, टीआरपी गेम झोनचे मालक आणि व्यवस्थापक आणि इतर दोन लोकांना ताब्यात घेण्यात आले आहे. पोलिस त्यांची चौकशी करत आहेत. सरकारने तपासासाठी एसआयटी स्थापन केली आहे.केंद्रीय आरोग्य मंत्री मनसुख मांडविया यांनी सांगितले की, जखमींवर उपचार करण्यासाठी एम्स राजकोटमध्ये ३० आयसीयू बेड तयार करण्यात आले आहेत. ते म्हणाले की, राजकोटमध्ये आगीमुळे लहान मुले आणि लोकांचा मृत्यू झाल्याची बातमी अत्यंत दुःखद आहे. या घटनेत मृत्युमुखी पडलेल्यांच्या कुटुंबियांप्रती मी माझ्या संवेदना व्यक्त करतो.अपघातानंतर एक जण बेपत्ता आहे, त्याचा शोध सुरू असल्याचेही त्यांनी सांगितले.

## बेबी केअर सेंटरला आग

लागल्याची माहिती मिळाल्याचे अग्निशमन अधिकाऱ्यांनी सांगितले. अग्निशमन दलाच्या एकूण १६ गाड्या घटनास्थळी पोहोचल्या, दीड तासाच्या अथक परिश्रमानंतर आग आटोक्यात आणण्यात आली. घटनेच्या वेळी बेबी केअर सेंटरमध्ये एकूण १२ नवजात बालके होती. यातील एका बालकाचा यापूर्वीच मृत्यू झाला होता.आगीमुळे हॉस्पिटलमध्ये धुराचे लोट पसरले होते, त्यामुळे इतर ११ मुलांची प्रकृती चिंताजनक आहे. आगीचे कारण अद्याप समजू शकलेले नाही, असे अग्निशमन विभाग आणि पोलिस अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. मात्र, बेबी केअर सेंटरजवळील ॲम्ब्युलन्समध्ये ऑक्सिजन गॅस रिफिल केला जात असल्याचे आतापर्यंतच्या तपासात समोर आले आहे. त्याचवेळी स्फोटाचा मोठा आवाज ऐकू आला. अशा स्थितीत ऑक्सिजन सिलिंडरचा स्फोट झाल्याने ही आग लागली असण्याची शक्यता आहे. मात्र, अद्याप त्याची पुष्टी झालेली नाही.बेबी केअर सेंटरला लागलेल्या आगीच्या घटनेनंतर तीन तासांनंतर शाहदरा परिसरातील एका निवासी इमारतीला आग लागली. अग्निशमन अधिकाऱ्यांनी सांगितले की, शाहदरा पश्चिमेकडील आझाद नगर येथील इमारतीला दुपारी २.३५ वाजता आग लागल्याची माहिती मिळाली.कॉल आल्यानंतर ५ अग्निशमन केंद्रातील अग्निशमन दलाच्या गाड्या तेथे पोहोचल्या.

अरुंद गल्ल्यांमुळे तिथे जाण्यात खूप अडचण येत होती. मात्र, आग आटोक्यात आणण्यात आली. इमारतीत १२ जण अडकले होते. सर्वांची सुटका करण्यात आली.आगीमुळे आजूबाजूच्या घरांचेही नुकसान झाले आहे. रंग बनवण्यासाठी कारखान्यात ठेवलेल्या रसायनात स्फोट झाल्याने ही आग लागल्याचे पोलिसांनी सांगितले होते. २६ जानेवारीला दिल्लीतील शाहदरा भागातील एका बहुमजली इमारतीच्या तळमजल्यावर आग लागली होती. या घटनेत ९ महिन्यांच्या मुलीसह चौघांचा गुदमरून मृत्यू झाला असून दोघे जखमी झाले आहेत. त्याचवेळी, १८ जानेवारी रोजी दिल्लीतील पिथमपुरा भागात एका चार मजली इमारतीला लागलेल्या आगीत ६ जणांचा मृत्यू झाला होता. मृतांमध्ये चार महिलांचा समावेश आहे. अग्निशमन दलाच्या ८ गाड्यांनी आग आटोक्यात आणली. ते इमारतीच्या पहिल्या मजल्यावर होते. वरील तीन मजल्यांवर धूर पसरला होता.


### जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, माझे अशिल सौ. मृणाली गुरुनाथ भोपी रा. प्लॉट नं. डी/१२०, जैन पार्क हौ. सोसायटी, नेरुळ, नवी मुंबई यांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत ही सदर जमिनीचे विद्यमान मालक श्री. लहु शिवराम नाईक रा. पाबळ, ता. पेण, जि. रायगड यांचेकडून रजिस्टर खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे व तशी बोलणी सुरु आहेत.

**मिळकतीचे वर्णन** - जिल्हा रायगड, पोट तुकडी पेण, पंचायत समिती पेण, मे. दुय्यम निबंधक पेण, तलाठी सजा-पाबळ, मौजे-कोंढवी येथील गट नं. ७ क्षेत्र १-५३-७० हे.आर.चौ.मी. आकार रु. १७-३५ पैसे पैकी श्री. लहु शिवराम नाईक यांचे हिश्श्याची ०-७६-८० हे.आर.चौ.मी. ही जमिन मिळकत या जाहीर नोटीसीचा विषय आहे.

तरी वरील जमिन मिळकती संदर्भात जर कोणाचा साठेकरार, गहाण, दान, जप्ती, लिन, लीज, चार्ज, जामिनकी, कब्जा, वारसाहक्क अगर कायदेशिर हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह ही नोटीस प्रसिध्द झाले दिवशी पासून १४ (चौदा) दिवसांचे आंत खाली सही करणार ॲडव्होकेट यांचे पत्त्यावर रजिस्टर्ड पोस्टाने कळवाव्यात.

जर वरील मुदतीत कोणाचीही लेखी हर-हरकत न आल्यास सदरची ०-७६-८० हे.आर.चौ.मी. ही जमिन निर्वेध व बोजाविरहित आहे व त्यावर इतर दुसरे कोणाचाही, कसल्याही प्रकारचा हक्क अगर हितसंबंध नाही असे समजुन माझे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदती नंतर येणारी कोणतीही हरकत ही माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी. येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.

पेण- रायगड.
दि. २७/०५/२०२४.

सही
**ॲड. संजय भास्कर पाटील.**
परमार प्लाझा, शॉप नं. १६, तळ मजला,
शिवाजी पथ, पेण- रायगड. ४०२१०७.
मोबा. ९८८१९१५२१९

### नोटीस

सर्व जनतेस या जाहिर नोटिसीद्वारे कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे नमुद मौजे पाझर, ता. अलिबाग, जि. रायगड येथिल मिळकत आमचे अशिल यांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक १. श्री. अमोल अशोक काठे २. श्री. राजेंद्र महादेव नाईक यांचेकडून कायमस्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. त्याप्रमाणे त्यांच्यात बोलणी झालेली आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी या खरेदी-विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत, दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा/गहाण, वहिवाट इ. स्वरुपाचे हक्क हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकीत खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहिर नोटिस प्रसिध्द झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पुर्ण करतील व तद्नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वास कळावे.

**मौजे पाझर, ता. अलिबाग, जि. रायगड**

| मौजे | गट नं. | एकुण क्षेत्र (हे. आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| पाझर, ता. अलिबाग | ३०२ | जिरायत ०-४४-८०<br>पो.ख. ०-०३-५०<br>**एकूण क्षेत्र ०-४८-३०** | १२.७५ |

**वर नमूद मिळकतीमधील १. श्री. अमोल अशोक काठे २. श्री. राजेंद्र महादेव नाईक यांच्या मालकीचे क्षेत्र ०-१७-६० हे.आर., पो.ख. ०-०१-७० हे. आर., एकूण क्षेत्र ०-०-१९-३० हे. आर., आकार १२.७५ रू.पै.**

दिनांक :- २५/०५/२०२४

**ॲड. समीर सुरेश नाईक**
जिल्हा न्यायालय रायगड अलिबाग
ऑफिस पत्ता :- फ्लॅट नं. १०३, पहिला मजला,
बी विंग, मोरेश्वर अपार्टमेंट,
जे.एस.एम कॉलेज जवळ अलिबाग - रायगड मोबा. ९७६७०१०९०२

निवडक

## निवासी बालसंस्कार शिबीर

**नेरळ :** कर्जत तालुक्यात गेली १५ वर्षे बालसंस्कार शिबीर राबविणारे कैलाश भोईर यांनी यावर्षी देखील निवासी बालसंस्कार शिबीर आयोजित केले आहे. नेरळ येथील श्री संत ज्ञानोबा तुकोबा वारकरी शिक्षण संस्थेच्यावतीने नेरळ येथील मोहाची वाडी येथील वारकरी शिक्षण संस्थेत बालसंस्कार शिबीर भरवले आहे. १४ मे पासून १ जून पर्यंत हे बालसंस्कार शिबीर चालविले जाणार आहे. पखवाज वादन, गीता पाठ, कीर्तन, प्राचीन आणि हरिपाठ तसेच संगीताचे प्रशिक्षण देण्याचे शिबीर सुरु केले आहे.

## सिमेंट पत्र्यांची मदत

**कर्जत :** कर्जत तालुक्यात १३ ते १६ मे या कालावधीत अवकाळी पावसासह आलेल्या वादळी वाऱ्याने असंख्य शेतकऱ्यांच्या घरांचे नुकसान केले होते. त्या आदिवासी शेतकऱ्यांना स्थानी फाऊंडेशनकडून सिमेंट पत्र्यांची मदत त्यांच्या घराजवळ करण्यात आली. दरम्यान, तालुक्यात वाकस माध्यमिक शाळा आणि पोशीर येथे जिल्हा परिषद शाळेचे झालेल्या नुकसानीला देखील सिमेंट पत्रे देऊन मदत करण्यात येत आहे.

## महिलेला दुचाकीची धडक

**पनवेल :** करंजाडी ते बौध्दवाडी रस्त्यावर महाड येथे दुचाकी (एमएच-०६-बीटी१८५६) चालक रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन हयगईने समोरून पाई चालत येणाऱ्या एका महीलेस धडक देत अपघात केला. या अपघात महिला जखमी झाली असून अपघाताची खबर न देत तेथून त्याने पळ काढला. याबाबत महाड तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलीस हवालदार आशिष नटे हे करीत आहेत.

## हाशिवरे येथे चोरी

**अलिबाग :** पोयनाड पोलीस ठाणे हद्दीतील हाशिवरे येथील फिर्यादी यांच्या राहत्या घरी चोरी झाल्याची घटना घडली आहे. यावेळी दरवाज्यावाटे घरात प्रवेश करुन लोखंडी कपाटाला लावलेले कुलुप उघडुन रोख रक्कम ८५,००० रूपये अज्ञात चोरट्याने चोरली. याबाबत पोयनाड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलीस हवालदार अमोल घरत हे करीत आहेत.

## किनाऱ्यावर बोटी विसावल्या

**आगरदांडा :** १ जूनपासून मासेमारी बंदी लागू करण्यात आल्याने कोळी बांधवांनी आपआपल्या बोटी किनाऱ्यावर ओढुन त्यांना शाकारण्यास सुरुवात केली आहे. मुरुड एकदरा येथील महेश्वरी मच्छीमार सोसायटीच्या २१ यांत्रिक बोटी व एकदरा हनुमान मच्छीमार सोसायटीच्या ३० यांत्रिकी बोटी मुरुड शहरातील जय भवानी मच्छीमार सोसायटीच्या ३५ यांत्रिकी बोटी व मुरुड सागर कन्या सोसायटीचे १७ यांत्रिकी बोटी सुमारे १०३ यांत्रिकी बोटी किनाऱ्यावर ओढण्याचे काम सुरू केले आहे.

# मिनीट्रेन प्रवासासाठी पर्यटकांची गर्दी

## अपुऱ्या फेऱ्यांमुळे पर्यटकांमध्ये नाराजी

**। माथेरान । वार्ताहर ।**

माथेरानमध्ये सध्या पर्यटकांनी एकच गर्दी केली असून मिनीट्रेन प्रवासाकरिता तिकीट मिळवण्यासाठी प्रवासी माथेरान स्थानकामध्ये तासंतास वाट पाहताना दिसून येत आहे. अपुऱ्या फेऱ्या व मिनीट्रेनला असलेले मर्यादित बोगींची संख्या यामुळे अनेक पर्यटकांना मीनीट्रेन सफारीला मुकावे लागत आहे.



माथेरानच्या पर्यटनामध्ये मिनीट्रेन हा महत्त्वाचा घटक आहे. म्हणूनच माथेरानच्या मिनीट्रेनला माथेरानची जीवन वाहिनी म्हणून ओळखले जाते. मिनीट्रेन सफारी करिता देशविदेशातून अनेक पर्यटक माथेरानला भेट देत असतात. देशातील इतर हील रेल्वे पेक्षाही ही ट्रेन लहान असून अनेक छोटी मोठी नागवळणे घेत २१ किमीचा प्रवास करीत ही गाडी माथेरान स्थानकात पोहचते. नेरळ ते माथेरान या मार्गावर सध्या नेरळ होऊन दोन तर माथेरानवरून दोन अशा चार फेऱ्या नेहमी सुरू आहेत. तर, माथेरान स्थानक ते अमन लॉज दरम्यान शटल सेवेच्या नियमित १६ फेऱ्या सुरू असतात. या फेऱ्यांना पर्यटकांचा इतका प्रतिसाद आहे की अनेकांना विना तिकीट परतावे लागत असल्याने पर्यटकांमध्ये नाराजी दिसून येत असते. या माथेरानच्या राणीला अर्थात या मिनिट्रेनला पर्यटकांकडून उदंड प्रेम मिळत असते. परंतु, या मिनिट्रेन सेवेच्या मर्यादित फेऱ्या पाहता पर्यटकांना, आबालवृद्धांना या सफारी पासून वंचित राहावे लागते आहे. त्यामुळे निदान माथेरानम धील मुख्य पर्यटन हंगामावेळीया फेऱ्यांमध्ये वाढ व्हावी ,अशी मागणी पर्यटकांमधून होत आहे.

> आम्ही दरवर्षी माथेरानला येतो. मुलांना या छोट्या झुकझुक गाडीची अर्थात मिनिट्रेनची आवड आहे. परंतु, या गर्दीच्या वेळी भरपूर वेळ रांगेत उभे राहून पण तिकीट मिळत नाही. पर्यटन हंगामावेळी तरी मिनिट्रेनच्या बोगी आणि फेऱ्या वाढविल्या पाहिजेत. बालगोपाळांसह जेष्ठ नागरिकांना सोयीचे होईल.
> – प्रणय कोळी,पर्यटक,ठाणे

# सन्मित्र कार्यालयाचा शुभारंभ

**। रेवदंडा । प्रतिनिधी ।**

साळाव जेएसडब्लू कंपनी काटा गेट नजीक सन्मित्र ट्रक वाहतुक संघ मुरूड-अलिबागच्या नूतन कार्यालयाचा शुभारंभ रविवारी (दि.२६) सकाळी अकरा वाजता संपन्न झाला. या निमित्त सन्मित्र ट्रक वाहतुक संघाच्यावतीने मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.



या कार्यक्रमाला अलिबाग नगरपालिकेचे माजी नगराध्यक्ष तथा सन्मित्र ट्रक वाहतुक संघ मुरूड-अलिबागचे अध्यक्ष प्रशांत नाईक यांच्या प्रमुख उपस्थितीसह उपाध्यक्ष नंदकुमार मयेकर, मोहन ठाकूर, सुयोग रोटकर, उझेर काटकर, सय्यदअली खान, जावेद गोरमे, तसेच आजी माजी पदाधिकारी व सर्व कमिटी सदस्य उपस्थित होते.

नूतन कार्यालय शुभारंभ प्रसंगी सन्मित्र ट्रक वाहतुक संघटना व रायगड मेडिकल असोसिएशनच्यावतीने आरोग्य तपासणी, तसेच प्रोपॅथ पॅथालॉजी लॅब यांच्यावतीने डोळे, रक्त, लघवी आदी शारिरिक तपासणी मोफत ठेवण्यात आली होती. या शिबिरास शासकीय वैदयकिय महाविद्यालयाचे डॉ. देवदत्त सुर्यवंशी, डॉ. छत्रपाल राऊत, डॉ. अक्षय ढाके, डॉ. निलेश जाधव, डॉ. संचित अग्रवाल, डॉ. उत्तम पांडे आदींचे सहकार्य लाभले.

# ‘वडखळ मॉडेल’ गाव बनवणार: राजेश कुमार रॉय

**। पेण । प्रतिनिधी ।**

वडखळ येथील तलावाच्या सुशोभीकरणाच्या कामाची पाहणी करताना जेएसडब्ल्यू स्टील कंपनीचे व्हाईस चेअरमन राजेश कुमार रॉय यांनी बोलताना सांगितले की, वडखळ ग्रामस्थांना मी एक चॅलेंज दिले होते की, वडखळ गाव महाराष्ट्रामध्ये आपल्याला एक मॉडेल गाव म्हणून विकसित करायचे आहे आणि ते चॅलेंज मी माझ्या स्वतःच्या जबाबदारीवर दिले होते. या कामासाठी लागणारी जबाबदारी कंपनी पूर्णपणे करणारच जेणेकरून भविष्यात वडखळकडे बघताना महाराष्ट्रातील एक उत्तम खेडं आणि डिजिटल खेडं म्हणून बघतील.



सुशोभिकरण झाल्यानंतर तलाव एक उत्तम पर्यटन स्थळ होऊ शकते. कारण या तलावाच्या भोवती असणारी संरक्षण भिंत, तसेच गार्डनिंग, त्याच्याभोवती जॉगिंग ट्रॅक आणि आठवडा बाजार अशी संपूर्ण या तळ्याची रचना सरपंचांसह त्यांच्या सहकार्यांनी भविष्याचा विचार करून केली आहे. तसेच, तलावामध्ये गणपती विसर्जनासाठी स्वतंत्र घाटाची व्यवस्था केली आहे. ही देखील कल्पना उत्तम आहे जेणेकरून भविष्यात या पाण्याचे प्रदूषण होणार नाही याची पूर्ण खबरदारी येथील ग्रामपंचायतच्या सर्व सदस्यांनी घेतलेली आहे. हा एक नाविन्यपूर्ण उपक्रम आहे.

तर सरपंच शिवानी विश्वास म्हात्रे यांनी सांगितले की, मला राजकारणातला अनुभव कमी असेल परंतु माझ्या सहकाऱ्यांच्या अनुभवाची भेटणारी मोलाची साथ यावर गावाचा कायापालट भविष्यात नक्कीच होणार मी पदभार सांभाळल्यानंतर अवघ्या सहा महिन्याच्या आतच या गावांमध्ये विकासाच्या कामांना सुरूवात केलेली आहे. ती कामे नक्कीच गावाच्या भूषणावल असतील. माझे सहकारी मला पूर्णपणे मदत करत आहेत मग त्यामध्ये योगेश पाटील असतील निलेश म्हात्रे असतील तसेच उपसरपंच मत्स्यगंधा म्हात्रे असतील व माझे ग्रामपंचायतीतील सर्व सदस्य यांच्या सहकार्याशिवाय ही कामे करणे मला सोपे नव्हते. परंतु आज आपण एक एक पाऊल विकासाच्या दृष्टीने या ग्रामपंचायतीमध्ये उचलत आहोत. नक्कीच भविष्यात या गावाचा कायापालट झाल्याशिवाय राहणार नाही, असे शिवानी म्हात्रे म्हणाल्या.

या प्रसंगी उपसरपंचा मत्स्यगंधा म्हात्रे, सदस्य नूतन म्हात्रे, विनोदिनी कोळी, योगिता मोकल, मनाली पाटील, अपुर्वा म्हात्रे, अनिकेत म्हात्रे, मिलींद मोकल, संजय पवार, सुनिल जांभळे, दिलीप पाटील, महेंद्र पाटील, रविंद्र पाटील, अनिकेत म्हात्रे, पांडूरंग म्हात्रे, प्रभाकर म्हात्रे आणि ग्रामसेवक विकास कुंभार आदी उपस्थित होते.

# उरणचा कायापालट होणार

**। उरण । वार्ताहर ।**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला जोडणारा अटल सेतू उरण, पनवेल, नवी मुंबईसाठी वरदान ठरला आहे. अवघ्या २५ मिनिटात नवी मुंबई गाठता येत असल्यामुळे अनेक महत्वाकांक्षी प्रकल्प या भागाचा चेहरा मोहरा बदलून टाकण्यासाठी सज्ज झाले आहेत. उरण शहरातील ‘ग्रँड उरण सेंट्रल’ हा प्रोजेक्ट रितेश म्हात्रे व राजेश म्हात्रे या दोघांनी सत्यात उतरवून उरणच्या विकासाला हात घातला आहे.




उरणचा चेहरामोहरा बदलवून टाकणारा हा प्रकल्प उरणमध्ये उभा राहत आहे. या रेरा अप्रोव्हड प्रोजेक्टममध्ये अपग्रेडेड लाईफ स्टाईल, अपग्रेडेड फ्युचरसाठी गुंतवणूक करणे अत्यंत फायदेशीर ठरणार आहे. अटल सेतूपासून अवघ्या १५ मिनिटांच्या अंतरावर असलेला ‘ग्रँड उरण सेंट्रल‘ विविध सोयीसुविधांनी उपयुक्त असा आहे. ‘अल्टो फिन’ ही नवी मुंबईतील विकासकांमध्ये नावाजलेली संस्था हा उरणचा कायापालट करणारा प्रीमियम कमर्शिअल प्रोजेक्ट उभारत आहे. उरणच्या मातीची चांगली जाण असलेले स्थानिक विकासक रितेश म्हात्रे आणि राजेश म्हात्रे या भावांनी उरणच्या परिवर्तनासाठी पाहिलेले हे सर्वांग सुंदर असे स्वप्नातील ‘ग्रँड उरण सेंट्रल’ आता प्रत्यक्षात उभे राहणार आहे. सहज परवडेल असा पण अत्यंत सुंदर असं मॉर्डन इन्फ्रास्ट्रक्चर असलेला हा महत्वाकांक्षी प्रोजेक्ट आहे. या प्रोजेक्टमध्ये प्रीमियम शॉप्स, ऑफिसेस, घरे आणि बरेच काही मिळणार आहे. हा प्रोजेक्ट फक्त कमर्शिअल नसून रेसिडेंसिअल सुद्धा असणार आहे.

## घरगुती गॅस लाईनची गळती

**पनवेल :** बिरमोले हॉस्पिटल शेजारी गणेश छाया बिल्डिंग येथे रिकन्स्ट्रक्शनचे काम चालू आहे. त्या ठिकाणी पोकलेन खोदकाम चालू असताना जमिनीखालून जाणाऱ्या घरगुती गॅसची लाईन तुटली आणि मोठ्या प्रमाणात गॅसची गळती झाली. रविवार आणि त्यात दुपारची वेळ असल्याकारणाने पटकन लक्षात आले नाही. यावेळी मोठा आवाज आल्याने त्वरित महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाला आणि महानगर गॅस अधिकाऱ्यांना फोन केले असता त्वरित येऊन त्यांनी मुख्य लाईन बंद केली. नागरिकांच्या जागृतेमुळे मोठा अनर्थ टळला.



● मुरुड समुद्रकिनारी उन्हाळी सुट्टीसाठी आलेले पर्यटक लाटांमध्ये कुल कुल होण्याचा आनंद लुटत होते. (छाया - सुधीर नाझरे)

# गिरिषा, गौरीचे सीबीएसई परिक्षेत यश

**। रायगड । खास प्रतिनिधी ।**

घरची आर्थिक परिस्थिती उत्तम आणि शैक्षणिक संस्कार असल्याने गुणवंत मुलांचे शिक्षणही तेवढ्याच तोलामोलाच होते. घरात आजी आजोबा, आईवडील जर उच्च शिक्षीत असतील तर त्यांची मुलं ही त्याच पाऊलवाटेवर चालत रहातात. या पाऊल वाटेवर पेणमधील दूरशेत गावच्या दोन सुकन्यांनी आपल्या आईवडिलांच्या इच्छा आकांक्षा पूर्ण करण्याच शिवधनुष्य लिलया उचलले आहे. गिरिजा श्रीकांत गावंड हिने सीबीएसई बारावीच्या परिक्षेत ९३.४०% गुण मिळवून उज्वल यश प्राप्त केले आहे, तर तिची धाकटी बहीण गौरी श्रीकांत गावंड हिने सीबीएसई दहावीच्या परिक्षेत ९०.६०% गुण मिळवून उज्वल यश प्राप्त केले.



ॲड. श्रीकांत विठ्ठलराव गावंड, (अतिरिक्त सरकारी वकील मुंबई उच्च न्यायालय ) आणि डॉ. शितला श्रीकांत गावंड यांच्या या मुली आहेत. त्यांचे आजोबा ॲडव्होकेट विठ्ठलराव गावंड यांच्या पाऊलवाटेने जाण्यासाठी उंच भरारी घेऊन आपले उज्वल शैक्षणिक करिअर घडविण्यासाठी उत्तम गुणवत्ता सिद्ध केली आहे.

## बुद्धविहारात बुद्ध पौर्णिमा साजरी

**। वावोशी । वार्ताहर ।**

कर्जत तालुक्यातील आवळस येथील श्रावस्ती बुद्धविहारात बुद्ध पौर्णिमा मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. बुद्ध भूषण मित्र मंडळ व सावित्री महिला मंडळाच्या विशेष पुढाकाराने या कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला भारतीय बौद्ध महासभेचे कर्जत तालुका संघटक व धम्म प्रचारक नामदेव जाधव यांचे वैशाखी पौर्णिमा आणि तथागत सिद्धार्थ गौतम बुद्ध यांचा जीवनपट या विषयावर प्रवचन संपन्न झाले.

यावेळी या कार्यक्रमाला श्रामणेर जाधव, नामदेव जाधव, रविंद्र जाधव, प्रकाश जाधव, संतोष जाधव, बबन घोडके, दीपक जाधव, अजय जाधव, शांताराम जाधव, कमलाकर जाधव, अनंता गायकवाड, श्याम जाधव, समीर जाधव, विशाल गायकवाड, सतीश जाधव, सचिन जाधव, आकाश वाघमारे, यश जाधव आदी सर्व उपासक/उपसिका, बाल मित्र मंडळ या कार्यक्रमाला मोठ्या उपस्थित होते.

# तीर्थक्षेत्र पाली येथे भक्तांची मांदियाळी

**। पाली/गोमाशी । वार्ताहर ।**

सुधागड तालुक्यातील अष्टविनायक तीर्थक्षेत्र असलेल्या बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी पाली येथे शनिवार, रविवार आणि उन्हाळी सुट्ट्यांनिमित्त पुणे-मुंबईसह महाराष्ट्रातील निरनिराळ्या ठिकाणच्या पर्यटकांची पावले वळतात. पाली येथे बल्लाळेश्वर मंदिर, सरसगड, सुधागड किल्ल, उन्हेरे गरम पाण्याचे कुंड, ठाणाळे, गोमाशी लेण्या पाहण्यासाठी पर्यटकांसह शाळकरी व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा ओघ प्रचंड आहे. यामुळे पर्यटनावर अवलंबून असलेले हॉटेल व्यावसायिक, खानावळी, दुकानदार तसेच कडक उन्हाळा असल्यामुळे रसवंती गृहे यांची सध्या चलती आहे. यावेळी परिसरातील दुकाने, हॉटेल व लॉज ग्राहकांनी गजबजले होते. येथील हॉटेल, खेळण्याची व शोभिवंत वस्तुंची दुकाने, नारळ, हार, फुले व पापड मिरगुंड, कडधान्य विक्रेते, रानमेवा, हापूस आंबा, पिकलेली करवंद, प्रसाद व पेढेवाले होते.



# नागोठण्यात युरिया खताचा पुरवठा

## शेतकऱ्यांची खत खरेदीसाठी गर्दी

**। नागोठणे । वार्ताहर ।**

नागोठण्यात आर.सी.एफ. कंपनीच्या युरिया खताचा तुटवडा असल्याचे वृत्त कृषीवल वर्तमानपत्रात चार दिवसांपूर्वी धडकले होते. त्यामुळे खडबडून जागे झालेल्या आर.सी.एफ. कंपनीच्या युरिया खताचे वितरण करणाऱ्या यंत्रणेकडून खताचा पुरवठा जिल्ह्यात तात्काळ सुरू केला आहे. त्यामुळे नागोठण्यातील कृषी सेवा केंद्रांतही युरिया खताचा पुरवठा करण्यात आल्याने नागोठणे विभागातील शेतकऱ्यांनी येथील वाघ कृषी सेवा केंद्रावर गर्दी केल्याचे दिसून आले.

शेतकऱ्यांना आवश्यक असलेली भात बियाणे व खताचा पुरवठा हा जवळच्या कृषी सेवा केंद्रातून केला जातो. दुर्गम भागातील व आदिवासी वाड्यांवरील शेतकरी बांधव भाताबरोबरच खत (युरिया) सुध्दा एकत्रितपणे सोबत घेऊन जात असतात. जिल्ह्यातील बहुतेक कृषी केंद्रावर भात बियाणे मोठ्या प्रमाणात उपलब्ध झालेले दिसून येत असतांनाच युरिया खताचा पुरवठा आर.सी.एफ कंपनीने न केल्याने हे खत कृषी सेवा केंद्रांवर उपलब्ध न झाल्याने शेतकरी बांधवांतून तीव्र संताप व्यक्त करण्यात आला होता. मात्र, आता हे खत उपलब्ध झाल्याने शेतकरी वर्गात आनंदाचे वातावरण आहे.




# जंजिरा जलदुर्गावर शुकशुकाट

## पर्यटकांची बाह्य दर्शन घेत घरवापसी

**। मुरूड-जंजीरा । वार्ताहर ।**

**मुरुड पर्यटन क्षेत्रापैकी राजपुरी येथील ऐतिहासिक जंजिरा किल्ला हा किल्ला शुक्रवारपासून पुरातत्व विभागाकडून बंद करण्यात आला आहे. तरीही पर्यटक आपापली वाहने घेऊन राजपुरी, खोरा जेट्टीवर येऊन घरवापसी करीत असल्याचे रविवारी (दि.२६) दिसून आले. परंतु, शिडाच्या बोटींतून राजपूरी जवळील जंजिराचे बाह्य दर्शन दाखविण्यात आले. जंजिरा कुलूपबंद असल्याने आतून निर्मनुष्य असल्याचे दिसून आले.**



पर्यटकांनी जंजिरा बंद असल्याने घरवापसी होण्याआधी मुरूडमधील समुद्राकडे कूच केले. समुद्रकिनारे रविवारी सकाळी पर्यटकांच्या वर्दळीने आधिक फुलून गेले होते. सकाळी सुमारे १५० वाहने दाखल झाल्याची माहिती मुरूड नगरपरिषद टोल नाका कर्मचारी यांनी दिली. तसेच, समुद्रात धडकी भरविणाऱ्या मोठ्या लाटा उसळताना दिसत होत्या. अखेर जंजिऱ्याचे बाह्य दर्शन घेऊन आलेल्या पर्यटकांनी घरवापसी करणे पसंद केले.

### अतिउत्साही हौसेला मोल नसते

जंजिरा जलदुर्ग पाहण्यासाठी छोट्या मुलांपासून जेष्ठ मंडळीपर्यंतचे पर्यटक येत असतात हे खरे आहे. मात्र, शनिवारी एक ८ महिन्याची गरोदर महिला देखील जंजिरा पाहण्यासाठी खोरा जेट्टीवर आली होती. जंजिरा बाहेरून तरी पहावा, असे तिचे मत होते. तिचे डॉक्टर पती सोबत होते. प्रतिक्षलयात बसलेल्या महिलेला उसळणाऱ्या लाटांची परिस्थिती पाहता सुरक्षित आरोग्याच्या दृष्टीने जाऊ नये, असे सांगण्यात आले. तरीही आम्हाला जंजिरा पाहू द्या, असे म्हणत डॉक्टर पतीने आग्रह धरला. गरोदरपणाची एकूण स्थिती पाहता तिला जाऊ देण्यात मज्जाव करण्यात आला. म्हणजेच अतिउत्साही हौसेला मोल नसते, हेच यातून दिसून येते.

## सप्लाय बॉक्स ठरतोय मृत्यूचा सापळा

**कोर्लई :** मुरुड शहरातील एकदरा पुलाजवळ मुख्यरस्त्यावर महावितरणचा ४४० व्होल्ट सप्लाय बॉक्स झाकण नसल्याने मृत्यूचा सापळा ठरत असून स्थानिक नागरिकांनी संबंधित महावितरणच्या अधिकाऱ्यांना दूरध्वनीद्वारे कळवूनही याकडे दुर्लक्ष होत असल्याने तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. मुरुड शहरांमध्ये जमीनीखालून वीज पुरवठा सुरू होणार होता. कित्येक वर्षांपूर्वी त्या संदर्भात जमीनीखालून वीज वाहिन्या टाकण्यात आल्या व ठीक ठिकाणी ४४० व्होल्ट सप्लाय बॉक्स बसविण्यात आले आहेत. परंतु हे सप्लाय बॉक्स गंजून त्याचे दरवाजे निखळून पडलेले आहेत.

# अब्रू राहिली की गेली?

लोकसभा निवडणुकीची घोषणा करताना निवडणूक आयुक्त राजीवकुमार यांनी बरीच शेरोशायरी केली होती. सर्व जग आपल्याकडे पाहते आहे. त्यामुळे आम्ही पारदर्शकतेचा आदर्श घालून देणार आहोत असा त्यांचा दावा होता. पण तो शंकास्पद असल्याचे अवघ्या दीड महिन्यात सिध्द करून दाखवले आहे. मतदानाची आकडेवारी देण्यावरून आयोगाने जो घोळ घातला आहे तो अभूतपूर्व आहे. याबाबतची याचिकेवर तातडीने निर्देश देण्यास सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी नकार दिला. यामुळे आयोगाची अब्रू बचावली असली तरी जनतेच्या मनात निर्माण झालेल्या शंका मात्र फिटलेल्या नाहीत. मतदान झाल्यापासून ४८ तासांच्या आत अंतिम आकडेवारी जाहीर करून ती आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करावी अशी मागणी याचिकेत करण्यात आली होती. न्यायालये एरवीही निवडणूक प्रक्रियेत हस्तक्षेप करण्याचे टाळतात. त्यात मतदानाच्या चार फेऱ्या आधीच उलटून गेल्या आहेत. आता ते चक्र उलटे फिरवणे तसे कठीणच होते. ते आयोगाच्या पथ्यावर पडले. वास्तविक पूर्वी कागदी मतपत्रिकांचा वापर होत असे तेव्हाही आकडेवारी देण्यात आयोगाला कधीही अडचण आलेली नव्हती. त्यावेळी मतदानाच्या दिवशी संध्याकाळीच तात्पुरती आणि दुसऱ्या दिवशी पक्की व अंतिम आकडेवारी जाहीर होत असे. मतदान किती झाले त्याचे आकडे, टक्केवारी, पुरुष, स्त्री यांची वर्गवारी यांचा त्यात समावेश असे. आता इव्हीएमसारख्या आधुनिक यंत्राद्वारे मतदान होते. प्रत्येक यंत्रात किती मते नोंदली गेली यांची बेरीज एका क्षणात मिळू शकते. मात्र सध्याच्या निवडणूक आयोगाने केवळ मतदानाची टक्केवारी देण्याचा सपाटा लावला. ही टक्केवारी मोघम व हंगामी असते. त्यात पुढचे चार दिवस सतत बदल होत राहतात. १९ एप्रिल व २५ एप्रिलला मतदानाच्या पहिल्या दोन फेऱ्या झाल्या. मात्र त्याची अंतिम टक्केवारी जवळपास आठवडाभरानंतर देण्यात आली. शिवाय, मतदानाची नेमकी आकडेवारी (अमुक लाख, अमुक हजार अशा स्वरुपात) दिलीच गेली नाही.

### सतरा नंबर फॉर्मचा गोंधळ

पहिल्या चार फेऱ्यांमध्ये सतत असे गोंधळ चालू राहिले. अनेक ठिकाणी आधीचे आकडे नंतर दोन-तीन टक्क्यांनी वाढले. मोदी सरकारच्या हस्तक्षेपातून यात काही गडबड होते आहे की काय असे आरोप होऊ लागले. त्यामुळे मग फॉर्म १७ चा मुद्दा पुढे आला. प्रत्येक बूथवर मतदानाच्या वेळी सर्व पक्षांचे प्रतिनिधी हजर असतात. दिवसअखेरीस या प्रत्येकाला सतरा सी हा फॉर्म दिला जातो. त्यात त्या बूथवरचा मतदानाचा अंतिम आकडा नोंदलेला असतो. मतमोजणीच्या वेळी इव्हीएम यंत्रे उघडली जातात तेव्हा त्या यंत्रात नोंदली गेलेली मते आणि हा आकडा एकच असावा लागतो. त्यात फरक झाला तर मधल्या काळात यंत्रांमध्ये काहीतरी गडबड केली आहे असा संशय घेता येतो. किंबहुना, अशी अफरातफर टाळण्यासाठीच ही फॉर्म १७ ची कडेकोट व्यवस्था करण्यात आली आहे. मात्र यंदा निवडणूक आयोगाने काही उमेदवारांच्या प्रतिनिधींना फॉर्म १७ देण्यास टाळाटाळ केली अशा बातम्या आल्या. त्यात कितपत तथ्य होते हे सांगणे कठीण आहे. दुसरे म्हणजे, जेव्हा आयोगाने मतदानाची आकडेवारी देण्यात दिरंगाई सुरु केली तेव्हा सर्व मतदारसंघातले फॉर्म १७ वेबसाईटवर टाकावेत अशी मागणी झाली. मात्र सध्याच्या काळात डिजिटल फसवाफसवी भयंकर बोकाळली आहे. त्यामुळे वेबसाईटवरील फॉर्म सतरावरून बनावट किंवा फेक फॉर्म तयार करून खोटी आकडेवारी सादर केली जाईल व मतमोजणीच्या वेळी गोंधळ उडेल असा दावा आयोगाने केला. यात थोडेफार तथ्य जरूर आहे. पण मुळात फॉर्म १७ ची चर्चा विनाकारण सुरू आहे. प्रत्येक बँकेच्या शाखेत दर दिवशी रोख रकमेचा भरणा किती झाला याचा हिशेब केला जातो व तो मुख्यालयाला पाठवावा लागतो. त्यासाठी त्या त्या शाखेत खातेदारांनी भरलेल्या रकमेची बेरीज केली जाते. पूर्वी रजिस्टरमधल्या नोंदीवरून प्रत्यक्ष आकडेमोड केली जाई. आता संगणकीकरण झाल्याने हे सोपे झाले आहे. शिवाय सर्व संगणक एकमेकांना जोडलेले असल्याने प्रत्येक क्षणी अशा भरणा रकमेचा तपशील मिळू शकतो.

### जनतेच्या विश्वासाला तडे

त्यामुळे सध्याच्या काळात एखाद्या बँकेने अशा रकमेचा तपशील देण्यास नकार दिला किंवा रकमेचा आकडा काही दिवसांनी कमी किंवा जास्त होऊ लागला तर ती काहीतरी लपवते आहे असेच समजले जाईल. तिला तो तपशील देणे भाग पाडणे हेच रिझर्व्ह बँकेचे कर्तव्य असेल. त्याऐवजी समजा ही बँक असे म्हणू लागली की आम्हाला एकत्रित बेरीज शक्य नाही, मात्र आम्ही आमच्या सर्व शाखांमधील सर्व खातेदारांच्या त्या त्या दिवसाच्या व्यवहारांची पाने वेबसाईटवर अपलोड करतो, रिझर्व्ह बँकेने हवे तर या सर्व खात्यांची बेरीज करून स्वतःच आकडा काढावा. या स्थितीत जो गोंधळ होईल तोच सध्या चालू आहे. आपल्या शाखांमधील जमा रकमेची बेरीज करून एकत्रित आकडा देणे हे जसे त्या त्या बँकेचे काम आहे त्याच धर्तीवर मतदानाचा एकत्रित व अंतिम आकडा देणे ही आयोगाची जबाबदारी आहे. तो ती टाळू शकत नाही. प्रत्येक बूथवरची मतदानाची एकूण आकडेवारी काढणे हे काही एखादे इंजिनिअरिंगचे अवघड गणित नव्हे. अगदी शाळकरी मुलांनाही सहज जमेल असा हा प्रकार आहे. आजवर आयोगाच्या कर्मचाऱ्यांना ते जमत होतेच. यंदाच नेमक्या काय अडचणी आहेत याची यादी निवडणूक आयोगाने द्यायला हवी. अन्यथा, आयोगाच्या प्रामाणिकपणाविषयी शंका घेतली जाईल. किंबहुना, ती निर्माण झाली आहेच. नरेंद्र मोदी यांनी सीबीआय, ईडी यांच्यासारख्या यंत्रणा व निवडणूक आयोगासारख्या संस्थांची स्वायत्तता खलास केली आहे. मोदींनी हिंदू-मुस्लिम तेढ निर्माण होईल असा उघड प्रचार करूनही निवडणूक आयोग गप्प आहे. आता ठोस आकडेवारी देण्यातही आयोग कुचराई करतो आहे. यातून उद्या लोकांचा निवडणुका व लोकशाहीवरचा विश्वास उडाला तर तिला दोष देता येणार नाही.

विचार

# सोन्याच्या बाजारपेठेत काय घडतेय?

***सध्या जगातील वेगवेगळ्या देशांच्या मध्यवर्ती बँका सोन्याची खरेदी करत सुटल्या असल्या, तरी आगामी दोन तिमाहींच्या दरम्यान या खरेदीचा वेग घटेल, असा अंदाज आहे. मागील पाच वर्षांमध्येच भारतातील सोन्याचे भाव दुपटीपेक्षा जास्त झाले. आज अनेक बड्या कंपन्या या क्षेत्रात उतरल्या आहेत. मात्र गोल्ड लोन देणाऱ्या कंपन्यांच्या आमिषांपासून कर्जदारांनी सावधच राहिले पाहिजे.***

हेमंत देसाई

प्रगतिशील, सुधारणावादी, विचारी आणि सर्वसमावेशक सरकारला सत्तेवर आणायचे की १९९२ पूर्वीची अराजकसदृष्य व्यवस्था स्वीकारायची असे दोनच पर्याय देशापुढे आहेत. कोणताही गुंतवणूकदार दुसऱ्या पर्यायाला नापसंतच करेल, असे उद्गार देशाचे परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी काढले आहेत. नॅशनल स्टॉक एक्सचेंजच्या (एनएसई) मुंबईतील मुख्य इमारतमध्ये 'ॲन्मी' या शेअर दलालांच्या संघटनेने आयोजित केलेल्या भांडवली बाजाराबाबतच्या परिसंवादात भाषण करताना त्यांनी हे विचार मांडले. मात्र दोन वर्षांपूर्वी एनएसईच्या माजी मुख्याधिकारी चित्रा रामकृष्ण यांना 'धांदली' केल्याबद्दल अटक करावी लागली होती, याचे विस्मरण जयशंकर यांना झाले असावे. त्याचप्रमाणे 'पेटीएम'सारख्या कंपनीबाबत काही आक्षेपार्ह घटना घडल्या होत्या. शेअर बाजारावर अत्यंत बारकाईने लक्ष ठेवण्याची गरज 'सेबी'ला वाटण्याचे अनेक प्रसंग घडले आहेत. त्यामुळे केवळ १९९२ नंतरच नव्हे, तर २०१४ नंतरही गुंतवणुकीची बाजारपेठ बऱ्याचदा संकटात सापडली होती, हे विसरता कामा नये. सार्वत्रिक निवडणुकांनंतर स्थिर आणि समर्थ सरकार येईल का, यावर शेअर बाजारात तेजी की मंदी, हे अवलंबून असेल. परंतु केवळ शेअर बाजार, म्युच्युअल फंड आणि जमिनी-फ्लॅट्स एवढेच नव्हे, तर सोन्यातही लक्षणीय प्रमाणात गुंतवणूक केली जाते.

जगभर लोक सोन्यात गुंतवणूक करतात आणि भारतात नागरिकांची सोन्यामध्ये भावनिक गुंतवणूकही असते. मुलामुलींच्या लग्नासाठी लोक सोने खरेदी करून ठेवतात. ऐपत नसतानाही प्रथा म्हणून सोने घेतात. तसेच संकटाच्या वेळी उपयोगी पडेल, म्हणूनही सोन्याची खरेदी केली जाते. गेल्या अडीच वर्षांमध्ये सोन्याच्या गुंतवणुकीवर ५० टक्के 'कंपाउंड ॲन्युअल ग्रोथ रेट' मिळाला, अशी माहिती ॲक्सिस सिक्युरिटीजच्या वस्तू बाजार विभागाच्या तज्ज्ञांनी दिली आहे. यावेळी अक्षय्यतृतीयेच्या दिवशी भारतात सोन्याची तुफान खरेदी झाली. दसरा, दिवाळी, गुढीपाडवा, त्याचप्रमाणे विवाह सोहळ्यानिमित्त मोठ्या प्रमाणात सोन्याची खरेदी केली जाते. गोल्ड एक्स्चेंज ट्रेडेड फंडातही लक्षणीय प्रमाणात पैसे टाकले जातात. सध्या युक्रेन, गाझापट्टी अशा विविध ठिकाणी युद्धे सुरू असल्यामुळे बाजारपेठेत अनिश्चितता निर्माण झाली आहे. त्याचप्रमाणे जगातील मध्यवर्ती बँका आपले सुवर्णसाठे वाढवत आहेत.

सोन्याचे भाव दहा ग्रॅमला ७० हजार रुपयांवर जाऊन पोहोचले आहेत. मार्चमध्ये तर ते भाव ७३ हजार रुपयांवर गेले होते. शेअर्स आणि कर्जरोख्यांप्रमाणेच एकदा बाजाराने शिखर गाठले की सुवर्ण बाजारातही तांत्रिक घसरण होऊ शकते. तशी ती एप्रिलमध्ये झालीही. २०१४ मध्ये २४ कॅरेटच्या दहा ग्रॅम सोन्याची किंमत सुमारे ३० हजार रुपये होती. ती २०१५ मध्ये २७ हजार रुपयांवर आली आणि नंतर मात्र २०१७ चा अपवाद वगळता, सातत्याने वाढत वाढत आजच्या पातळीवर आली आहे. विशेष करून २०२० मध्ये एकाच वर्षात सोन्याचे भाव ३१ हजारवरून ४६ हजार रुपयांवर गेले तर २०२३ मध्ये अंदाजे ५९ हजार रुपये असणारा भाव २०२४ मध्ये ७० ते ७३ हजारच्या आसपास गेला आहे. मात्र गेल्या दोन वर्षांच्या तुलनेत सोन्यावरील परतावा कमी होईल. याचे कारण, २०२४ च्या उत्तरार्धात अमेरिकेतील व्याजदर घटतील आणि नंतर डॉलर वधारेल. या सर्व पार्श्वभूमीवर सोन्याच्या दरवाढीचा वेग मंदावेल, अशी शक्यता संपत्ती व्यवस्थापन क्षेत्रातील तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे.

सध्या जगातील वेगवेगळ्या देशांच्या मध्यवर्ती बँका सोन्याची खरेदी करत सुटल्या असल्या, तरी आगामी दोन तिमाहींच्या दरम्यान या खरेदीचा वेग घटेल, असा अंदाज आहे. सोन्यात निधी गुंतवल्यास सुरक्षितता आणि बऱ्यापैकी फायदा या दोन्ही गोष्टी साध्य होऊ शकतात. मागच्या पाच वर्षांमध्येच भारतातली सोन्याचे भाव दुपटीपेक्षा जास्त गतीने वाढले आणि २००३ च्या तुलनेत दहापट अधिक आहेत. ज्या ज्या वेळी सोन्याच्या भावात घसरण होते, त्या त्या वेळी संधी मानून त्यात गुंतवणूक करता येऊ शकते. अर्थात सोने टप्प्याटप्प्याने आणि कमी मात्रेत खरेदी करणे इष्ट असते. शिवाय आपली गुंतवणुकीची अल्पकालीन तसेच मध्यम व दीर्घ कालावधीची उद्दिष्टे काय आहेत, याचाही विचार करावा लागतो. भारतात प्रत्येक घरात सोने साठवून ठेवलेले असते, ते अडीअडचणीला कामी येते म्हणून. भारतीय स्त्रियांना स्त्रीधन, सौभाग्यालंकार म्हणून सोन्याचे एक आकर्षणही असते. त्यामुळे बरेचदा गरज असतानाही घरातले सोने न विकण्याकडे त्यांचा कल राहतो. म्हणूनच एखाद्या कुटुंबावर बेरोजगारीची संक्रांत येते आणि उत्पन्नपातळी खालावते, तेव्हाच गोल्ड लोन्स किंवा सोने गहाण ठेवून कर्ज घेण्यावर सर्वांचा भर असतो. आर्थिक संकटाच्या वेळी पटकन पैसे उभारण्याचा हा एक सहजसोपा मार्ग आहे.

या पार्श्वभूमीवर मुथुट, मणप्पुरम फायनान्ससारख्या कंपन्या फोफावलेल्या दिसतात. महानायक अमिताभ बच्चनला भरपूर मानधन देऊन जाहिरात करणेही अशा कंपन्यांना परवडते. कल्याण गोल्डसारखी कंपनी तर कॉर्पोरेट सुवर्णपेढीच आहे. सोने गहाण ठेवून, त्याच्या किमतीच्या ७५ टक्के कर्ज मिळू शकते. जेव्हा व्यक्तिगत वा गटकर्जे (अनसिक्युअर्ड लोन्स किंवा असुरक्षित कर्जे) ही उपलब्ध होत नाहीत, तेव्हा गोल्ड लोन्सची मागणी वाढते. बाजारात खूप अनिश्चितता असते, तेव्हा असुरक्षित कर्जे मिळत नाहीत. त्यावेळी गोल्ड लोन्सची मागणी जास्त असते. गोल्ड लोन अर्ध्या तासात मंजूर केले जाते. या कर्जावर फक्त व्याज द्यायचे आणि मुदत संपताना मुद्दल फेडायचे, असा पर्याय उपलब्ध होत असल्याचे मार्केटिंग या कंपन्यांकडून केले जाते. या कर्जाची फेड झाली नाही तर ते सोने ताब्यात घेऊन लिलाव केला जातो. एके काळी मुंबईत मोठ्या संख्येत कापड गिरण्या कार्यरत होत्या. तेथे हजारो कामगार काम करत होते. परळ, लालबाग, शिवडी, चिंचपोकळी, भोईवाडा, सातरस्ता या परिसरात चाळींमधून मराठी कामगारांच्या वस्त्या होत्या. त्यामुळे त्या परिसरात सराफांची संख्या लक्षणीय प्रमाणात होती. सोने विकण्यापेक्षा गहाणवटीचा व्यवसाय करणारे सोनार या भागात असत. आज बड्या बड्या कंपन्या या क्षेत्रात उतरल्या आहेत. मात्र गोल्ड लोन देणाऱ्या कंपन्यांच्या आमिषांपासून ऋणकोंनी सावधच राहिले पाहिजे.

अमेरिकन फेडरल रिझर्व्हने जून महिन्यात व्याजदरात कोणताही बदल न केल्यास डॉलर निर्देशांक आणि रोखे उत्पन्न वाढेल. त्यानंतर सोन्याच्या दरात आठ ते दहा टक्क्यांची घसरण दिसून येऊ शकते. फेडरल रिझर्व्हने जूनमध्ये व्याजदरात २५ बेसिस पॉईंट्सची कपात केली आणि येत्या काही दिवसांसाठी व्याजदरांबाबत आपली भूमिका स्थिर ठेवली तरी सोन्याच्या किमतीत घट दिसून येईल. सोन्याच्या भावाने व्याजदरात कपातीचा फायदा घेतला असल्याचे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. जून महिना सोन्यासाठी खूप मनोरंजक असणार आहे. याचे मुख्य कारण म्हणजे जूनच्या बैठकीत सोन्याच्या दराचे भवितव्य ठरणार आहे. गेल्या १८० ते २०० दिवसांमध्ये सोन्याच्या दरात २७ टक्क्यांनी वाढ झाली आहे. अशा स्थितीत दरात सुधारणा अपेक्षित आहे; मात्र या दुरूस्तीसाठी कारक असा कोणताही घटक अद्याप समोर आलेला नाही. आंतरराष्ट्रीय भू-राजकीय तणावापासून चीनची खरेदी आणि फेडरलकडून होणारी संभाव्य कपात सोन्याच्या भाववाढीला समर्थन देत असल्याचे दिसते. अशा स्थितीत जूनच्या बैठकीत फेडरल रिझर्व्हची भूमिका सोन्याच्या किमती ठरवेल. जूनमध्ये फेडरल रिझर्व्हची दरकपातीची शक्यता ५१.१ टक्क्यांवर आली आहे. याचा अर्थ फेडरल रिझर्व्हने जूनमध्ये व्याजदरात कोणतेही बदल न केल्यास सोन्याच्या किमतीत घसरण होईल. जूनच्या बैठकीत महागाईची आकडेवारी दाखवल्यानंतर फेडरल रिझर्व्हने दरावरील पॉज बटण पुन्हा दाबले तर सोन्याच्या किंमतीमध्ये सुधारणेचा ट्रिगर दाबला जाईल आणि किंमती आठ ते दहा टक्क्यांनी घसरतील.

याचा अर्थ सध्याच्या पातळीवरून सोन्याच्या दरात ६ ते ७ हजार रुपयांची घसरण दिसू शकते. म्हणजेच सोन्याचा भाव पुन्हा ६४ ते ६५ हजार रुपयांच्या दरम्यान घसरण्याची शक्यता आहे. देशातील फ्युचर्स मार्केटमध्ये सोन्याचा भाव ७१ हजार ७३९ रुपये प्रति दहा ग्रॅमवर पोहोचला होता, जो सोन्याचा नवा आजीवन उच्चांक ठरला. एप्रिल महिन्यात सोन्याच्या दरात सहा टक्क्यांनी वाढ झाली आहे तर चालू वर्षात गुंतवणूकदारांनी सोन्याच्या किमतीत बऱ्यापैकी कमाई केली आहे. बँकांना त्यांच्याकडील सोने बाजारात आणायला भाग पाडले गेले आणि अमेरिकन फेडरल रिझर्व्हने दरकपातीची घोषणा केली नाही तर सोन्याची झळाळी कमी होणार आहे.

आजकाल

# एनडीए पुन्हा सत्तेत येण्याची शक्यता कमी

तुषार गायकवाड

राजकीय रणनीतीकार प्रशांत किशोर म्हणजे राजकारणातील रमर पिल्लई. आता रमर पिल्लई कोण? तर १९९६ च्या दशकात पेट्रोल पाहण्यापासून हर्बल पेट्रोल तयार करुन विकणारा अवलिया. पिल्लईने चक्क तामिळनाडूचे तत्कालीन मुख्यमंत्री एम. करुणानिधी यांनाही गंडवून १० एकर जागा व ५० कमांडोंची फौज संरक्षणासाठी घेतली होती.

पिल्लईच्या हर्बल पेट्रोलने जगभरातील शास्त्रज्ञांना वेड लावले होते. सुमारे ३ वर्षे पिल्लई पैसे छापत राहीला. त्याच्या हर्बल पेट्रोलचे पेट्रोल पंपही तामिळनाडूत उभारले गेले. मात्र जेव्हा आयआयटीने या प्रकरणाचा तपास केला तेव्हा पिल्लईने सर्वांना गंडवलंय हे लक्षात आले. मग तिथून पुढे पिल्लईचा सन्मान सीबीआयने केला. तेव्हा त्याने आपण लोकांना गंडवल्याचे कबूल केले.

असो. तर सन्माननीय प्रशांत किशोर हे राजकीय रणनीतीकार म्हणून प्रसिध्द असले तरी त्यांना ठोस असा विचारधारेचा बेस नाही. हा मनुष्य २०१२ पासून मोदींना पंतप्रधान करण्यासाठी काम करत होता.

सोशल मेडीयाच्या माध्यमातून शेठची प्रतिमानिर्मिती, तथाकथित विकासाचे गुजरात मॉडेलचे विविध फोटोशॉप, डॉ. मनमोहन सिंग, सोनिया गांधी यांच्या बद्दल खोटे लिखाण प्रसवणे वगैरे करण्यात प्रशांत किशोरचा वाटा होताच.

२०१४ मध्ये शेठ पंतप्रधान झाले आणि प्रशांत किशोरला ट्रोजन हॉर्स म्हणून वापरण्याची कल्पना पुढे आली. त्यातूनच प्रशांत किशोरने आधी बिहार मध्ये नितीशकुमार आणि नंतर पश्चिम बंगाल मध्ये ममता बॅनर्जी यांच्यासोबत काम केले. मोदी, नितीशकुमार व ममता बॅनर्जी यांच्या विजयात प्रशांत किशोरचा सिंहाचा वाटा आहे असे दाखवण्यात आले.

मग ज्या काळात काँग्रेस स्वतःच्या पक्ष घटनेला तिलांजली देवून पूर्णवेळ अध्यक्षाविना अंधारात चाचपडत होती. त्या काळात प्रशांत किशोर काँग्रेस मध्ये घूसून गांधी कुटुंबीयांनी पक्ष संघटनेतून बाहेर पडावे असा मनसुबा घेऊन काम करायला तयार झाले. पण अशा लोकांना बळी पडेल ती काँग्रेस कसली?

काँग्रेसने प्रशांत किशोरला कोलले. सन २०२० मध्ये बिहार विधानसभा निवडणूकीत प्रशांत किशोर यांनी भाजपला ग्राउंड तयार करुन देण्यासाठी जनसुराज यात्रा वगैरे काढली. पण ऐन निवडणुकीच्या काळात साडेतीन महिने गायब झाले.

अर्थातच तेव्हा नितीशकुमार यांचा पक्ष संपवून भाजपा वरचढ ठरली. मात्र तेजस्वी यादवच्या करिष्यामुळे भाजपाने गपचूप नितीशकुमारांना मुख्यमंत्री पदी ठेवले.

बिहार मध्ये भाजपचा मुख्यमंत्री करण्याचा प्रशांत किशोरचा मनसुबा उधळला गेला. त्यानंतर त्यांनी परत एकदा २०२२ मध्ये काँग्रेसशी जवळीक करण्याचा प्रयत्न केला. मात्र तोसुध्दा फसला. आता लोकसभेच्या निवडणुकीत उरलेल्या दोन टप्प्यांत होणाऱ्या मतदानात कुंपणावरच्या मतदाराने भाजपला मतदान करावे यासाठी 'भाजप पूर्ण बहुमताने सत्तेवर येणार' असा दावा करायला प्रशांत किशोर यांना कोणी पुढे आणले हे सांगायला नकोच!

उर्वरित दोन टप्प्यांत भाजपला आजवरच्या सर्व टप्प्यांपेक्षा कमी मतदान होणार आहे. संपूर्ण एनडीए २३०+ जाईल अशी स्थिती दिसत नाही. रॅली काढण्यासाठी ७,५०० पोलीसांची फौज उतरवली जात असेल तर ओळखून जा ४ जूनचा निकाल काय असेल?

काल लोकसभेच्या चौथ्या टप्प्यातील मतदान प्रक्रिया पार पडली. कालच्या टप्प्यातील मतदान बऱ्यापैकी भाजपच्या पारड्यात असल्याचे निरीक्षण आहे. अनेक ठिकाणी साम दाम दंड भेद वापरुनही आलेल्या अपयशाने एनडीए २३० सीटांपेक्षा पुढे जात नसल्याचे निदर्शनास आले.

योगायोगाने कालच्या टप्प्यातील मतदानाच्या दुसऱ्याच दिवशी आज देशाच्या राजधानी दिल्लीतील इन्कम टॅक्स विभागाच्या कार्यालयाला भीषण आग लागली (?) सदर आग मोठ्या प्रमाणात असून आग नियंत्रणात आणण्यासाठी अग्निशमन दलाचे युध्द पातळीवर प्रयत्न सुरु आहेत.

आग नियंत्रणात आणण्यासाठी अग्नीशमन दलाच्या १० पेक्षा जास्त गाड्या कार्यरत आहेत. लोकसभा निवडणूक सुरु झाल्यापासून केंद्रीय गृहमंत्रालयाचे कार्यालय जळाले. वायू सेनेचे कार्यालय जळाले. आज तर चक्क इन्कम टॅक्स विभागाचे कार्यालय जळालेय.

या सर्व घटनाक्रमाचा इशारा एनडीए बहुमताने सत्तेवर येत नसल्याकडे आहे. हेच चौथ्या टप्प्यातील मतदानाच्या नंतरचे विश्लेषण आहे. **(साभार)**

## लोकसंसद

### रेल्वेच्या आउटडेटेड जाहिराती

मुंबई ठाणे तसेच नवी मुंबईतून धावणाऱ्या लोकल रेल्वेच्या रेल्वे स्थानकांवर होणाऱ्या सदोष उदघोषणा हा नेहमीच चर्चेचा विषय बनलेला असतो. खासरून मराठी उदघोषणा इतक्या अशुद्ध आणि शब्दांची मोडतोड करून तयार केलेल्या असतात कि मराठी प्रवाशांना त्या समजून घ्याव्या लागतात. लोकल रेल्वे गाडयांतून पुढे येणाऱ्या रेल्वे स्थानकाच्या पूर्वसूचनेव्यतिरिक्त अन्य सूचना देण्यास कोरोना काळापासून सुरुवात झाली. कोरोना मुंबईतून हद्दपार झाल्यानंतर आणि राज्य प्रशासनाने घातलेले सर्व निर्बंध हटवल्यानंतरही कित्येक दिवस या सूचना रेल्वे गाडयांतून ऐकायला मिळत होत्या. अखेर अनेक प्रवाशांनी वारंवार तक्रारी केल्यानंतर या सूचना बंद करण्यात आल्या. लोकसभेच्या एकूण ७ टप्प्यापैकी ६ टप्पे पार पडले आहेत ज्यापैकी संपूर्ण महाराष्ट्रात पहिल्या ५ टप्प्यांत निवडणूका पार पडल्या. राज्यातील निवडणुका संपल्या नंतरही नागरिकांना मतदान करण्याचे आवाहन करणाऱ्या सूचना मात्र रेल्वे प्रशासनाने अद्याप थांबवलेल्या नाहीत. आजही या सूचना लोकल रेल्वेतून सातत्याने ऐकायला मिळतात. याखेरीज रेल्वेला मिळणाऱ्या प्रदर्शनाच्या, महोत्सवांच्या ऑडियो जाहिराती सुद्धा हें कार्यक्रम झाल्यानंतर कित्येक दिवस ऐकायला मिळतात. या जाहिरातीचे नियोजन करणारा विभाग रेल्वे प्रशासनाकडे अस्तित्वात आहे कि नाही असा प्रश्न या जाहिराती ऐकल्यावर पडतो.

**- सौ. मोक्षदा घाणेकर, काळाचौकी, मुंबई**

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**२७ मे**

**१८३१ :** लोकभाषांचे अभ्यासक केशव शिवराम भवाळकर (जोशी) यांचा जन्म. 'वऱ्हाडी भाषेचे व्याकरणविशेष'आणि 'गोंड लोक व गोंड भाषा' या दोन निबंधासह काही चरित्रात्मक लेख व 'आत्मवृत्त' त्यांनी लिहिले होते. **१९०१ :** तत्ववेत्ते, विश्वकोशाचे संपादक, वेदांचे गाढे अभ्यासक तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचा जन्म २८ जानेवारी १९०१ रोजी झाला. वेदांचा अवघ्या सहाव्या वर्षी अभ्यास करणाऱ्या शास्त्रीजींनी पुढे कलकत्याच्या संस्कृत महाविद्यालयातून तर्कतीर्थ ही पदवी संपादन केली. स्वातंत्र्यसंग्रामात भाग घेऊन कारावासही पत्करला. त्यांचे साहित्यिक योगदान फार मोठे आहे. त्यांच्या लेखणीतून साकारलेला धर्मकोश म्हणजे वैदिक धर्माचा विश्वकोश मानला जातो. स्वामी केवलानंदांच्या प्रेरणेने धर्मकोशाचे कार्य त्यांनी हाती घेतले. त्यानंतर आनंदीमीमांसा हिंदूधर्माची समीक्षा, जडवाद, वैदिक संस्कृतीचा इतिहास, आधुनिक मराठी साहित्याची समीक्षा, रससिद्धांत तसेच राजवाडे लेखसंग्रह आणि लोकमान्य टिळक लेखसंग्रह आदी ग्रंथ त्यांच्या नावावर आहेत. महाराष्ट्र शासनाने साहित्य संस्कृतीमंडळाचे काम त्यांच्यावर सोपवले असता त्यांनी विश्वकोशाची योजना आखली. जगातील सर्व विषयांचे अद्यावत ज्ञान एका व्यापक योजनेखाली संकलित करणारा हा 'मराठी विश्वकोश' तर्कशास्त्रीय देणे आहे. याखेरीज उपनिषदांचे मराठी भाषांतर त्यांनी केले. विविध वर्तमानपत्रे, साप्ताहिक या मधून विपूल प्रमाणात लेखन त्यांनी केले आहे. पद्मभूषण पद्मविभूषण पुरस्काराने सन्मानित झालेल्या तर्कतीर्थ यांचे प्राण २७ मे १९९४ रोजी पंचत्वात विलीन झाले. **१९०६ :** तिसरे 'मराठी ग्रंथकार संमेलन' सातारा येथे र.पा. करंदीकर यांच्या अध्यक्षतेखाली भरले. **१९२४ :** विनोदी लेखक म्हणून अधिक गाजलेले बाळ गंगाधर सामंत यांचा जन्म. 'मस्करी', 'गोंधळ', 'नवरा बायको', 'करामत' आदी तब्बल ४० पुस्तके त्यांच्या नावावर आहेत, त्यात 'मराठी नाट्यसंगीत', 'रिचर्ड बर्टनचे चरित्र (शापित यक्ष)', 'बालगंधर्व हिटलर', 'मरणात खरोखर जग' 'प्रेमग्रंथ' असे वैविध्यही आहे. 'लोकसत्ता'साठी त्यांनी 'न संपणाऱ्या गोष्टी' हे सदर लिहिले होते. जानेवारी २००९ मध्ये त्यांचे निधन झाले. **१९३१:-** साहित्यिक, प्रकाशक, पत्रकार गोविंद केळकर यांचा जन्म. 'आतुरलेले मन', 'जीवनयात्रा', 'जान्हवी' मिळून ७ कादंबऱ्या, 'हसले मधू चांदणे', 'डोह', 'गहिवर' मिळून ५ कथासंग्रह. 'बकुलगंध', 'पंढरी', 'गंधाली' मिळून १० काव्य संग्रह. तसेच 'अभयकुमार', 'मोत्यांचा कंठा', 'राजा सतीश', 'देवदूत', 'सती रेणुका' हे कुमारांसाठी आणि श्री स्वामी समर्थांचे चरित्र मिळून ३२ पुस्तके त्यांच्या नावावर आहेत. **१९३३:-** कवी, कादंबरीकार मनोहर शंकर ओक यांचा जन्म. अनियकालिकाव्य चळवळीतील एक प्रमुख लेखक असणाऱ्या ओकांनी 'आयत्या कविता' ह्या काव्यसंग्रहासह 'चरसी', 'अन्नपेंथी' या कादंबऱ्या लिहिल्या. मुंबई महानगरांतील जगण्याचा सर्वस्पर्श अनुभव त्यांच्या साहित्यातून तर एकाकीपण, नैराश्य, उदासिनता, बेवारशीपणा आणि आयुष्याची निरर्थकता हा त्यांच्या कवितेचा गाथा. 'मनोहर ओकांच्या ऐंशी कविता' हा काव्यसंग्रह त्यांच्या निधनानंतर प्रसिध्द. **१९३७:-** लेखिका निर्मला विजय गोखले यांचे निधन. 'अपेशी', 'रेशमी धागे', 'रखरखीत' 'सावली', 'विषवेल', 'श्रध्दागौरी' या कादंबऱ्या आणि 'गुरुजी विद्या गुरुला', 'न संपणारी वाट' हे कथासंग्रह प्रसिध्द. **१९३८:-** ख्यातनाम कादंबरीकार, समीक्षक, कवी भालचंद्र नेमाडे यांचा जन्म. 'कोसला' या कादंबरीमुळे प्रकाशझोतात आलेल्या नेमाडेंच्या कादंबऱ्या समकालीन मराठी समाजावर भाष्य करतात हे 'झूल', 'बिठार', 'जरीषा' या कादंबऱ्यावरुन दिसून येते. अनेक वर्षे संशोधन करून लिहिलेली 'हिंदू' ही कादंबरी समीक्षकांच्या वादविवादामुळे गाजली. 'मेलडी', 'देखणी' या काव्यसंग्रहातून भोवतालच्या व्यवहारी, अमानुष जगतावर भाष्य याशिवाय 'साहित्याची भाषा' हे भाषाविज्ञानपर तात्विक स्वरुपाचे पुस्तक तसेच 'टिकास्वयंवर' हा समीक्षालेखसंग्रह नेमाड्यांची वाङ्मय विषय भुमिका स्पष्ट करतो. हल्ली 'लेखकांचा लेखकराव होतोय' या त्यांच्या लेखाने खळबळ उडवून दिली होती. **१९४०:-** लेखिका कमलिनी जनार्दन फडके यांचा जन्म. पूर्वाश्रमीच्या विद्या हनमंत महाजनी. 'नाटकघर' ही संस्था स्थापून त्यांनी ३० नाटकांची निर्मिती केली. 'भोवळ' या कादंबरीसह 'अक्कडराव फक्कडराव', 'अथ स्त्री पुराणम्', 'सुंदर ते मन', 'आम्ही असे लढलो', 'माय डिअर वन्स' या पुस्तकांसह 'संज्ञावात' हे आपल्या वडिलांचे चरित्रही त्यांनी लिहिले. तसेच मराठी, हिंदी वृत्तपत्रा तून मराठी नाटयसमीक्षण केले. **१९५५:-** लेखिका प्रा. अमिता गहलोद यांचा जन्म. 'उन्मेष', 'दोन फुले' हे प्रतिनिधिक काव्यसंग्रह प्रकाशित. तसेच 'विदूषक' ही विनोदी कथा प्रसिध्द. **१९५५:-** 'बालसन्मित्र' या मुलांच्या पाक्षिकाचे संस्थापक संपादक लेखक पारूजी नारायण मिसळ यांचे निधन. 'नितिमंजुषा', 'बालबोधकथा', 'बालभुषण', 'सद्गुणी', 'सद्बोध मकरंद', 'मालवण तालुक्याचा आणि वेंगुर्ले महालाचा भुगोल' तसेच 'शेवटी सत्याचा विजय', 'दिवाळीची देणगी', 'गमतीच्या गोष्टी' अशी साहित्य संपदा. **१९६८:-** युध्दविषयक लेखक शंकर गंगाधर चाफेकर यांचे निधन. लष्करात असल्याने लढायाचा अनुभव. या अनुभवांच्या जोरावर 'भारताचे परमवीर', 'संस्मरणीय रणसंग्राम', 'पानिपतचे तिसरे युध्द' इत्यादी पुस्तके लिहिली. **१९६९:-** आपले सारे आयुष्य कीर्तन करण्यात घालवणारे कीर्तनकार, कवी नारायण कृष्णबुवा सुपेकर यांचे निधन. विषयाची रंजक मांडणी तसेच स्वरचित कविता ही त्यांच्या कीर्तनाची वैशिष्टये. यांनी पूर्वरंग समुच्चय व उाररंग समुच्चय अशी पंचखंडात्मक अध्यात्माचे निरुपण करणारी कीर्तने संग्रहित केली. **२०१४:-** साधना प्रकाशनच्या 'समाज प्रबोधन पत्रिका' आणि 'इंडियन स्कूल ऑफ इकॉनॉमी' या संस्थेच्या 'अर्थबोध' या मासिकांचे सपांदक पद भुषवलेले डॉ.आनंद नाडकर्णी यांचे निधन.

**- संजय वझरेकर**
**९९७५५७६६७५**

आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२७ मे

१) श्री. सीताराम सदानंद वेंगुर्लेकर
वाडगाव-फाटा, २७-०५-१९४१
२) श्रीम. प्रभावती परशुराम ठाकूर
पेझारी-पोयनाड २७-०५-१९४२
३) श्री. मेघजी पालन देडिया,
पिंपळभाट-अलिबाग २७-०५-१९४७
४) श्री. गिरीशभाई ईश्वरभाई पटेल,
जुनी पोस्ट गल्ली २७-०५-१९५३

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

- मुख्य संपादक, कृषीवल



आजचे अन्नदाते
**हर्ष अभय शिर्के, वाढदिवस, कळंबोली**

# डोंबिवलीतील केमिकल कंपन्यांच्या स्थलांतराविरोधात
# पाताळगंगावासियांचा एल्गार
## राज्य सरकारच्या निर्णयाला जोरदार विरोध

**। रसायनी । वार्ताहर ।**

डोंबिवली एमआयडीसीमध्ये झालेल्या स्फोटानंतर राज्य सरकारने या ठिकाणाच्या कंपन्या पाताळगंगा एमआयडीसीमध्ये स्थलांतरित करण्याचा निर्णय घेतला आहे. पण, राज्य सरकारच्या या निर्णयाला आता पाताळगंगा गावकऱ्यांनी जोरदार विरोध केला आहे. पाताळगंगा एमआयडीसी आणि निवासी परिसरामध्ये कोणताही बफर झोन शिल्लक राहिला नसून, याठिकाणी जर कंपन्या स्थलांतरित केल्या तर आंदोलन उभा करण्याचा इशारा गावकऱ्यांनी दिला आहे.

डोंबिवलीमध्ये झालेल्या स्फोटात अनेकांचा जीव गेला आणि अनेकजण जखमी झाले आहेत. त्याचसोबत या परिसरातील हजारो घरांचे नुकसान झाले. येथील एमआयडीसीला लागून नागरी वस्ती उभी राहिल्याने अखेर केमिकल कंपन्या पाताळगंगामध्ये स्थालांतरीत करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. बफर झोन असलेल्या भागात केमिकल कंपन्या स्थलांतरित व्हाव्यात हा सरकारचा हेतू असला तरी ज्या पाताळगंगा भागात केमिकल कंपन्या नेण्यात येणार आहेत, त्या ठिकाणीसुद्धा एमआयडीसीची जागा आणि येथील गावं एकमेकांना लागून आहेत. त्यामुळे पाताळगंगा भागात केमिकल कंपन्या स्थालांतरीत करण्यास येथील गावकरी, संघर्ष समिती आणि राजकीय पक्षांनी विरोध केला आहे.

सरकारने गावकऱ्यांनी विश्वासात न घेता केमिकल कंपन्या पाताळगंगामध्ये आणल्यास रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करण्याचा इशारा शेकापचे उपसभापती सुनील सोनावळे शेकापचे युवा नेते दशरथ गायकर आणि भाजपाचे पदाधिकारी विजय मुरकुटे, सामाजिक कार्यकर्ते राकेश खराडे यांनी दिला आहे. तर, बेमुदत उपोषण करून सरकारला धारेवर धरणार असल्याचे शेतकरी संघर्ष समितीचे अध्यक्ष मारूती पाटील यांनी सांगितले. सरकारने गावकऱ्यांनी विश्वासात न घेता केमिकल कंपन्या पाताळगंगामध्ये आणल्यास रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे. तर शेकापक्ष, काँग्रेस, शिवसेना ठाकरे गटाने केमिकल कंपन्या येण्यास विरोध दर्शवला आहे.

### पाताळगंगा परिसरावर दृष्टिक्षेप

- येथील जमिनींची १९८२ साली सरकारकडून खरेदी
- एकूण ३ हजार एकर जमिनीची खरेदी
- लहान-मोठ्या १४५ कंपन्या सुरू ११ गावं, ८ ठाकूरवाड्या, ८ कातकरी वाड्या
- सध्या १० ते १२ केमिकल कंपन्या कार्यरत
- इंजिनिअरिंग झोन असताना केमिकल कंपन्या येत आहेत.
- २० हजारांपेक्षा जास्त लोकसंख्या आहे.
- पुढील पाच वर्षात लोकसंख्या ५० हजारांपर्यंत वाढण्याची शक्यता.

> गेल्या तीन महिन्यांत येथील केमिकल कंपन्यांना अनेक वेळा आग लागली आहे. हवेत विषारी धूर सोडून लोकांच्या जीवाशी खेळ सुरू असल्याने पाताळगंगामध्ये केमिकल कंपन्या येण्यास आमचा विरोध आहे.
> – माजी आ. बाळाराम पाटील, शेकाप

> सरकार आमच्या भागात कंपन्या आणून तरूणांना रोजगार उपलब्ध करून देत असतील तर आम्ही त्याचे स्वागत करू. सरसकट केमिकल कंपन्या स्थालांतरीत करण्यास आमचा विरोध राहील. ज्या कंपन्या अतिधोकादायक आणि ज्वलनशील असतील त्यांना आमचा विरोध राहील.
> – मनोहर भोईर, माजी आमदार

# कृषीवलच्या दणक्याने ‘महसूल’ला जाग
## कारवाईचा मात्र दिखावाच



**। पेण । प्रतिनिधी ।**

‘आमटेम-निगडे खाडीमध्ये अवैध वाळू उत्खनन?’ या मथळ्याखाली बुधवारी कृषीवलमध्ये बातमी प्रकाशित होताच महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांना जाग आली. महसूलचे अधिकारी तातडीने आमटेम निगडे खाडीच्या पुलाखाली पोहोचले. खाडीकिनारी दहा ते बारा ब्रास वाळू सक्शनद्वारे काढली होती, अशीही माहिती मिळत आहे. मात्र, प्रत्यक्षात एक ब्रासच वाळू कारवाईत जप्त केल्याने आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे.

दरम्यान, वाळूमाफियांनी अधिकाऱ्यांवर अशी काही जादू केली की अधिकाऱ्यांनी फक्त एक ब्रास वाळू जप्त करुन पेण प्रांत कार्यालयाच्या आवारात आणली, असे बोलले जात आहे. दरम्यान, उरलेली वाळू व रेजगा कोठे गायब झाला की, नऊ ते अकरा ब्रास वाळू अधिकाऱ्यांनी दाखवली नाही, अशी उलटसुलट चर्चा सुरू आहे. याचा अर्थ, महसूलचे कनिष्ठ कर्मचारी वरिष्ठांची दिशाभूल करीत असल्याचा

सरकारी नियमानुसार जप्त केलेल्या वाळूला पाचपट दंड आकारला जातो. मात्र, जप्त केलेल्या वाळूचा मालक कोण? याबाबतच अधिकाऱ्यांनी माहिती न दिल्याने वाळूमाफियांना अधिकारी वर्ग तर पाठीशी घालत नाही ना? असाही प्रश्न उपस्थित होत आहे. या प्रकाराबाबत पेण तहसीलदार चौकशी करीत आहेत.

# रस्त्याची कामे वाहतुकीस अडथळा

**पनवेल :** पनवेल महानगरपालिकेने पावसाळ्यापूर्वी हाती घेतलेल्या खारघर आणि कळंबोली शहराच्या प्रवेशद्वाराजवळच्या रस्त्याच्या काँक्रिटीकरणाचे काम वाहतुकीस अडथळा ठरत आहे. विशेष म्हणजे, पावसाळ्यापूर्वी ही कामे मार्गी न लागल्यास थेट सायन-पनवेल महामार्गावरील वाहतूक यामुळे विस्कळीत होऊ शकते. पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील खारघर आणि कळंबोली ही मुख्य शहरे आहेत. दररोज मोठ्या प्रमाणात वाहने याठिकाणाहून ये-जा करतात. पावसाळ्यात या मार्गावर पडणारे खड्डे लक्षात घेता पालिकेने यावर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी हे रस्ते काँक्रिटचे करण्याचा निर्णय घेतला. विशेष म्हणजे, कळंबोली शहरातील अंतर्गत रस्तेदेखील काँक्रिटीकणासाठी मोठ्या प्रमाणात खोदकाम केले आहे. मात्र, हे काम हाती घेण्याचे टायमिंग कुठे तरी चुकले असल्याची भावना नागरिक व्यक्त करीत आहेत.

# महावितरणचा ढिसाळ कारभार
## विद्युत वाहक उपकरणे बसविली गटारात

**। उरण । वार्ताहर ।**

नवघर-द्रोणागिरी नोड सेक्टर १२ येथील रहिवाशांना करण्यात येत असलेल्या विद्युत वाहक उपकरणे ही चक्क गटारात बसविण्याचा प्रताप महावितरण कंपनीच्या उपअभियंत्यांनी केला आहे. त्यामुळे पावसाळ्यात शॉर्ट सर्किटमुळे एखादी दुर्घटना घडून रहिवाशांच्या जीवितास धोका निर्माण झाला तर त्याला जबाबदार कोण, असा प्रश्न रहिवाशांकडून विचारला जात आहे.

महावितरणच्या हलगर्जीपणामुळे गुरुवारी (दि.२३) विद्युत वाहक तार पडून विंधणे ग्रामपंचायत हद्दीतील शेतकरी लहू भोईर यांच्या दुधाळ म्हशीचा शॉक लागून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. या संदर्भात महावितरणवर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

त्यातच द्रोणागिरी नोड येथील सेक्टर १२ मधील रहिवाशांना विद्युतपुरवठा करण्यात येत असलेल्या विद्युत वाहक केबल, विद्युत उपकरणे ही चक्क गटारात बसविण्यात आल्याचे चित्र समोर येत आहे. त्यामुळे पावसाळ्यात याठिकाणी शॉर्ट सर्किटमुळे एखादी दुर्दैवी घटना घडून रहिवाशांच्या जीवितावर बेतली तर याला जबाबदार कोण, असा प्रश्न रहिवाशांकडून सध्या विचारला जात आहे. याबाबत तात्काळ उपाययोजना करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.



# उल्हास नदीत पोहण्यास मज्जाव
## ❊स्थानिक महिलांकडून कारवाईची मागणी ❊ ग्रामपंचायतीकडून कारवाईचे फलक

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

नेरळ-कळंब राज्यमार्ग रस्त्यावर दहिवली ग्रामपंचायतीमध्ये मालेगाव दहिवली येथे असलेल्या पुलाच्या आजूबाजूला पाण्यात उतरण्यास आणि पोहण्यास ग्रामपंचायत प्रशासनाने बंदी घातली आहे. स्थानिक महिलांनी त्याबद्दल आक्षेप घेतला होता. त्यामुळे ग्रामपंचायतीकडून कारवाई करण्याची सूचना देणारे फलक नदी परिसर आणि गणेश घाट येथे लावले आहेत. उल्हास नदीवर दररोज शेकडोंच्या संख्येने लोक पाण्यात उतरुन मौजमजा करतात. अर्धनग्न आणि अश्लील चाळे यामुळे स्थानिक महिलांना मनस्ताप सहन करावा लागत होता. दरम्यान, महिलांकडून कारवाईच्या मागणीनंतर ग्रामपंचायतीकडून यापुढे तेथे पाण्यात उतरणाऱ्यांवर कारवाई करण्याचा इशारा देण्यात आला आहे.



नेरळजवळील दहिवली पुलाजवळ मागील दोन महिन्यांपासून दिवसभर पाण्यात उतरून पोहण्यासाठी येणारे हौशी तरुण यांची संख्या मोठी असते. नदीवर येणारे हे हौशी लोक दुपारचे दोन वाजले तरी अंघोळी करण्यासाठी उपस्थित असतात. त्यात मालेगाव आणि दहिवली गावातील स्थानिक महिला या नदीवरील गणेश घाट येथे धुणीभांडी करण्यासाठी येत असतात. मात्र, नदीवर अंघोळ करण्यासाठी येणाऱ्यांकडून सुरु असलेले अश्लील चाळे, त्याचवेळी अर्ध कपड्यात असलेले तरुण-तरुणी यामुळे स्थानिक महिलांना नदीवर येणे अवघड होऊन बसले आहे. त्यात तरुण-तरुणी यांच्याकडून नदी पात्रात सुरु असलेले चाळे यामुळे महिलांना मान खाली घालून कपडे धुवावे लागतात आणि तेथून काढता पाय घ्यावा लागतो. याबाबत महिलांनी ग्रामपंचायत कार्यलयात जाऊन सरपंच मेघा मिसाळ यांची भेट घेतली. सरपंचांनी सर्व सदस्यांच्या कानावर हा विषय घालून नदीत पोहण्यास बंदी घालण्याचा निर्णय घेतला आहे.

दरम्यान, दहिवली व मालेगाव गावातील महिलांनी आक्रमक पवित्रा घेत दहिवली पुलाजवळ जाऊन तेथे अंघोळ करण्यासाठी आलेल्या नागरिकांना हाकलून लावले आहे. तसेच ग्रामपंचायतीकडून यासंदर्भात सूचना फलकदेखील लावण्यात आले आहे. त्या ठिकाणी सूचनेनंतरदेखील तरुण-तरुणी आल्यास त्यांच्यावर कारवाई करण्यासाठी दहिवली ग्रामपंचायत नेरळ पोलिसांना कळवणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

> सध्या ज्या ठिकाणी तरुण-तरुणी अंघोळीला आल्यावर अर्धनग्न अवस्थेत अश्लील चाळे आणि हावभाव करतात. अगदी त्याच जागेवर संतश्रेष्ठ तुकाराम महाराज यांची राज्यातील सर्वत उंच प्रतिमा उभी राहणार आहे. अशा प्रसन्न जागेवरील अश्लील चाळे बंद झालेच पाहिजेत.
> – अमर मिसाळ, माजी सभापती, कर्जत पंचायत समिती

# रेल्वे मीटर रूम फेरीवाल्यांना आंदण

**। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।**

मानसरोवर रेल्वे स्थानकाबाहेर सिडकोमार्फत बांधण्यात आलेल्या एल टी पॅनल मीटर रूमचा वापर रेल्वे स्थानक परिसरातील फेरीवाले आपले सामान आणि राहण्यासाठी करत असल्याचे चित्र पाहायला मिळत असून, रेल्वेच्या मालकीच्या असलेल्या या रूमचा ताबा फेरीवाल्यांनी घेतलेला असतानादेखील रेल्वे अथवा सिडको प्रशासनाकडूनकोणतीही कारवाई केली जात नसल्याबद्दल शेकापचे शहर अध्यक्ष अमोल शितोळे यांनी प्रशासनाच्या या कारभाराविरोधात नाराजी व्यक्त केली आहे.

हार्बर मार्गावर असणाऱ्या मानसरोवर रेल्वे आणि सिडको यांनी संयुक्तिकरित्या सार्वजनिक शौचालय, वाहनतळ, त्याचप्रमाणे स्थानक परिसरातील विद्युत व्यवस्थेवर नियंत्रण ठेवण्यासाठी कमी दाबाच्या विजेसाठी मीटर रूम बनवण्यात आल्या आहेत. हार्बर मार्गावरील जवळपास सर्वच रेल्वे स्थानकांना फेरीवाल्यांचा गराडा असल्याचे पाहायला मिळते. मानसरोवर रेल्वे स्थानकदेखील याला अपवाद नसून, मानसरोवर रेल्वे स्थानकाबाहेरदेखील खाद्यपदार्थ विक्रेते, फळ विक्रेते, कटलरी सामानाचे विक्रेते अशा अनेक फेरीवाल्यांची आपले बस्तान बसवले आहे. हे विक्रेते दिवसभर रेल्वे स्थानक परिसरात आपला व्यवसाय करतात व आपले विक्रीचे सामान ठेवण्यासाठी रेल्वे स्थानक परिसरातील वाहनतळावर असलेल्या एलटी मीटर रूमचा वापर करतात. महत्त्वाचे म्हणजे, रेल्वे स्थानक परिसरातील या एलटी मीटर रूमची व्यवस्था पाहण्यासाठी सिडको इलेक्ट्रिक विभागाकडून या ठिकाणी चोवीस तास कर्मचाऱ्याची नियुक्ती केली आहे व सिडकोतर्फे सुरक्षा रक्षकाची नियुक्तीदेखील करण्यात आलेली असताना सुरक्षा रक्षकाच्या उपस्थितीत फेरीवाले मीटर रूमचा वापर साहित्य ठेवण्यासाठी व रात्रीच्या वेळी झोपण्यासाठी करत आहेत.

# डॉक्टरला मारहाण; गुन्हा दाखल

**पनवेल :** एक तरुण रात्रीच्या साडेबारा वाजता दोन मुलींसोबत भांडत होता. तो तरुण मोठ्या आवाजात का भांडतोय, हे तिथे रिक्षाची वाट पाहात उभ्या असलेल्या एका ६९ वर्षीय डॉक्टरांनी पाहिले. एवढेच निमित्त झाल्याने या २० वर्षीय तरुणाने लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. या मारहाणीत डॉक्टरांच्या डाव्या हाताच्या मनगटाला फ्रॅक्चर झाले. हा सर्व प्रकार कामोठे वसाहतीमधील सेक्टर ७ येथे घडला.

करंजाडे येथे राहणारे ६९ वर्षीय नंदलाल रायदास हे कामोठे वसाहतीमधील सेक्टर ७ येथील साईप्रसाद आर्केड या इमारतीजवळ रिक्षाची वाट पाहात उभे होते. यादरम्यान कामोठे वसाहतीमधील सेक्टर २२ येथील तुलसी हाईट्स या इमारतीमध्ये राहणारा २० वर्षांचा शंभुराज भोसले हा दोन मुलींसोबत तिथे भांडण करत होता. डॉ. नंदलाल यांनी शुंभराज याच्याकडे मोठ्या आवाजाने का भांडण करीत आहेस एवढीच विचारणा केली. याचा राग शंभुराज याला आल्याने त्याने डॉ. नंदलाल यांना लाथाबुक्क्याने मारहाण केली. जखमी अवस्थेत ६९ वर्षीय डॉ. नंदलाल हे रुग्णालयात जाऊन त्यांनी उपचार घेतले.

# रेल्वे स्थानकावर प्रवाशांच्या अंगाची लाही लाही

**। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।**

पनवेल रेल्वे स्थानकातील पंखे बंद असल्याने स्थानकात येणाऱ्या प्रवाशांना सध्या प्रचंड उकाड्याचा त्रास सहन करावा लागत आहे. मोठे जंक्शन रेल्वे स्थानक म्हणून ओळख असलेल्या या स्थानकात लांब पल्ल्याच्या गाड्या थांबा धरत असल्याने प्रवाशांची मोठी गर्दी असते.

पनवेल रेल्वे स्थानकातील प्लॅटफॉर्म क्रमांक पाच, सहाख सात येथे असलेले मोठ मोठे पंखे फक्त नावापुरतेच आहेत का, असा सवाल आता उपस्थित केला जात आहे. मात्र, या पंख्यांच्या खाली उभे राहिल्यानंतरदेखील हवा लागत नसल्याने प्रवासीवर्गातून सुसज्ज बैठक व्यवस्था तसेच पंख्यांची डागडुजी करण्याची मागणी केली जात आहे. मे महिना म्हटला की प्रचंड उकाडा जाणवू लागलेला आहे आणि त्यात मे महिन्याची सुट्टी म्हटली लोकांची गावी तसेच सुट्टीला बाहेर फिरायला जाण्याची मोठी धावपळ पाहायला मिळत आहे. सध्या मार्गावरील मेल एक्सप्रेस गाड्या तासन्तास उशिराने धावत असल्याने प्रवाशांना रेल्वे स्थानकांवर गाड्यांची वाट पाहावी लागत आहे. मात्र, प्रवाशांची या दरम्यान मोठी गैरसोय होताना दिसत आहे. या ठिकाणी असलेले शौचालय, मुताऱ्यांची व्यवस्थित साफसफाई नसल्याने गैरसोयीला समोरे जावे लागत आहे.



# सीबीएसई परीक्षेत जिंदाल स्कूलचे यश

**। सुकेळी । वार्ताहर ।**

रोहा तालुक्यातील सुकेळी येथील जिंदाल माऊंट लिटेरा झी स्कूलचा दहावी व बारावी सीबीएसई बोर्ड परीक्षेचा १०० टक्के निकाल लागला असून, यामध्ये विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन करत पुन्हा एकदा आपल्या शाळेचे नाव उज्ज्वल केले आहे.

इयत्ता बारावी विज्ञान शाखेमध्ये शिकणाऱ्या यतिश राय या विद्यार्थ्याने ९५ टक्के गुण प्राप्त करून प्रथम क्रमांक पटकावला. तर आर्या बोरेकर हिने ९१ टक्के गुणांसह दुसरा व तन्वी म्हस्के ९० टक्के गुण मिळवत तिसरा क्रमांक मिळविला. तसेच इयत्ता दहावीमध्ये प्रियांश जैन ९७ टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांकाची बाजी मारली. तर प्रिंतीकार जैन ९७.२ टक्के, वरद लहाने याने ९६ टक्के गुणांसह अनुक्रमे दुसरा व तिसरा क्रमांक पटकावला. तसेच दहावीच्या प्रियांश जैन याने गणित व एसएसटी या विषयांमध्ये १०० पैकी १०० गुण, तर बारावीमध्ये यतिश राय याने फिजिक्स या विषयामध्ये १०० पैकी १०० गुण प्राप्त करत यश संपादन केले.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल शाळेच्या मुख्याध्यापिका लिली रॉय, उपमुख्याध्यापिका स्वागतीका शाहु, शाळा व्यवस्थापक सुनील नायर, कमलाशंकर सिंग तसेच सर्व शिक्षकवृदांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करुन पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# कर्नाळा अभयारण्यात बिबटे झाले दुर्मिळ

**। पनवेल । संजय कदम ।**

कर्नाळा अभयारण्य हे पनवेल तालुक्यात पर्यटन आणि वन्यजीवांचा अधिवास असलेले प्रसिद्ध ठिकाण आहे. दरवर्षी बुद्ध जयंतीनिमित्त वन्यजीव प्राण्यांची गणना होत असते. वर्षभरातील सर्वात मोठी रात्र असल्याने बुद्ध जयंतीच्या दिवशी दरवर्षी ही गणना केली जाते. यावर्षीदेखील काही संस्थांच्या मदतीने कर्नाळा अभयारण्य प्रशासनाने २४ तास पाण्याची देखरेख करीत पाणवठ्यांवर ट्रॅक कॅमेरे लावत ही गणना केली. यावेळी दुर्दैवाने बिबटे मात्र कॅमेऱ्यात कैद झाले नाहीत.

दरम्यान, कर्नाळा अभयारण्यात पक्ष्यांचा किलबिलाट वाढला असल्याचे सर्वेक्षणात उघड झाले आहे. तीन पाणवठ्यांवर कर्नाळा अभयारण्याचे आठ कर्मचारी आणि संस्थांचे १० असे १८ कर्मचारी प्राणी आणि पक्ष्यांच्या हालचाली टिपत होते. एकूण तीन ठिकाणी पाणवठ्यांवर मचाण बांधून तीन पथकांनी केलेल्या सर्वेक्षणात विविध प्राणी आणि पक्ष्यांची नोंद करण्यात आली. मयूर बंधारा, अभयारण्यातील माहिती केंद्रातील तलाव, आपटा येथील कृत्रिम पाणवठा आदी ठिकाणी मचाण बांधण्यात आले होते. यादरम्यान विविध प्राणी आणि पक्षी या निरीक्षकांना दिसले. यामध्ये खार, उद मांजर, हनुमान लंगुर, रानडुक्कर आदी प्राणी दिसून आले. मात्र, बिबट्यासह बेकर, हरिण, ससा यांच्यासारखे प्राणी मात्र या निरीक्षणात दिसले नाहीत. दिवसेंदिवस याठिकाणचे प्राणी अभयारण्यातून दिसेनासे झाले आहेत. माकड वगळता कोणतेही प्राणी इतर वेळीदेखील सहजरित्या दिसत नसल्याने त्याठिकाणची प्राणी संख्या कमी होत चालली आहे. कर्नाळा अभयारण्यात मोठ्या प्रमाणात सुरु असलेला जंगलाचा ऱ्हास, मानवी हस्तक्षेपाचा परिणाम या सर्वावर होत असल्याचे दिसून येत आहे. कर्नाळा अभयारण्य मुख्यत्वे करून पक्षी अभयारण्य म्हणून सर्वत्र प्रसिद्ध आहे. त्यानुसार अभयारण्यात पक्ष्यांचा किलबिलाट मात्र कायम असल्याचे दिसून येत आहे.




### निसर्गाचा ऱ्हास वन्यजीवांच्या मुळावर

कर्नाळा अभयारण्यात नजीकच्या काळात मोठ्या प्रमाणात मानवी हस्तक्षेप वाढला आहे. फार्म हाऊस संस्कृती उदयास येत असल्याने नैसर्गिक संपदेचा ऱ्हास होत असून, जंगले नष्ट होत असल्याने अनेक प्राणी कर्नाळा अभयारण्यातून नष्ट होत चालले आहेत. यापूर्वी याठिकाणी पाहिला जाणारा बिबट्यादेखील दिसेनासा झाला आहे.

### या पक्ष्यांचा किलबिलाट

पर्णपक्षी, रानपिंगळा, कटुर्गा, श्यामा, शिळकस्तुर, सुबक, शिपाई बुलबुल, निळमणी, काळ्या डोक्याचा हळद्या, हरियाल, पाचूहोला, खंड्या, वेडा राघू, रान कस्तूर, पान कावळा, कोतवाल, महाभृंगराज, नवरंग, भारतीय कोकीळ, भारद्वाज, दयाळ, टिपकेदार होला, घार, सातभाई, हळद्या, तरेवाला बुलबुल, पाचुहोला, मोनार, बगळा, कोतवाल, पांढऱ्या छातीचा किंगफिशर, काळ्या डोक्याचा हळद्या, घुबड, पर्वती कस्तूर, रानपिंगळा, तपकिरी, डोक्याचा कुटूरगा, तांबट, भारद्वाज, महाभृंगराज, कावळा, बगळा, डोकावळा, कोकिळ, वटवाघुळ, बुलबुल, कोतवाल, सनबर्ड, होला, वेडाराघू, रातवा, हरियाल, कावळा, टकाचोर, बगळा, मोर, रानकोंबडा, डोकावळा, बारबेट, कोकीळ, वटवाघुल, राखी धनेशे, टिटवी, भारद्वाज, पावश्या, सुभग, तपकिरी वन घुबड आदी पक्षी या सर्वेक्षणात आढळले आहेत.

# महिलेवर अत्याचार करणाऱ्यावर गुन्हा दाखल

**पनवेल :** महिलेला ब्लॅकमेल करून तिच्यावर अत्याचार करताना काढलेले फोटो महिलेच्या पतीसह त्यांच्या नातेवाईकांना पाठविण्याचा प्रकार करणाऱ्याविरुद्ध पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

खारघर परिसरात राहणाऱ्या एका विवाहित महिलेबरोबर सदर इसमाची मैत्री झाली. या ओळखीचा फायदा त्या इसमाने सदर महिलेचे फोटो काढले होते. हे फोटो पतीला दाखविण्याची भीती दाखवून त्याने तिच्यावर अनेकदा अत्याचार केले. त्या त्रासाला कंटाळून अखेरीस या महिलेने त्याला टाळण्यास सुरूवात केली. परंतु, सदर इसमाने या महिलेचे फोटो तिच्या पतीसह नातेवाईकांना पाठविल्याने हा प्रकार उघडकीस आल्यावर महिलेने वाच्यता केली. त्यानुसार खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# वाळवटीचा पाणीप्रश्न ऐरणीवर

## दोन महिने पाणीपुरवठा नाही; मुरुड पंचायत समितीवर धडक मोर्चा

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

मुरुड तालुक्यातील उसरोली ग्रामपंचायत हद्दीतील वाळवटी आगरी समाज व बौद्धवाडी या भागात गेले दोन महिने पाणीपुरवठा होत नसल्याने शनिवारी शेकडोंच्या संख्येने वाळवटी आगरी समाजाच्या महिला व पुरुषांनी परेश हॉटेलपासून ते मुरुड पंचायत समितीपर्यंत शांततेत मोर्चा काढला. तद्नंतर ग्रामस्थांच्या वतीने गटविकास अधिकारी यांच्या कार्यालयात जाऊन विस्तार अधिकारी सुभाष वाणी यांच्याकडे निवेदन सादर केले. यावेळी पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.



(छायाचित्र : गणेश चोडणेकर)

यावेळी शिवसेनेचे तालुका संघटक यशवंत पाटील, सुषमा पाटील, अनिता पाटील, महिला अध्यक्ष सुवर्णा सातमकर, समाज अध्यक्ष विठ्ठल घरत, अशोक मुंबईकर, शैलेश पाटील, विशाल पाटील, रामा पाटील, मधुकर घरत, सागर पाटील, दिपक पाटील, संध्या तेलघे, संगिता मुंबईकर, माधुरी पाटील, कैलास पाटील, संतोष पाटील, अनिल मुंबईकर आदींसह शेकडो ग्रामस्थ उपस्थित होते.

उसरोली ग्रामपंचायत हद्दीतील वाळवंटीकरिता जलजीवन मिशन योजनेच्या माध्यमातून ४४ ते ४५ लाख रुपये खर्च करून काम चालू केले आहे. ते काम पूर्णतः अपूर्ण स्थितीत आहे.झालेले काम निकृष्ट दर्जाचे आहे. यासंदर्भात ग्रामस्थांनी जिल्हा परिषद रायगड पाणीपुरवठा, पंचायत समिती मुरुडकडे वेळोवेळी तक्रारी केल्या आहेत, तरी शासनाचे अधिकारी त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करताना दिसत आहेत, असा आरोपही ग्रामस्थांनी केला.

पाणीपुरवठा विभागातील अभियंता निहाल चवरकर हे दोन महिन्यांपासून आपल्याकडे पाणी येईल असे फक्त आश्वासन देत आहेत. वाळवटीमध्ये मुबलक प्रमाणामध्ये पाणी असूनसुद्धा लोकांना पाण्यासाठी वणवण भटकावे लागत आहे, ही अतिशय वाईट आणि दुर्दैवी गोष्ट आहे. येत्या दोन दिवसांत पाणीपुरवठा सुरळीत चालू झाला नाही, तर मुंबई- मुरुड या मुख्य रस्त्यावर उसरोली टेपावर रास्ता रोको करण्यात येईल व त्यांच्यामुळे काही नुकसान झाल्यास त्यांची सर्व जबाबदारी प्रशासनाची राहील, असे या निवेदनात म्हटले आहे. दरम्यान, पाणीपुरवठा अभियंता निहाल चवरकर यांचा फोन बंद असल्याने त्यांची प्रतिक्रिया कळू शकली नाही.

> मी दोन दिवसांत घटनास्थळी येऊन पाहणी करीन. ग्रामस्थांना कसं पाणी मिळेल त्याची दक्षता घेण्यात येईल. तसेच पाणीपुरवठा अभियंता यांची चौकशी करण्यात येईल.
>
> – राजेंद्रकुमार खताळ, गटविकास अधिकारी

> गावात पाणी असूनसुद्धा ठराविक समाजाला पाणी मिळते, आम्हाला पाणी मिळत नाही याचा आम्ही निषेध करतो. हा प्रकार निंदनीय आहे. याची चौकशी होऊन अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करावी जेणेकरून हा प्रकार कुठल्या गावात घडणार नाही. येत्या दोन दिवसांत पाणी मिळाले नाही तर याठिकाणी मोठा उद्रेक होईल.
>
> – यशवंत पाटील, शिवसेना तालुका संघटक



# ‘महामार्गावरील रंबल स्ट्रीप बिनकामाचे’

**। पाली । वार्ताहर ।**

पाली-खोपोली राज्य मार्गावर बसविण्यात आलेले रंबल स्ट्रिप पातळ असून, बिनकामाचे आहेत, असे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

वावे गावातील केतन म्हसके यांनी सांगितले की, एमएसआरडीसी तसेच सुधागड तहसीलदार यांच्याकडे येथे रंबल स्ट्रिप बसविण्यासाठी तक्रारी अर्ज केले होते. त्याचीच दखल घेऊन बुधवारी (दि.२२) येथे रंबल स्ट्रिप बसविण्याचे काम सुरु झाले. परंतु, इतर मार्गावर जशा रंबल स्ट्रिप असतात की ज्यामुळे स्पीड नियंत्रणात येतो, तशा या रंबल स्ट्रिप होताना दिसत नाहीत. यासंदर्भात केतन म्हसके यांनी एमएसआरडीसी अधिकारी यांच्याशी संपर्क साधून त्याची संख्या सहा पट्ट्यांवरून १० किंवा १२ करायला व जाडी १२.५ एमएम करायला सांगितली. पण ती झाली नाही. मग ते रंग मारण्याच्या हेतूने बनविले आहेत का? तसेच महामार्गावर गतिरोधक नसतात, मग पालीमध्ये प्रवेश करताना आठ गतिरोधक आहेत. तसेच पुणे-मुंबई द्रुतगती मार्गावर उत्तमरित्या रंबल स्ट्रिप आहेत. याबद्दल एमएसआरडीसीचे काय म्हणणे आहे, अशी विचारणा ग्रामस्थांच्या वतीने केतन म्हसके केली आहे.

> मी अगोदरच रंबल स्ट्रिप टाकायला तसेच स्ट्रिप आणि त्याची जाडी वाढवायला सांगितले आहे. तसेच हे सर्व काम एका टप्प्यामध्ये होत नाही. ते दोन टप्प्यांमध्ये योग्यप्रकारे पूर्णपणे होऊन जाईल.
>
> - सचिन निफाडे, उपअभियंता, एमएसआरडीसी

# चितेच्या ठिणगीने लागली आग

**श्रीवर्धन येथील घटना**



**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

श्रीवर्धन समुद्रकिनारा येथील शासकीय विश्रामगृहालगतच असलेल्या स्मशानभूमीत चितेच्या ठिणगीमुळे जवळच्या परिसरात आग लागण्याची घटना दुपारी तीनदरम्यान घडली.श्रीवर्धन नगरपरिषदेचे अग्निशमन दल घटनास्थळी वेळेत दाखल झाल्याने आग आटोक्यात आली.

मिळालेल्या माहितीनुसार, दुपारी साडेबारा वाजता शासकीय विश्रामगृहालगतच असलेल्या स्मशानभूमीत मृत व्यक्तीचे अंत्यसंस्कार करण्यात आले होते. दुपारी एक ते दोन या वेळेस समुद्रकिनाऱ्यावरील सोसाट्याच्या वाऱ्यामुळे चितेवरील पेटते लाकडाचे निखारे आजूबाजूच्या परिसरात उडाले. या परिसरात पिंपळ, सुरूच्या झाडांची सुकून खाली पडलेली पाने, फांद्या तसेच सुकलेले गवत असल्यामुळे पेटते निखारे उडाल्याने क्षणार्धात आग लागली. वाऱ्यामुळे आग पसरत जात असल्याचे स्थानिकांच्या निदर्शनास येतात श्रीवर्धन नगरपरिषदेच्या अग्निशमन दलास कळवण्यात आले. अग्निशमन दल वेळेत दाखल झाल्याने आग आटोक्यात आली आणि संभाव्य धोका टळला.

शनिवार, रविवार सलग सुट्ट्यांमुळे समुद्रकिनाऱ्यावर आलेल्या पर्यटकांनी स्मशानभूमीलगतच आपली वाहने उभी केली होती. स्मशानभूमीच्या संरक्षण भिंतीशेजारी भेळपुरी विक्रेते, शहाळी विक्रेते सुट्टीच्या दिवशी आपापल्या हातगाड्या व्यवसायासाठी उभ्या करतात. वाऱ्यामुळे आग सभोवती पसरत असल्याचे वेळीच लक्षात आल्याने अग्निशमन दलास पाचारण करण्यात आल्याने संभाव्य दुर्घटना टळली. दुपारची वेळ असल्यामुळे व्यावसायिक हातगाड्या बंद करून घरी गेले होते, तसेच पर्यटक आपापल्या गाड्या उभ्या करून समुद्रकिनाऱ्यावर फिरावयास गेले होते. आगीचे लोळ पसरत गेले असता मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता निर्माण झाली होती.

> **पर्यटकांची मनमानी**
>
> र.ना. राऊत शाळेपासून शासकीय विश्रामगृहाकडे जाणारा रस्ता अरुंद आहे. या रस्त्यावर पर्यटकांनी आपली वाहने मिळेल त्या जागेवर उभी केली होती. नगरपरिषदेच्या वॉटर टेंडरला मिळेल त्या जागेतून घटनास्थळी हजर व्हावे लागले.

# नेरळ-कशेळे मार्गाचे कासव गतीने

## ठेकेदाराचा हलगर्जीपणा, सर्वसामान्यांना मनस्ताप

**। नेरळ । वार्ताहर ।**

नेरळ-कशेळे या राज्यमार्गाचे सुरू असलेले काम हे संत गतीने होत असून, सध्या हा रस्ता वातुकीसाठी धोकादायक बनला. ठेकेदाराची मर्जी होईल तेव्हा रस्त्याच्या कामाला सुरुवात केली जात आहे तर मनात येल तेव्हा काम बंद ठेवले जात आहे. दरम्यान, रस्त्याच्या या अर्धवट कामामुळे नाहक सामान्य नागरिकांना मनस्ताप भोगावा लागतो. शिवाय, येथे अपघातदेखील घडत आहे. ठेकेदाराने कामाच्या ठिकाणी ना सूचना फलक लावले, ना सुरक्षिततेच्या दृष्टीने उपाययोजना केल्या, त्यामुळे नागरिक संताप व्यक्त करीत आहेत.



उरण-पनवेल-नेरळ-कशेळे भीमाशंकर मंचर हा भीमाशंकर राज्यमार्ग म्हणून महत्त्वाचा आहे. कायम वाहनांच्या वर्दळीचा रस्ता म्हणून या रस्त्याचे काम होत आहे. सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत सिमेंट काँक्रिटीकरण केले जात आहे. नेरळ-कशळे मार्गातील साई मंदिर ते कोल्ह्यारे चार फाटापर्यंत सिमेंट काँक्रिटीकरणाचे काम पूर्ण झाले असून, पुढील काम सुप्रिया हॉटेलपर्यंत एक मार्गिका काही तयार करण्यात आली. परंतु, ठेकेदाराने हे काम करीत असताना कुठल्याही प्रकारे सुरक्षितेच्या दृष्टीकोनातून उपाययोजना केलेलेल्या दिसत नाही. साधे सूचना फलकसुद्धा या ठेकेदाराला लावावेसे वाटले नाही का, असा प्रश्न आहे.

जो सिमेंट काँक्रिट रस्ता तयार झाला त्यावर मातीचा थर जमा होऊन खडी रस्त्यावर दिसत आहे, यामुळे येथे मोटारसायकलला अपघात घडत आहेत. यावर स्थानिक नागरिक लालू चंचे यांनी हे काम लवकरात लवकर करण्यात यावे म्हणून मागणी केली आहे. यावर सार्वजनिक बांधकाम विभागाचे संजीव वानखेडे यांच्याशी संपर्क साधला असता तो होऊ शकलेला नाही.

एकूणच रस्त्याच्या कामात ठेकेदाराकडून होत असलेला हलगर्जीपणा हा येथील प्रवासी धारकांच्या जीवावर बेतू शकतो. त्यामुळे एखादा मोठा अपघात होण्याची सार्वजनिक बांधकाम विभाग वाट पाहतो का? ठेकेदारावर कारवाई होणे गरजेचे आहे. परंतु, असेही होताना दिसत नाही. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकारी वर्गाने ठेकेदाराला समज देऊन रस्त्याचे काम लवकरात लवकर करून घेणे गरजेचे आहे. मान्सून तोंडावर येऊन ठेपला असून, न जाणो येथे वाहने रस्त्यावर साठलेल्या मातीवर घसरुन अपघात ग्रस्त होतील. त्यामुळे आता तरी सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच ठेकेदार आपली जबाबदारी पूर्ण पार पाडणार का, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# ‘जीवनधारा’चे उन्हाळी शिबीर उत्साहात

**। खांब । वार्ताहर ।**

रोहा तालुक्यातील जीवनधारा सामाजिक संस्था वरसगाव-कोलाड या संस्थेच्या वतीने दि.२४ व २५ मे रोजी दोन दिवसीय उन्हाळी शिबीर मोठ्या उत्साहात पार पडले.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून सह्याद्री वन्यजीवन रक्षणार्थ सामाजिक संस्था कोलाड या संस्थेचे संस्थापक सागर दहिंबेकर व टीम, ग्रेगोरियन पब्लिक स्कूलमधील शिक्षिका नीलम मॅडम व त्यांचा स्टाफ तसेच जीवनधारा संस्थेच्या संचालिका हिल्डा मॅडम, फादर फ्रान्सिसको, फादर रुडोल्फ, रोहामधील योगा क्लासेसच्या टीचर विभा चोरगे, मुंबईमधील योगा टीचर कांचन घावटे, कॉलेज ऑफ सोशल वर्क निर्मला निकेतन येथील प्रो. कल्याणी तलवेकर आणि राष्ट्रवादी महिला अध्यक्षा प्रीतम पाटील उपस्थित होत्या. उपस्थित पाहुण्यांच्या हस्ते दीप प्रज्ज्वलन व श्रीफळ वाढवून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली.



या शिबिरात ग्रेगोरियन स्कूलमधील नीलम मॅडम यांनी मुलांसोबत ॲक्टिव्हिटी व डान्स घेतले. त्यानंतर सह्याद्री वन्यजीवन रक्षणार्थ सामाजिक संस्था कोलाड संचालक सागर दहिंबेकर व त्यांची टीम यांनी मुलांना पर्यावरणविषयी माहिती दिली. विभा चोरगे व कांचन घावटे यांनी मुलांना योग शिकवून योग आपल्या जीवनासाठी किती महत्त्वाचे आहेत हे मुलांना सोप्या भाषेमध्ये समजावून सांगितले. तसेच प्रीतम पाटील यांनीही मुलांना महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले.

# चिटफंड प्रकरणी चौघांवर गुन्हा दाखल

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

माणगाव तालुक्यातील चार आरोपींनी नागरिकांचा विश्वास संपादन करुन त्यांच्याकडे पैसे गुंतवण्यास सांगितले. नागरिकांनी त्यांच्यावर विश्वास ठेवत लाखो रुपये गुंतवले. परंतु, ते पैसे काही काळानंतर देण्यास टाळाटाळ केल्याने आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच गुंतवणूकदारांनी माणगाव पोलिसात तक्रार दाखल केली.

याबाबत हकीकत अशी की, माणगाव पोलीस ठाणे येथे आरोपी संदेश सुरेश कवडे, रा. वंदना अपार्टमेंट, कचेरी रोड, माणगाव, मनोज सदानंद तेटगुरे, रा. साळवे, ता. माणगाव, देवेंद्र पांडुरंग गायकवाड, रा. निजामपूर व संजय बाळकृष्ण गायकवाड, रा. कचेरी रोड, अपना मेडिकल वरती, तिसरा मजला, माणगाव यांनी ॲडव्हायझरी व ट्रस्ट इंटरप्रायझेस नावांनी कंपनी स्थापन करुन बिझनेस ऑफिस सुरु केले असल्याचे लोकांना सांगून, त्यामध्ये पैसे गुंतवणूक करण्यास सांगितले. व्यवसायातील मिळणाऱ्या नफ्यातून गुंतवणूकदारांना नफ्याची ६ ते ७ टक्के रक्कम प्रत्येक महिन्याला देऊ असे सांगितले व लोकांचा विश्वास संपादन केला. त्यानंतर गुंतवणूक केलेली रक्कम परत देण्यास टाळाटाळ करुन आरोपींनी अनेक गुंतवणूक दारांची फसवणूक केलेली असल्याचे निषन्न झाले आहे.

# महिलेला २० लाखांचा गंडा

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेलमधील नेरे भागात राहणाऱ्या एका महिलेला दोन वेगवेगळ्या सायबर टोळ्यांनी शेअर मार्केटमधीलगुंतवणूककरूननफ्याचे प्रलोभन दाखवून तब्बल २० लाख ५० हजार रुपयांचा गंडा घातला आहे. याप्रकरणी पनवेल तालुका पोलिसांनी दोन वेगवेगळ्या सायबर टोळ्यांविरोधात फसवणुकीसह आयटी कायद्यानुसार गुन्हा दाखल केला आहे. फसवणूक झालेली ३४ वर्षीय महिला पनवेलमधील कोप्रोली येथे राहते. या महिलेने या आधी शेअर मार्केटमध्ये पैसे गुंतवले होते.

# वडिलांचा खोटा वारस दाखला बनवून फसवणूक

**। पनवेल । वार्ताहर ।**

वडिलोपार्जित जमिनीवर हक्क सांगून त्यांचे भागधारकांमध्ये अनेक वादविवाद उजेडात येत आहे. पनवेल पोलीस ठाण्यात नुकत्याच नोंदविलेल्या एका फसवणुकीच्या गुन्ह्यात १३ वर्षांपूर्वी जिवंत असलेल्या वडिलांना मृत घोषित करून त्यांचा खोटा वारस दाखला न्यायालयाची दिशाभूल करून बनवून जमीन बळकाविण्याचा प्रकार उजेडात आला आहे.

ठाणे येथील नौपाडा येथे राहणाऱ्या रोहिणी मालपेकर यांनी पनवेल शहर पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीमध्ये त्यांचे वडील नामदेव म्हात्रे हे ४ जुलै २०११ रोजी जिवंत असतानाही त्यांचे नातेवाईक राजेंद्र म्हात्रे, शरद म्हात्रे, सुभद्रा तळकर यांनी नामदेव यांना मृत असल्याचे कागदोपत्री न्यायालयास दर्शवून बनावट वारस दाखला मिळविला. तो बनावट वारस दाखला पनवेल येथील दुय्यम निबंधक कार्यालयात वापरून त्यासंदर्भात खोटे दस्त बनविल्याची तक्रार पोलिसांत रोहिणी यांनी दिली आहे. याबाबत पनवेल शहर पोलीस ठाण्याचे पोलीस अधिक तपास करीत आहेत.

## क्लासिफाईड

*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- श्री सिद्धीविनायक ज्योतिष सर्व समस्यांचे शीघ्र निवारण, नोकरी धंदा, गृहक्लेश, व्यापारवृद्धी, प्रेमसमस्या, लग्नामधील अडचण फोन नं. ९९६०४५६९८६/८८०६४७९१७३, कृष्णा शालिनी अपार्टमेंट पहिला मजला रूम नं.१०३, घरत आळी, एस.टी.स्टँडजवळ, अलिबाग/रायगड
- फर्निचर वर्कशॉपमध्ये कामाला मुले पाहिजेत. १० वी/१२ वी पास/नापास मोफत प्रशिक्षण दिले जाईल. ८ तास ड्युटी, ठिकाण- बामणसुरे, चोंढी पगार-१०,००० महिना. Contact- ९०४९६५५५२३
- अलिबाग मधील ऑफिसकरीता एक्सपेरिएंस्ड ड्राफ्ट्समन, आर्किटेक्ट, इंटीरियर डिझायनर पाहिजे. मोबाईल नंबर ९९७०३९१६९७
- सहारा ट्रॅव्हल्स अलिबाग मध्ये स्थानिक ड्रायव्हर पाहिजे वय२५ ते ४५( Jsw duty) ९२७०५६०४५६
- बजाज शोरूम अलिबागमध्ये कामासाठी (टू व्हिलर) मेकॅनिक पाहिजे संपर्क : प्रबोध राऊत ९७०२४५९१५१ बजाज शोरूम बायपास रोड अलिबाग
- अकाउंटट पाहिजे B.com ,Tally ठिकाण- बामणसुरे, चोंढी पगार- ८००० महिना संपर्क : ९८२३५८५३२१

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# श्रीवर्धनचे पर्यटन बहरले

## मे महिना अखेरीस पर्यटक दाखल

**। श्रीवर्धन । वार्ताहर ।**

हवामान खात्याकडून वर्तवली जाणारी उष्णतेची लाट व त्यापाठोपाठ चक्रीवादळाचे दिले जाणारे इशारे या कारणास्तव विद्यालयीन, महाविद्यालयीन परीक्षा आटोपूनसुद्धा पर्यटक श्रीवर्धनकडे फिरकले नव्हते. परंतु, शनिवार, रविवार सलग सुट्ट्यांमुळे मे महिनाअखेरीस पर्यटक श्रीवर्धन येथे दाखल झाले आहेत.

पर्यटन व्यवसायीकांचा आर्थिक उत्पन्नाचा स्त्रोत हा एप्रिल, मे व जून महिन्याचे पहिले दोन आठवडे. एप्रिल महिन्यात विद्यार्थ्यांच्या परीक्षा होऊनदेखील पर्यटक श्रीवर्धन येथे न फिरकल्याने पर्यटन व्यावसायिकांमध्ये चिंतेचे वातावरण पसरले. पर्यटनासाठी उत्तम ठिकाण समजल्या जाणाऱ्या श्रीवर्धन येथे वाढती उष्णता त्यातच हवामान खात्याकडून उष्णतेच्या लाटेचे दिलेले अंदाज यामुळे काही पर्यटकांनी केलेले ॲडव्हान्स बुकींगही रद्द केले होते.उष्णतेच्या लाटेपाठोपाठ मुंबई येथे झालेले चक्रीवादळ व हवामान खात्याकडून वर्तवण्यात आलेला चक्रीवादळाचा इशारा या कारणाने पर्यटक श्रीवर्धनकडे फिरकले नाहीत.



मे महिन्यातील चौथ्या आठवड्यात गुरुवारी आलेली बुध्दपौर्णिमेची सुट्टी व चौथा शनिवार व रविवार या सुट्ट्यांमुळे पर्यटक श्रीवर्धनमध्ये दाखल झाले. काहीशा निराशाजनक गेलेल्या पर्यटन व्यवसायाला मे महिनाअखेरीस काही प्रमाणात उभारी आली. दीड महिन्याच्या प्रतीक्षेनंतर श्रीवर्धन पर्यटकांनी हाऊसफुल्ल झालेले बघावयास मिळाले. श्रीवर्धन येथे दोन दिवस राहण्यास सहज खोली उपलब्ध होईल या भ्रमात आलेल्या अनाहूत पर्यटकांना निराशा पदरी घेऊन माघारी फिरावे लागले. मात्र, पर्यटकांमुळे स्थानिकांच्या व्यवसायाला चालना मिळाली आहे.

> मे महिन्याची अखेर चांगली जात आहे. एक जूनपर्यंत बुकिंग झालेले आहे. आलेले पर्यटक जेवणात मच्छीची मागणी करतात आणि कोकणातील मोदकांची लज्जत घेतात.त्यातही विशेष म्हणजे पर्यटक चुलीवर वालाची उसळ, झुणका भाकर तसेच कोकणातील पदार्थ बनवण्यास सांगतात.
>
> - महेंद्र भोसले, गुलमोहर फॅमिली रिसॉर्ट, श्रीवर्धन

> **वाहतूक कोंडीवर उपाय**
>
> श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्यालगतचे रस्ते एकेरी व अरुंद असल्याने वाहतूक कोंडी होते. या समस्येची दखल घेत श्रीवर्धन पोलिसांनी र.ना. राऊत शाळा मैदान रस्त्यावर लोखंडी बॅरिकेट्स उभी करीत वाहनांना जागा उपलब्ध करून दिली. यामुळे काही अंशी वाहतूक कोंडी समस्या कमी झाल्याचे निदर्शनास येत होते.

# रायगडातील हापूसचा सातासमुद्रापार डंका

**✻ आखाती देश, युरोप, अमेरिकेत हापूस आंब्याला मोठी मागणी ✻ आंबा बागायतदार संदेश पाटील यांनी व्यक्त केले समाधान**

**। पाली/बेणसे । वार्ताहर ।**

रायगडसह कोकणच्या हापूस आंब्याच्या चवीचा मोह जगाला पडतो. कोकणचा हापूस आंबा त्याच्या उत्तम चवीसाठी व अप्रतिम गोडीसाठी प्रसिद्ध आहे. जगप्रसिद्ध असलेल्या कोकणच्या आंबा बागायतदार शेतकऱ्यांपुढे सद्यस्थितीत अनेक संकट उभी ठाकली आहेत. कोकणातील शेतकरी बॉण्ड फायटर असल्याने तो हवामानबदल, अस्मानी, नैसर्गिक संकटात देखील पुन्हा जिद्दीने उभा राहतो. राज्याच्या कानाकोपऱ्यात आंबा थेट ग्राहकांपर्यंत पोहचला. यामध्ये तत्कालीन जिल्हा कृषी अधिकारी यांची परवानग्या मिळवून द्यायला मदत झाली. अशावेळी सरकारकडून आंबा बागायतदाराला आवश्यक ती मदत ही मिळत नाही. ही शोकांतिका आहे.असे संदेश पाटील म्हणाले.

कोकणातील रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पालघर, ठाणे या ठिकाणी हापूस चे उत्पादन होते. यावर्षीचा विचार केला तर रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यात हापूसचे उत्पादन अधिक आहे, तर अन्य जिल्ह्यात आंबा उत्पादनात घट झाली आहे. रायगडमध्ये ३० टक्के पेक्षा उत्पादन कमी आहेत. सध्या कीटक आणि रोगाचा प्रादुर्भाव अधिक परिणामकारक ठरत आहे.



अनेक वर्षे करीत असलेल्या फवारण्या, रोग प्रतिबंधात्मक उपाय करतो, मात्र आता किटकात प्रतिकारशक्ती निर्माण झाल्याचे दिसते. फुलकीड ही छोटीशी कीड असून ती प्रचंड नुकसान करते. फवारणीचा सर्वाधिक खर्च फुल किड्यांवर नियंत्रण आणण्यासाठी होतो. यावर्षी कोकणातील पाचही जिल्ह्यात फुलकिड्याने आंबा बागायती व्यापल्या आहेत. प्रशासनाला, कृषी विभागाला सूचना देऊन ही कोणतीही कृती दिसत नाही. त्यामुळे आंबा बागायतदार संकटात आहेत. हवामानाचा, उष्णतेचा आंबा उत्पादनाला फटका बसला असून कोकणातील आंबा बागायतदार संकटात असल्याचे दिसत आहे, असे संदेश पाटील म्हणाले

कोकणातील पाच जिल्ह्यात जो आंबा पिकतो, तोच हापूस आंबा आहे. इतर ठिकाणचा आंबा हापूस नाही. इतर राज्यातील आंबा हापूस सदृश आंबा असतो. त्या आंब्याला हापुसचा स्वाद नसतो. आज अलिबाग पासून पनवेल पर्यंत रस्त्यावर विक्रीसाठी आंबा विक्रीस आला आहे. मात्र यात हापूसच्या नावाखाली ग्राहकांची फसवणूक होते. हापूस आंब्याचा रंग, स्वाद आणि सुगंध यावरून ओळखता येतो. ग्राहकांनी आंबा विकत घेताना कोकणातील आंबा बागायतदार, शेतकरी यांच्याशी संपर्क साधून आंबा खरेदी करावा तसेच आम्ही जो जीआय टॅग मिळवला आहे ते पाहून आंबे घ्यावेत. आम्ही यावर्षी पासून पीआर कोड लावत असून ग्राहकांनी तपासून रिसर्च शोधून आंबे खरेदी करावेत असे आवाहन संदेश पाटील यांनी केले आहे.

रायगडातील हापुसचा सातासमुद्रापर डंका असून यामध्ये आखाती देश, युरोप, व अमेरिका यांचा समावेश आहे. या देशात हापूसला मोठी मागणी आहे. अशी माहिती संदेश पाटील यांनी दिली. राज्यातील आंब्याचे हापुसवर अतिक्रमण होत असल्याने कोकणच्या शेतकऱ्यांवर अन्याय होत आहे. सध्या आंब्याची बागायत करणे आर्थिक दृष्ट्या कठीण बनले आहे. मजुरांचा खर्च परवडणारा नाही. परराज्यातील आंबा विक्रेते हे इंडियन मँगो म्हणून आंब्याची विक्री करतात, ते आंबा स्वस्त देतात, मात्र त्याला चव नसते. यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत हापुसचे नाव बदनाम होत आहे. अशी चिंता संदेश पाटील यांनी व्यक्त केली. आंबा बागायतदार संदेश पाटील यांनी आंब्याचे प्रकार सांगताना हापूस, केशर, राजापुरी पायरी, तोतापुरी, नीलम या आंबा जाती आहेत. एकूण नाव असलेल्या २४३ जाती आहेत. न इतर राज्यात लंगडा बनारस, चौसा, बैगन पल्ली, लालबा या जाती आहेत. हापूस आंबा दर्जेदार व रुचकर असल्याने मागणी मोठी आहे.

## राधाकृष्ण मंदिर शताब्दी महोत्सव

**तळा :** रहाटाड कोळीवाडा येथे सोमवार व मंगळवार असे दोन दिवस श्री राधाकृष्ण मंदिर शताब्दी महोत्सवी वर्धापनदिन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.राधाकृष्ण मंदिराच्या वर्धापनदिनाचे यावर्षी शंभरावे वर्ष असल्याने रहाटाड कोळीवाडा ग्रामस्थ व मुंबई मंडळांतर्फे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.तसेच यावेळी विविध धार्मिक कार्यक्रम देखील पार पडणार आहेत. ज्यामध्ये सोमवार दि.२७ मे रोजी सकाळी ९ ते १२ ग्रामस्थांचे भजन,१२ ते २ महाप्रसाद, रात्री ८ वा. धनुर्वेद पौराणिक नाटक व मंगळवार दि.२८ मे रोजी सकाळी ६ वा. अभिषेक, ९ वा. श्री सत्यनारायणाची महापूजा,१२ ते २ महाप्रसाद, दुपारी ३ ते ६ भव्य पालखी मिरवणूक, सायंकाळी ७ वा. कीर्तन, रात्री ८.३० ते ९.३० महाप्रसाद व १० वा. भजन असे कार्यक्रम पार पडणार असून भाविकांनी आवर्जून उपस्थित राहून तिर्थप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

## गवळवाडी येथे श्री विठ्ठल रखुमाई मंदिर वर्धापन दिन



**। म्हसळा । वार्ताहर ।**

म्हसळा शहरात प्रतिपंढरपुर असलेल्या गवळवाडी येथे बालमित्र ग्रामस्थ, मुंबई मंडळ, शिवांजली क्रिकेट संघ यांच्या संयुक्त विद्यमाने श्री विठ्ठल रखुमाई मंदिराचा २२ वा वर्धापनदिन सोहळा अत्यंत उत्साही व भक्तीमय वातावरणात आंनदी आनंदात साजरा करण्यात आला.

वर्धापन दिनाचे औचित्याने अभिषेक सोहळा,पालखी मिरवणूक, श्री सत्यनारायणाची महापुजा, महाआरती, महाप्रसाद, सांस्कृतिक कार्यक्रम, विद्यार्थी गुणगौरव आणि दानशूर मान्यवरांचा सत्कार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी स्थानिक ग्रामस्थ आणि शिवांजली क्रिकेट क्लबच्या कार्यकर्त्यांनी अथक मेहनत घेतली.कला आणि क्रीडा क्षेत्रात प्राविण्य प्राप्त केलेल्या विद्यार्थी वर्गाला शिष्यवृत्ती रोख बक्षीस व शाम कासार यांचे वतीने शैक्षणिक साहित्य भेट देऊन सन्मानित करण्यात आले.वर्धापदिनानिमित्त गावातील बहुतांश सदस्यांनी देणगी तर सदस्य परेश खताते यांनी अन्नदान केले.

आयोजित कार्यक्रमात शहराचे माजी नगराध्यक्ष दिलीप कांबळे, अशोक काते, महादेव पाटील, नगराध्यक्ष संजय कर्णिक, रविंद्र लाड, मधुकर गायकर, ॲड.मुकेश पाटील, लक्ष्मण कांबळे, शांताराम घोले,दत्ता महाडीक ,मोहन किळजे, सुशांत लाड, राजाराम खेडेकर, संजय खांबेटे, दिलीप करंबे, राखी करंबे, सुजित काते, प्रदिप कदम, श्रीकांत बिरवाडकर आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महागणपतीच्या दर्शनासाठी रांगा

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यातील चिरनेर महागणपतीच्या मंदिरात संकष्टी चतुर्थीनिमित्त गणेशभक्तांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती. पहाटेपासूनच भक्तांच्या रांगा लागल्या होत्या. यावेळी नवविवाहित जोडप्यांसह अन्य भाविकांनी गणरायाचे मनोभावे दर्शन घेतले. पेशव्यांच्या काळात महाराष्ट्रात अनेक ठिकाणी गणेशाची मंदिरे उभारण्यात आली.

चिरनेर येथील गणपतीच्या मंदिराची निर्मिती पेशवे बाळाजी बाजीराव उर्फ नानासाहेब पेशवे यांच्या कारकीर्दीत झाल्याची नोंद आहे. चिरनेर येथील गणपती मंदिर हे हेमाडपंथीय धाटणीचे दिसून येते. हे गणपती देवस्थान अत्यंत



जागृत असून, या ठिकाणी आलेल्या भक्तांची दुःखे निश्चित दूर होतात, अशी गणेशभक्तांची श्रद्धा आहे.

सुट्टीच्या दिवशी रविवारी (दि. २६) संकष्टी चतुर्थी आल्याने मंदिर परिसराला जत्रेचे स्वरूप प्राप्त झाले होते.उरण तालुक्यातील भक्तांबरोबर पनवेल, नवी मुंबई, ठाणे, कल्याण, मुंबई, पेण या शहरातील हजारो भाविकांनी कुटुंबासह महागणपतीचे दर्शन घेण्यासाठी सकाळपासून गर्दी केल्याचे चित्र पहावयास मिळत होते. येणाऱ्या भाविकांसह पर्यटकांना वाढत्या उष्णतेचा त्रास होऊ नये यासाठी सामाजिक कार्यकर्ते संतोष ठाकूर, गणपती देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष, सदस्य विशेष मेहनत घेत होते.

# नेहा कातकरीचा सन्मान

**। रसायनी । वार्ताहर ।**

नेहा कातकरी हिने बारावी वाणिज्य शाखेत परिसरात प्रथम येण्याचा मान पटकावला आहे. दुर्गम भागातील गरीबीची झळ सोसत नेहाने कष्टाचे चीज केले आहे. नेहाच्या यशाबद्दल तिचे पाताळगंगा येथील कोकुयो कॅमलीन कंपनीचे वरिष्ठ जनरल मॅनेजर दिपक कापसे यांच्या हस्ते किट संच देऊन तिला गौरविण्यात आले.

यावेळी अकाऊंट विभागाचे सचिन सावंत, धनेश पाटील, रुपेश ठाकूर, उत्पादन विभागाचे शंतनू भालगे, निखिल कुलकर्णी, धनंजय ठाकूर, प्रतीक साहू, परचेस विभाग दर्शन माळी, अमर भोसले, स्टोअर विभागाचे गणेश ओव्हाळ, एचआर विभागाचे प्रसाद खैरे, महेश पाटील, सुरक्षा विभागाचे प्रज्योत डाके आदी उपस्थित होते.

रसायनी पाताळगंगा अतिरिक्त एमआयडीसीपरिसरातीलमाध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय चावणे येथील बारावीचा वाणिज्य शाखेत शिक्षण घेणारी नेहा कातकरी हिने मेहनतीचे चीज केले असून, तिच्यावर रसायनी पाताळगंगा परिसरात अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. नेहाने रोज येता-जाता आठ कि.मी. पायी प्रवास करुन चावणे येथील शाळेत बारावीपर्यंतचे शिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केले आहे.



**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टा मध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडुन आमचे अशिलांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावरही नोटीस प्रसिध्द झाल्या पासून ७ (सात) दिवसांत कळवावे. मुदती मध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टा मध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालका बरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाहय हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मौजे नालधे, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नांव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे आर-पॉ | आकार रु.- पै. |
|---|---|---|---|---|
| भास्कर यशवंत म्हसे | ६७ | ४ | ०-०८-० | ०-०५ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- मु. पो. कशेळे,
कर्जत-मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर,
ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१

सही /-
**ॲड. भुपेश तानाजी पेमारे**
दिनांक :- २७/०५/२०२४
मो. नं. ९१५८२७७७२८

# घरांच्या शाकारणीच्या कामांना सुरुवात

**। तळा । वार्ताहर ।**

तळा तालुक्यात सध्या ग्रामीण भागात घरांच्या शाकारणीच्या कामांना नागरिकांनी सुरूवात केल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. नेहमीच होणारा वातावरणीय बदल व एप्रिल पासून तर अनेकवेळा ढगाळ वातावरण व अनेक ठिकाणी पडणारा पाऊस यामुळे नागरिकांनी आता घरांच्या शाकारणीच्या कामांना जोरात सुरूवात केली आहे. तसेच मान्सून लवकर येईल असा अंदाज हवामाने खात्याने वर्तवल्याने प्रत्येकाची



कामे सुरू असल्याने मजूरीने माणसेही मिळेनाशी झाली आहेत.

कोठे कौले फुटतुट, तर कोठे कौलारू घरांच्या रिपा कुजल्याने, तर काही घरांचे पत्रे तुटल्याने त्यात्या ठिकाणी नवीन कौले आणून टाकली जात आहेत.

मात्र ग्रामीण भागात आजही अधिक प्रमाणात कौलारू घरे असल्याने फुटतुट झालेल्या कौलांच्या ठिकाणी कौलांचाही तुटवडा पडत आहे. कौले बाजारात मिळताना कठिण होऊन बसले आहे. मात्र तरीही कौले उपलब्ध करून नागरिक आणत आहेत व घरांची शाकहारणी पावसाळ्या पूर्वी करण्यात नागरिकांची लगबग सुरू आहे. अवकाळी पाऊस कधीही पडत असून नियमित ढगाळ वातावरण होत असल्याने घराची शाकारणी लवकर करण्याकडे नागरिक अधिक भर देत असल्याचे पहावयास मिळत आहे.

## वृद्ध महिलेची फसवणूक

**। पनवेल । वार्ताहर ।**

पनवेल भाजी मार्केटमध्ये भाजी आणण्यासाठी गेलेल्या एका ज्येष्ठ महिलेला दोन अज्ञातांनी बोलबच्चन देत तिच्याकडील तब्बल तीन लाखांचा ऐवज लंपास केला. या महिलेने आपली फसवणूक झाल्याचे लक्षात घेताच पनवेल शहर पोलीस ठाण्यात धाव घेतली आहे. पनवेल शहरात एका ८५ वर्षीय प्रभावती साखरे (रा.मंगला निवास, गोडसे आळी) या भाजी घेऊन महाराष्ट्र बँकेच्या समोर झाडाखाली बसल्या असताना दोन अज्ञात इसमांनी त्यांना पिण्यास पाणी दिले. त्यानंतर ५०० रुपये देऊन ते रुमालात ठेवण्यास सांगितले.

त्यानंतर त्यांच्या हातातील सोन्याच्या बांगड्या व गळ्यात असलेली सोन्याची माळ असा जवळपास तीन लाखांचा ऐवज काढून घेऊन ते पसार झाले आहेत. याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टा मध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडुन आमचे अशिलांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहाण, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावरही नोटीस प्रसिध्द झाल्या पासून ७ (सात) दिवसांत कळवावे. मुदती मध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाहय हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मौजे नालधे, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नांव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे आर-पॉ | आकार रु.- पै. |
|---|---|---|---|---|
| किरण मधुकर बोऱ्हाडे | ६७ | ३/अ | १-६७-५० | १-८६ |
| | यापैकी लिहून देणार यांच्या मालकीच विक्री केलेले क्षेत्र हे-० आर-२५ पॉ-०० मात्र. | | | |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- मु. पो. कशेळे,
कर्जत-मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर,
ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१

सही /-
**ॲड. भुपेश तानाजी पेमारे**
दिनांक :- २७/०५/२०२४
मो. नं. ९१५८२७७७२८

**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे चेरवली, तालुका माणगाव, जिल्हा रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. अनिल प्रसन्नकुमार रावत यांचेकडून खरेदी घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे सविस्तर वर्णन खालीलप्रमाणे,

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे. आर) | आकार (रू. पैसे) | भुधारणा पद्धत |
|---|---|---|---|---|
| चेरवली, ता. माणगाव | ३५० | १-०७-००<br>०-१३-००<br>१-२०-०० | ०.४५ | वर्ग-१ |

सदर मिळकतीपैकी क्षेत्रफळ ०-४०-०० हे. आर.

तरी सदर मिळकतीत अन्य कुणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्र, अन्नवस्त्र, जप्ती, लिज, कर्जाचा बोजा, जामिनकी, कुळहक्क, कबजा, वारसाहक्क, मालकी, एम. ओ. यु. करार, ताबे कब्जा वहीवाटी, रस्ता वहीवाट, कोर्टकचेरी वगैरे संबंधी कसल्याही प्रकारचे हक्क अगर हितसंबंध अगर तकार/हरकती असल्यास त्यांनी त्यांची हरकत ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १४ दिवसांचे मुदतीत लेखी स्वरूपात, प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे सादर कराव्यात. विहीत मुदतीत कोणाचीही काहीही हरकत वा तकार न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बिनजोखमी व बोजारहीत असल्याचे गृहीत धरून सदरचा खरेदीचा व्यवहार पूर्ण केला जाईल व या मुदतीनंतर आलेल्या हरकती व तकारी आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक : २६/०५/२०२४
संमतीदर्शक सही /-
श्री. अनिल प्रसन्नकुमार रावत

सही/-
**ॲड. सचिन सदानंद पाटील**
रा. कुरूळ, ता. अलिबाग, जि. रायगड
ऑफीस : ऋग्वेदा अपार्टमेंट, श्रीबाग नं. ३,
ता. अलिबाग, जि. रायगड
फोन नं. : ९८८१६३७९२४/८८८८८६७६५०

# गावोगावच्या जत्रांमधून जुन्या आठवणींना मिळतोय उजाळा!

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

सध्या ग्रामीण भागातील विविध गावांच्या ग्रामदैवतांच्या यात्रांचा हंगाम सुरू आहे; तसेच शाळांनाही सुट्या लागल्याने चाकरमानी आपल्या मुलांसह आपल्या गावी आले आहेत. निवडणुकीच्या आचारसंहिता काळातही काही गावांत यात्रा भरली. त्यानंतर आता उरलेल्या यात्रा मोठ्या उत्साही वातावरणात होत असून, यातून जुन्या आठवणींना उजाळा मिळत आहे.

गावची यात्रा म्हणजे सर्वांसाठी एकप्रकारे मोठा उत्सव असतो. यामध्ये पै-पाहुणे, जुने सवंगडी यांच्या गाठीभेटी घडून येतात. कोरोना काळात मात्र है सर्व थांबलं गेलं होतं. गतवर्षीपासून पुन्हा मोठ्या स्वरूपात यात्रा होऊ लागल्या. आचारसंहितेच्या निर्बंधांमुळे मनोरंजन करणाऱ्या मंडळांना काही प्रमाणात फटका बसला, अशा परिस्थितीत ते आपली कला सादर करताना दिसले. सध्या उन्हाळा कडक जाणवत आहे; मात्र तरीही सुट्या व ग्रामदैवत यात्रांमुळे गावोगावचे वातावरण गर्दीने बहरून जात आहे. यात्रेसाठी आलेले चाकरमानी, नागरिक हे आपल्या ग्रामदैवतांचे दर्शन घेऊन छबिन्यात गुलालाने माखून वाद्याच्या तालावर देहभान हरपून ठेका ठरत मनमुराद आनंद घेत आहेत. दरम्यान, आपल्या कुटुंबासमवेत यात्रेत वस्तूंची खरेदी केली जात आहे. दुसऱ्या दिवशी मनोरंजनात्मक तमाशा मंडळाचा कार्यक्रम पाहण्यासाठी शौकीन येताना दिसतात. वास्तविक पूर्वीच्या तुलनेत ही संख्या सध्या कमी झाल्याचे गावोगावी दिसते. वय कितीही झाले तरी जुन्या मित्रांसोबत यात्रेत फेरफटका मारायला विसरत नाही.

# धोकादायक झाडांची छाटणी

**पनवेल :** पनवेल महापालिकेने धोकादायक झाडांची छाटणी हाती घेतली असून, ३११७ धोकादायक झाडांची छाटणी केली आहे. उपायुक्त डॉ. वैभव विधाते यांच्या मार्गदर्शनात वृक्ष प्राधिकरण विभागाचे अधिकारी संदीप पवार हे काम पाहात असून, वृक्ष छाटणीचे काम सुरू केले आहे. जवळपास ३२ कर्मचारी आणि दोन पर्यवेक्षक याकामी कार्यरत आहेत. याकरिता दोन टेम्पो, एक स्कायलिफ्ट तसेच १२ ट्री कटर मशीन अशी यंत्रसामुग्री आहे. चार प्रभागात दररोज वृक्ष छाटणीचे काम सुरू आहे. २२ मेपर्यंत ८२ टक्के काम पूर्ण झाले आहे.

**वाचकांसाठी निवेदन**

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM E-TENDER NOTICE (3rd Call)**

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender specification.**

| Sr. No. | Tender/Notice No. | Particulars of Tender | Estimated Cost of Tender |
|---|---|---|---|
| 1. | **Tender No:-** EE/EHV (O&M)/DIVN/MHD/Tech/ 3rd Call /Tender No.-09/ 2024-25 Dt:-08.05.2024 RFx No.7000031161 | **Sub:-** 3rd Call for SRM E-Tender Restoration and Maintenance of the SECURITRON Make Fire Detection and Alarm System provided at 220 kV Kandalgaon SS, 100 kV Roha SS & 100 kV Mhasala SS under EHV (O&M) Division Mahad. | **Rs.17,39,204/- (Including GST + 1% Labour CESS)** |

EMD will be the 1% of the estimated cost or 5000/- whichever is the highest & tender fee will be the 500/- plus GST.
Bid submission is from 27.05.2024 @ 00:00 hrs to 02.06.2024 @23:59 Hrs for above tender
For further details visit our website:- https://srmetender.mahatransco.in.
**Contact Person:-** The Addl.Executive Engineer, (O) : Phone No.7373101089
Note: All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**-Sd/-**
**Executive Engineer, EHV(O&M) Dn. Mahad**

**जाहीर सूचना**

आम जनतेला याद्वारे सूचित करण्यात येते की आमचे अशील परिशिष्टित मालमत्तेपैकी ००-५३-६० एच ए क्षेत्र सध्याच्या मालकांकडून मालकी हक्काने खरेदीने घेऊ इच्छित आहेत आणि सध्याचे मालक यांनी असे कळविले आहे की सदरील मालमत्ता जिचा सविस्तर तपशील सोबतच्या परिशिष्टात विस्ताराने देण्यात आला आहे ती मालमत्ता सर्व त्या भारांपासून मुक्त आहे. मात्र कोणत्याही व्यक्तीचा सदरील मालमत्तेवर विक्री, वारसा, ताबा, उत्तराधिकारी, तारण, लिन, लीज, भेट आणि किंवा अन्य कोणत्याही प्रकारे अथवा कोणत्याही माध्यमातून दावा, हक्क किंवा हक्क संबंध आदी असल्यास त्यांनी त्या संदर्भातील आपल्या हरकती लेखी स्वरूपात निम्नस्वाक्षरीकार यांच्याकडे आपल्या हरकतीच्या पुष्ट्यर्थ आवश्यक त्या कागदपत्रांसह, ही सूचना प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून ७ दिवसांत सादर करणे आवश्यक आहे अन्यथा असे दावे विचारात घेण्यात येणार नाहीत आणि दावे असल्यास ते अधित्यजित आहेत, असे समजण्यात येईल आणि आमचे अशील अशा दाव्यांच्या अनुपस्थितीत व्यवहार पूर्ण करतील आणि त्यानंतर कोणत्याही दाव्याचा विचार करण्यात येणार नाही.

**मालमत्तेचे परिशिष्ट**

१ शेती भूखंड क्षेत्र ००-१९-५० एच ए गट क्रमांक ४९, हिस्सा क्रमांक २ आकारणी रु ०. ५८ मौजे नारंगी, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड राज्य महाराष्ट्र, अलिबाग पंचायत समिती यांच्या हद्दीत आणि नोंदणी जिल्हा रायगड आणि उपजिल्हा अलिबाग या मालमत्तेचा पूर्ण तो भाग

२ शेती भूखंड क्षेत्र ००-१८-१० एच ए गट क्रमांक ५५, हिस्सा क्रमांक १ डी आकारणी रु ०. ३१ मौजे नारंगी, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड राज्य महाराष्ट्र, अलिबाग पंचायत समिती यांच्या हद्दीत आणि नोंदणी जिल्हा रायगड आणि उपजिल्हा अलिबाग या मालमत्तेचा पूर्ण तो भाग

३ शेती भूखंड क्षेत्र ००-३२-६० एच ए गट क्रमांक ४९, हिस्सा क्रमांक १ सी आकारणी रु ६. ५६ मौजे नारंगी, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड राज्य महाराष्ट्र, अलिबाग पंचायत समिती यांच्या हद्दीत आणि नोंदणी जिल्हा रायगड आणि उपजिल्हा अलिबाग या मालमत्तेचा पूर्ण तो भाग

**स्थळ : मुंबई**
**दिनांक : २७-०५-२०२४**

**अलाथिया लॉ एलएल पी**
**ॲडव्होकेट्स अँड सॉलिसिटर्स**
**१२२, १२ वा मजला, मित्तल टॉवर- सी**
**नरिमन पॉईंट, मुंबई ४०० ०२१**

निवडक

## जेसन होल्डरची माघार

**नवी दिल्ली :** क्रिकेट वेस्ट इंडीजने आगामी टी-२० विश्वचषक स्पर्धेसाठी वेस्ट इंडिजच्या संघात बदल करण्यात आला आहे. अनुभवी गोलंदाज जेसन होल्डर याने दुखापतीमुळे स्पर्धेतून माघार घेतली आहे आणि त्याच्या जागी डावखुरा वेगवान गोलंदाज ओबेड मॅकॉय याला संघात स्थान देण्यात आले आहे.
होल्डरची अनुपस्थिती लक्षणीय असताना, मॅककॉयच्या समावेशासह संघ मजबूत राहील, अशी खात्री वर्तविण्यात येत आहे.

## केक खाण्यास रोहितचा नकार

**नवी दिल्ली :** रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली भारतीय संघ २ जूनपासून सुरू होणाऱ्या टी-२० विश्वचषक स्पर्धेत खेळणार आहे. अमेरिका व वेस्ट इंडिज येथे होणाऱ्या या स्पर्धेसाठी भारतीय संघाची पहिली तुकडी न्यू यॉर्कसाठी काल रवाना झाली. यावेळी रोहितच्या नेतृत्वाखाली पहिल्या तुकडीने मुंबई विमानतळावर छोटेखानी सेलिब्रेशन केले. यामध्ये रिषभ पंत रोहितला केक भरवण्याचा प्रयत्न करताना दिसतोय, परंतु रोहितने त्यास स्पष्ट नकार दिला.

## नताशाची कॉमेंट व्हायरल

**नवी दिल्ली :** हार्दिक पंड्या आणि त्याची पत्नी नताशा स्टॅनकोविक हे जोडपं वेगळ होणार असल्याच्या चर्चांनी सोशल मीडियावर उधाण आले आहे. हार्दिक-नताशा घटस्फोट घेणार असल्याची बातमी वणव्यासारखी सगळीकडे पसरली आहे. एकीकडे त्यांच्या विभक्त होण्याच्या बातम्या जोरात आहेत, तर दुसरीकडे हार्दिक पंड्याचा भाऊ आणि क्रिकेटर कृणाल पंड्याच्या पोस्टवर नताशाची कॉमेंट व्हायरल होत आहे.तिच्या या कमेंटमुळे नेमकं पंड्या कुटुंबामध्ये चाललंय काय, असे प्रश्न लोकांच्या मनात आहेत.

## सॅमसन लवकरच यूएसएला

**नवी दिल्ली :** संजू सॅमसन भारतीय संघासोबत अमेरिकेला गेलेला नाही. त्यातच संजू सॅमसनबद्दल बातम्या येत आहेत की त्याला दुबईमध्ये काही वैयक्तिक काम आहे, ज्यामुळे तो भारतीय संघासोबत यूएसएला जाऊ शकणार नाही. संजू नंतर संघात सामील होईल. एका वृत्तानुसार, बीसीसीआयने यासाठी संजू सॅमसनला परवानगी दिली होती, त्यामुळे संजू भारतीय संघासोबत जाऊ शकला नाही. आता तो लवकरच संघात सामील होऊ शकतो.

## धवनने केला मोठा खुलासा

**नवी दिल्ली :** सध्या क्रिकेटपासून दूर असलेला खेळाडू शिखर धवन पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. त्याचे कारण म्हणजे गब्बरने केलेला एक खुलासा. शिखर धवनने एका शोमध्ये बोलताना भारतीय महिला क्रिकेट संघाची माजी कर्णधार मिताली राजबाबत एक मोठा खुलासा केला आहे. शिखर धवनने सांगितले की, माझ्या लग्नाबद्दल काही अफवा पसरवल्या गेल्या होत्या. मी मिताली राजसोबत लग्न करणार असल्याचे देखील पसरवण्यात आले. आणि आम्ही लग्न करणार असल्याची माझ्या जीवनातील सर्वात मोठी अफवा होती.



# नाशिकची तन्वी पार करणार 'इंग्लिश खाडी'



### थंडगार पाण्यात पोहण्याचा विक्रम रचणार?

**। नाशिक । प्रतिनिधी ।**

इंग्लिश चॅनल ही अटलांटिक महासागरातील एक खाडी आहे, जी इंग्लंडला फ्रान्सपासून वेगळी करते. ही स्पर्धा डोवर येथून सुरू होते आणि फ्रान्समधील कॅप ग्रीस नेझ येथे संपते. हे अंतर ३४ किलोमीटर असून उन्हाळ्यात पाण्याचे तापमान १३ ते १६ डिग्री सेल्सिअस पर्यंत असते. स्पर्धा २४ तासांत पूर्ण करणे बंधनकारक आहे. यासाठी तन्वी नाशिकच्या जलतरण तलावावर गेल्या दोन महिन्यांपासून अथक परिश्रम घेत आहे. तिने आताच सलग १२ तास पोहण्याचा सराव केला आहे. आपण नक्कीच इंग्लिश खाडी पार करत भारताचे नाव उंचावेल, अशी तन्वीला आशा आहे.

इंग्लिश खाडी ही स्पर्धा चॅनेल स्विमिंग असोसिएशन डोहर (युके) या अधिकृत संघटनेमार्फत घेण्यात येत आहे. या स्पर्धेसाठी पात्र होण्याकरिता १५ डिग्री सेल्सिअस तापमानात सहा तास स्विमिंग असोसिएशनच्या निरीक्षकांच्या देखरेखीखाली करणे आवश्यक असते. तन्वीने ही पात्रता फेरी हिवाळ्यात ११ डिग्री सेल्सिअस तापमानात नैनिताल येथे असोसिएशनच्या निरीक्षकांमार्फत सहा तास स्विमिंग करून दिली. त्यामध्ये ती यशस्वी झाल्याने तिला या स्पर्धेत प्रवेश मिळाला. तन्वीची निवड रिले आणि वैयक्तिक दोन्ही प्रकारात झाली आहे. रिलेमध्ये चार जलतरणपटू प्रत्येकी ८ किलोमीटर स्विमिंग करतील. तन्वीसोबत दोन भारतीय, एक अमेरिकन आणि एक ब्रिटीश जलतरणपटू रिले संघात आहेत. रिले स्पर्धा १३ ते १४ जून दरम्यान होणार आहे.

### अनेक स्पर्धांमध्ये केले यश संपादन

तन्वीला वयाच्या सातव्या वर्षापासून स्विमिंगची आवड आहे आणि तिने अनेक पदके जिंकली आहेत. आतापर्यंत शालेय आणि संघटनेच्या राज्य व राष्ट्रीय स्तरावर अनेक पदके प्राप्त केली आहेत. शिवाय धरमतरर्फे गेटवे ऑफ इंडिया (३५ किमी), संक रॉक ते गेटवे ऑफ इंडिया (पाच किमी) आणि इंडियन नेव्हीच्या नेव्ही डॉक यार्डमध्ये होणाऱ्या सहा किमी सागरी जलतरण स्पर्धा यशस्वीरित्या जिंकलेल्या आहेत. तसेच, मुर्शिदाबाद येथे होणाऱ्या नदीतील १९ किमी स्पर्धा देखील जिंकलेली आहे.

### स्वप्न साकार करण्याचा ध्यास

तन्वीने २०१० पासून स्विमिंगचा सराव बंद केल्यानंतर लहानपणी पाहिलेले स्वप्न साकार करण्याची उर्मी तिला स्वस्थ बसू देत नव्हती. लग्न झाल्यानंतर तिला दोन जुळी मुले आहेत व ते आज सहा वर्षांचे आहेत. अशा परिस्थितीत स्वप्न साकार करण्यासाठी तन्वीने पुन्हा नव्या उमेदीने आणि जिद्दीने २०२३ मध्ये सरावास सुरुवात केली. तन्वीने इंग्लिश चॅनेल पार करून नाशिकची पहिली जलतरणपटू होण्याचा मान मिळवावा ही नाशिककरांची अपेक्षा आहे; कारण यापूर्वी नाशिकच्या कोणत्याही जलतरणपटूंनी या स्पर्धेत सहभाग देखील घेतलेला नाही. तिचा सराव व जिद्द बघता तन्वी ही स्पर्धा निश्चितच पार करेल याचा विश्वास नाशिकरांना वाटत आहे.

# आयर्लंडनंतर आता इंग्लंडने दाखवले अस्मान



**जॉस बटलरच्या संघाने पाकिस्तानला लोळवले**

**। लंडन । वृत्तसंस्था ।**

इंग्लंडने दुसऱ्या टी-२० सामन्यात पाकिस्तानचा पराभव केला. बाबर आझमच्या नेतृत्वाखालील पाकिस्तान संघाचा २३ धावांनी पराभव केला. पहिला टी-२० सामना पावसामुळे रद्द झाला होता. यामुळे चार टी-२० सामन्यांच्या मालिकेत इंग्लंडने १-० अशी आघाडी घेतली आहे. प्रथम फलंदाजी करत इंग्लंडने २० षटकात ७ बळी गमावत १८३ धावा केल्या. या लक्ष्याचा पाठलाग करताना पाकिस्तानने १० बळी गमावत १९.२ षटकात १६० केल्या.

इंग्लंडने दिलेल्या १८३ धावांचा पाठलाग करताना पाकिस्तानच्या डावाची सुरुवात खराब झाली. पाकिस्तानचा सलामीवीर मोहम्मद रिझवानला एकही धाव करता आली नाही. सॅम आयूब ७ चेंडूवर २ धावा करत बाद झाला. यानंतर कर्णधार बाबर आझम आणि फखार जमानने संघाला सावरण्याचा प्रयत्न केला. बाबर आणि फखारमध्ये चांगली भागिदारी झाली. परंतु, पाकिस्तानच्या इतर फलंदाजांनी निराश केले. बाबर आझमने २६ चेंडूत ३२ धावा केल्या. तर, फखार जमानने २१ चेंडूत ४५ धावांची खेळी केली. इफ्तिकार अहमदने २३ धावा केल्या. इंग्लंडकडून गोलंदाजी करताना मोइन अली आणि जोफ्रा आर्चरला प्रत्येकी २-२ विकेट्स मिळाल्या. याव्यतिरिक्त क्रिस जॉर्डन, आदिल रशीद आणि लिव्हिंगस्टोनने प्रत्येकी १-१ बळी घेतले.

### जॉस बटलरची तुफानी खेळी

**पाकिस्तानचा कर्णधार बाबर आझमने नाणेफेक जिंकत प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. प्रथम फलंदाजी करताना इंग्लंडने १८३ धावा केल्या. इंग्लंडकडून जॉस बटलरने ५१ चेंडूत ८४ धावांची खेळी केली. या खेळीत बटलरने ८ चौकार आणि २ षटकार टोलावले. विल्स जॅक्सने २३ चेंडूत ३७ धावा केल्या. बलटर आणि जॅक्स व्यतिरिक्त इंग्लंडच्या इतर कोणत्याही फलंदाजाने चांगली कामगिरी केली नाही.**

# पुणेरी बाप्पाच्या जर्सीचे अनावरण



**। पुणे । प्रतिनिधी ।**

आयपीएलप्रमाणे क्रिकेटचे सामने आता महाराष्ट्रात भरवले जात आहेत. यामध्ये पुण्यातील पुणेरी बाप्पाच्या जर्सीचे अनावरण रविवारी करण्यात आले. यामध्ये या संघाने चांगली तयारी केली आहे. या संघासोबत काम करायला मला आवडत आहे. या संघाची तयारी पाहून आम्ही नक्कीच ट्रॉफी जिंकू असे वाटत आहे. असे पुणेरीचा कर्णधार ऋतुराज गायकवाडने सांगितले. महाराष्ट्रातील पुणेरी बाप्पा या संघाने मागच्या वेळी तयारी चांगली केली असली तरी त्यांना विजेतेपदाची गवसणी घालता आली नव्हती. परंतु, यावेळी आम्ही नक्कीच विजेतेपद प्राप्त करू असा विश्वास ऋतुराज गायकवाडने व्यक्त केला आहे.

### जागतिक पॅरा ॲथलेटिक्स स्पर्धा

# आक्षेपानंतर भारतीय खेळाडूंना रौप्य व कांस्य

**। कोबे । वृत्तसंस्था ।**

जागतिक पॅरा ॲथलेटिक्स स्पर्धेत एफ ४६ गटातील भालाफेकीत आवश्यक असलेली शारीरिक पात्रता नसल्याने श्रीलंकेच्या रौप्यपदक विजेत्या खेळाडूला अपात्र ठरविण्यात आले. त्यानंतर भारतीय खेळाडूंना रौप्य व कांस्यपदक बहाल करण्यात आले. रौप्यपदक जिंकणाऱ्या दिनेश हेराथच्या शारीरिक क्षमतेबाबत भारतीय संघ व्यवस्थापनाने आक्षेप घेतला होता. हा आक्षेप मान्य करण्यात आल्यानंतर सुधारित निकाल जाहीर करण्यात आला.



पुरुषांच्या एफ ४६ गटातील भालाफेकीत भारताच्या रिंकू हुडा आणि अजित सिंग यांनी अनुक्रमे तिसरे व चौथे स्थान मिळविले होते. मात्र, हेराथची शारीरिक क्षमता नियमानुसार नसल्याने भारताने आक्षेप घेतला. त्यामुळे हा निकाल राखून ठेवण्यात आला होता. हेराथच्या शारीरिक क्षमतेनुसार त्याचे वर्गीकरण योग्य प्रकारे करण्यात आले नव्हते आणि तो एफ ४६ गटात भाग घेण्यास पात्र नव्हता, अशी प्रतिक्रिया भारतीय पॅरालिंपिक समितीच्या अधिकाऱ्यांनी दिली. त्यामुळे हेराथला अपात्र ठरवून रिंकूला रौप्य, तर अजित सिंगला ब्राँझपदकावर बढती देण्यात आली. रिंकूने स्पर्धेत ६२.७७ मीटर, तर अजितने ६२.११ मीटर अंतरावर भाला फेकला होता.

टोकियो ऑलिंपिकमध्येही तो खेळण्यास पात्र नसताना हेराथने सुवर्णपदक जिंकले होते. त्याच्याविरुद्धचा आक्षेप आम्ही जिंकला, असे भारतीय संघाचे प्रशिक्षक सत्यनारायण म्हणाले. या दोन सुधारित पदकांमुळे भारताची पदकांची संख्या १४ झाली आहे. त्यात ५ सुवर्ण, ५ रौप्य, ४ ब्राँझपदकांचा समावेश असून पदकतालिकेत सहाव्या स्थानावर आहे. ही भारताची आतापर्यंतची सर्वोत्तम कामगिरी आहे. गेल्या वर्षी पॅरिसमध्ये भारतीय खेळाडूंनी एकूण १० पदके जिंकली होती.

## क्रिकेट खेळताना खेळाडूचा मृत्यू

**। शिरगाव । वृत्तसंस्था ।**


मावळ तालुक्यातील दारुंब्रे गावातील उत्कृष्ट क्रिकेटपटू म्हणून लोकप्रिय असणाऱ्या मिलिंद वसंत भोंडवे यांचे सांगवी येथे शुक्रवारी (दि.२४) क्रिकेट खेळत असताना मैदानावरच हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. सांगवी येथील पीडब्ल्यूडी मैदानावर क्रिकेट स्पर्धा भरवण्यात आल्या होत्या. या स्पर्धेचा शुक्रवारी तिसरा दिवस होता. दुपारी मिलिंद यांच्या संघाचा सामना सुरू होता. त्या सामन्यामध्ये मिलिंद गोलंदाजी करत होते. गोलंदाजी करत असतानाच त्यांना अचानक चक्कर आली आणि ते मैदानावर कोसळले.

# भारताच्या सुवर्णपदकाच्या स्वप्नांना धक्का?

**ऑलिम्पिकपूर्वी नीरज चोप्रा दुखापतग्रस्त**

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

अगामी पॅरिस ऑलिम्पिकमध्ये भारतीय भालाफेकपटू नीरज चोप्राकडून सुवर्णपदकाची सर्वात मोठीआशाआहे.पणऑलिम्पिकच्या दोन महिन्यांपूर्वी नीरज दुखापतग्रस्त झाल्याने पदकाच्या आशेला मोठा धक्का बसला आहे. या कारणास्तव त्याने ६३ व्या ऑस्ट्रावा गोल्डन स्पाइक २०२४ ऍथलेटिक्स मीटमध्ये भाग घेतला नाही. याला दुजोरा देत आयोजकांनी सांगितले की, दुखापतीमुळे तो या स्पर्धेत सहभागी होऊ शकणार नाही. मात्र, तो या कार्यक्रमाला पाहुणा म्हणून उपस्थित राहणार आहे.



दोन आठवड्यांपूर्वीच ओडिशा येथे झालेल्या फेडरेशन कपमध्ये नीरज सहभागी झाला होता. आता फेडरेशन कपदरम्यान नीरजला दुखापत झाली होती का, असे प्रश्न उपस्थित केले जात आहेत. तीन वर्षांनंतर प्रथमच भारतात स्पर्धा खेळत नीरजने बुधवारी या चषक स्पर्धेत ८२.२७ मीटरच्या सर्वोत्तम थ्रोसह सुवर्णपदक जिंकले. मात्र, त्याचे शेवटचे दोन थ्रो घेतले नाहीत

चोप्रा पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेत भारताच्या सर्वोत्तम पदकाच्या आशेपैकी एक आहे, जिथे तो टोकियो ऑलिम्पिकमध्ये जिंकलेले सुवर्णपदक कायम ठेवण्यास उत्सुक असेल. आयोजकांनी सांगितले की त्यांना चोप्राने ही माहिती दिली असून त्यामध्ये या स्पर्धेत भाग घेणार नसल्याचे सांगितले. त्याच्या जागी युरोपियन चॅम्पियन जर्मनीचा ज्युलियन वेबर या स्पर्धेत सहभागी होणार असल्याचे सांगण्यात येत आहे.

# गौतम गंभीर अर्ज करण्यास तयार

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारतीय क्रिकेट नियमाक मंडळ सध्या भारतीय पुरुष क्रिकेट संघासाठी नव्या मुख्य प्रशिक्षकाच्या शोधात आहे. काही दिवसांपूर्वीच यासाठी उमेदवारी अर्ज बीसीसीआयने मागवले आहेत. यानंतर आता याबाबत अनेक नवनवीन अपडेट समोर येत आहेत. सध्या राहुल द्रविड भारतीय संघाचा प्रशिक्षक आहे. पण त्याचा करार जूनपर्यंत आहे. तसेच, त्यानंतर तो पुन्हा प्रशिक्षकपदासाठी अर्ज करणार नसल्याचे समजत आहे. त्यामुळे आता भारतीय संघाच्या प्रशिक्षकपदासाठी अनेक मोठी नावे समोर येत आहेत. त्यातच जस्टीन लँगर, रिकी पॉँटिंग, व्हीव्हीएस लक्ष्मण, कुमार संगकारा अशा अनेक दिग्गजांची नावेही चर्चेत होती. परंतु, त्यांनी अर्ज करण्यास नकार दिलेला आहे.



दरम्यान, आता कोलकाताचा मेंटॉर गौतम गंभीरच्या नावाचीही जोरदार चर्चा होत आहे. याबाबत गंभीरशी संपर्क साधण्यात आला आहे. तसेच, तो हे पद स्विकारण्यासाठी तयारही आहे. पण मिळालेल्या माहितीनुसार, जर सर्व गोष्टी योग्य झाल्या आणि बीसीसीआय जर त्यालाच हे पद मिळेल, अशा खात्रीचे संकेत देणार असेल, तरच तो २७ मे रोजी या पदासाठी अर्ज करेल. तथापि, हे देखील लक्षात घेणे गरजेचे आहे की जर गंभीर भारताचा नवा प्रशिक्षक झाला, तर त्याला आयपीएलमधील कोलकाता संघाचे मेंटॉरचे पद सोडावे लागणार आहे. पण त्यासाठी त्याला संघमालक शाहरुख खानशी देखील चर्चा करावी लागेल.

## पुजाराने ठोकले इंग्लंडमध्ये शतक

**। लंडन । वृत्तसंस्था ।**

भारतीय संघाचा अनुभवी फलंदाज चेतेश्वर पुजाराने कारकिर्दीतील ६५ वे प्रथम श्रेणी शतक झळकावले आहे. त्याने लंडनच्या लॉर्ड्स मैदानावर ही कामगिरी केली. सध्या पुजारा इंग्लंडमध्ये खेळल्या जाणाऱ्या काउंटी चॅम्पियनशिप डिव्हिजन टू २०२४ मध्ये खेळत आहे. तो गेल्या काही काळापासून भारतीय क्रिकेट संघाच्या बाहेर आहे. त्यामुळे संघात कमबॅक करण्यासाठी तो काउंटी क्रिकेटमध्ये घाम गाळत आहे. चेतेश्वर पुजारा सध्या काउंटी चॅम्पियनशिप डिव्हिजन २ मध्ये 'ससेक्स'कडून खेळत आहे. या स्पर्धेत 'मिडलसेक्स' विरुद्ध खेळल्या जात असलेल्या सामन्यात पुजाराने शतक झळकावले आहे.



## सिंधू विजेतेपदापासून एक सामना दूर

# दोन वर्षांनंतर मिळू शकेल पहिले अजिंक्यपद

**। क्वालालंपूर । वृत्तसंस्था ।**

ऑलिंपिक तोंडावर आलेली असताना फॉर्म मिळालेल्या पी.व्ही. सिंधूने मलेशिया मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेची अंतिम फेरी गाठली. विजेतपदासाठी आता केवळ एक विजय दूर असलेल्या सिंधूने पहिला गेम गमावल्यानंतर थायलंडच्या बुसमन हिचा पराभव केला. काही महिन्यांनंतर खेळत असलेल्या सिंधूने एकेक पाऊल ठोसपणे टाकत ही प्रगती केली आहे. गेल्या दोन्ही सामन्यांत तिला तीन गेमपर्यंत लढावे लागले. झालेला उपांत्य सामनाही अपवाद नव्हता; परंतु, तिला तब्बल ८८ मिनिटे प्रतिकार करावा लागला. अखेर १३-२१, २१-१६, २१-१२ आशा विजयाने अंतिम फेरीचा मार्ग सापडला.



सिंधूने २०२२ मध्ये सिंगापूर ओपन स्पर्धेचे विजेतेपद मिळवले होत. तर, गतवर्षी माद्रिद स्पेन मास्टर्स स्पर्धेत उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले होते. बुसमनवर हा तिचा १८वा विजय आहे. तिच्याविरुद्ध केवळ एकच सामना आणि तोही २०१९ मध्ये हाँगकाँग ओपनमध्ये गमावला होता.

जागतिक क्रमवारीत सध्या १५व्या स्थानावर असलेल्या सिंधूचा विजेतेपदासाठी चीनच्या वेंग झाई यी हिच्याविरुद्ध होणार आहे. वेंग या स्पर्धेत दुसरे मानांकित आहे. तर, ती जागतिक क्रमवारीत तिचे सातवे स्थान आहे. गतवर्षी आर्स्टिक ओपन स्पर्धेत सिंधू वेंगकडून पराभूत झाली होती; परंतु, तिच्याविरुद्ध एकूण तीन सामन्यांपैकी दोन सामन्यांत सिंधू सरस ठरलेली आहे.

ऑलिंपिकमध्ये एक रौप्य आणि एक ब्राँझपदक जिंकणाऱ्या सिंधूला आपला लय सापडल्याचे दिसून येत आहे. मुळात गुडघा दुखापतीनंतर ती परतली आहे. पुनरागमनात तिचा आक्रमक खेळ कायम राहिला आहे, हे विशेष. या मलेशिया मास्टर्स स्पर्धेतील कामगिरीमुळे सिंधूकडून पॅरिस ऑलिंपिक स्पर्धेतही अशीच भरीव कामगिरी करण्याच्या आशा उंचावल्या असल्या तरी गेल्या अनेक सामन्यात तिला कॅरोलिना मरिन, ताय झु यिंग, चेन यू फेई आणि अकाने यामागुची यांचा गड भेदता आलेला नाही. या दिग्गज खेळाडूंचा सामना सिंधूला ऑलिंपिकमध्ये करावा लागणार आहे.

## कोहली सराव सामन्याला मुकणार

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

आयपीएलची सांगता होत असतानाच पुढील महिन्यात सुरू होणाऱ्या टी-२० विश्वचषकाची चाहूल लागली आहे. भारतीय संघाच्या अंतिम १५ मधील अनेक खेळाडू पुढील आठवड्यात विश्वचषकासाठी रवाना होणार आहेत. मात्र, भारताचा तडाखेबाज फलंदाज विराट कोहली भारतीय संघाचा भाग असला तरी तो १ जून रोजी होणाऱ्या बांगलादेशविरोधातील सराव सामन्यात खेळू शकणार नाही. याचे कारण विराट कोहलीला आयपीएलनंतर छोटीशी विश्रांती हवी आहे. त्यामुळे त्याने बीसीसीआयकडे उशीरा पोहोचण्याची विनंती केली.

# वडिलांच्या आठवणींनी सचिन व्याकूळ

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकर वडिलांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या आठवणीत भावुक झाला. सचिनने सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर केली आहे, ज्यात त्याने वडिलांच्या खुर्चीसोबतचा फोटो आणि त्यांच्या काही पुस्तकांचाही फोटो त्यात आहे. या पोस्टवरील सचिनच्या कॅप्शनने सर्वांनाच भावुक केले आहे.

१९ मे १९९९ मध्ये सचिन २६ वर्षांचा असताना त्याचे वडिल रमेश तेंडुलकर यांचे निधन झाले. त्यावेळेस विश्वचषकासाठी सचिन इंग्लंडमध्ये होता. स्पर्धेदरम्यान सचिनच्या वडिलांचे निधन झाले होते. त्याला लगेचच संघ सोडून वडिलांच्या अंत्यसंस्कारासाठी भारतात यावे लागले. यानंतरही मास्टर ब्लास्टरने हार मानली नाही. डोंगराएवढं दु:ख असतानाही सचिन पुन्हा इंग्लंडला गेला आणि पुढच्याच सामन्यात त्याने केनियाविरुद्ध शानदार शतक झळकावले. हे शतक त्याने आभाळाकडे पाहत त्याच्या वडिलांना समर्पित केले होते.



कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)